दैनिक अहिल्यानगर । पुणे । छत्रपती संभाजीनगर । बीड । धाराशिव । नाशिक

# राष्ट्र सह्याद्री

www.rashtrasahyadri.com

• संपादक : काकासाहेब नवले • RNI No. MAHMAR /2019/82605 • वर्ष ७ वे • अंक ७२ • शनिवार, २० डिसेंबर २०२५ • पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 • पाने ८ • मूल्य रु. ४.००

## एमआयडीसीत टँक टॉवर कोसळून दुर्घटना ; सहा मजुरांचा मृत्यू



**नागपूर** : जिल्ह्यातील बुटीबोरी एमआयडीसी परिसरात शुक्रवारी सकाळी अवाडा कंपनीच्या प्रकल्पस्थळी उभारण्यात येत असलेला टँक टॉवर कोसळून भीषण औद्योगिक दुर्घटना घडली. या अपघातात सहा मजुरांचा मृत्यू झाला असून नऊ कामगार जखमी झाले आहेत, त्यापैकी तीन जणांची प्रकृती गंभीर आहे. सर्व जखमींवर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.घटनेनंतर पोलीस, अग्निशमन दल व आपत्ती व्यवस्थापन पथकाने तातडीने मदतकार्य केले. टँक टॉवरच्या बांधकामात तांत्रिक त्रुटी किंवा सुरक्षेतील निष्काळजीपणा कारणीभूत ठरला असावा, अशी शक्यता असून दुर्घटनेच्या कारणांचा सखोल तपास करण्याचे आदेश प्रशासनाने दिले आहेत.

# ‘धुरंधर’ कोण अन् ‘रहेमान डकैत’ कोण?

### श्रीरामपूर नगरपरिषद निवडणूक : शहरात खळबळजनक चर्चा!

**श्रीरामपूर** : बॉलिवूडच्या नुकत्याच प्रदर्शित झालेल्या ’धुरंधर’ चित्रपटात अक्षय खन्नाने साकारलेल्या ‘रहेमान डकैत’ या खलनायकी भूमिकेने प्रेक्षकांची वाहवा मिळवली आहे. गुन्हेगारी, राजकारण आणि पैशांची लुबाडणूक यांचा खेळ या चित्रपटात दाखवला आहे. पण श्रीरामपूर शहरात मात्र हा चित्रपट निवडणुकीच्या रिंगणात उतरला आहे! नगरपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शहरातील चौकाचौकात एकच चर्चा रंगली आहे येथील ‘धुरंधर’ कोण आणि ’रहेमान डकैत’ कोण?




श्रीरामपूर नगरपरिषदेची निवडणूक होऊन उद्या २१ डिसेंबरला मतमोजणी होत आहे. ही निवडणूक तिरंगी ते चौरंगी लढतीने गाजत आहे. कॉंग्रेस, भाजप आणि शिवसेना (शिंदे गट) यांच्यात कडवी स्पर्धा आहे. उद्धव ठाकरे गटाच्या शिवसेनेने लंगडा पॅनल उभे करून आपले ’उपद्रव मूल्य’ दाखवण्याचा प्रयत्न केला, तर अपक्ष आणि इतर छोट्या पक्षांनीही रिंगण गाजवले आहे. नेते आणि पक्षांची प्रतिष्ठा पणाला लागली असताना, निवडणुकीची धुरा सांभाळणाऱ्या उमेदवारांमध्ये मात्र पैशांचा गैरव्यवहार झाल्याच्या चर्चा जोरात आहेत.

सूत्रांच्या माहितीनुसार, काही उमेदवारांनी पक्ष निधीवर ’डल्ला’ मारल्याच्या बातम्या फिरत आहेत. विशेष म्हणजे, एका प्रमुख पॅनलच्या प्रमुखाने उमेदवारांकडून जमा केलेले पैसे स्वतःच हडप केल्याची कुजबुज शहरात सर्वत्र आहे. निवडणूक लढवण्यासाठी उमेदवारांनी पक्षाकडे कोट्यवधी रुपये जमा केले, पण ते पैसे कुठे गेले? असा सवाल विचारला जातोय. हे पैसे पक्षाच्या प्रचारासाठी वापरले की कुणाच्या खिशात गेले, यावरून कार्यकर्ते आणि उमेदवारांमध्ये नाराजी आहे.

शहरातील जाणकार म्हणतात, राजकारणात गुन्हेगारी आणि पैशांची पळवापळवी हे जुने सूत्र आहे. ‘धुरंधर’ चित्रपटासारखेच येथेही खेळ सुरू आहे. जो पैशांची लुबाडणूक करतो तो ’रहेमान डकैत’, आणि जो सगळे सांभाळून निवडणूक जिंकतो तो ‘धुरंधर’! अशी टिप्पणी करताना हसतात. निवडणुकीत कोण बाजी मारेल, हे उद्याच्या मतदानानंतरच स्पष्ट होईल, पण सध्या तरी ’डकैत’ आणि ’धुरंधर’च्या चर्चेने शहरात राजकीय तापमान वाढलं आहे.

मतमोजणीच्या पूर्वसंध्येला पोलिस बंदोबस्त वाढवला असून, मतमोजणी वेळी शांतता पाळण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे. उद्या होणाऱ्या मतमोजणीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. कोण ठरेल श्रीरामपूरचा खरा ’धुरंधर’? अन् ‘रहेमान डकैत’चा खेळ उघड होईल? पाहूया...

# माणिकराव कोकाटे यांच्या शिक्षेला उच्च न्यायालयाची स्थगिती

### लीलावती रुग्णालयात दाखल; हृदय शस्त्रक्रिया होणार!

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**नाशिक** : माजी मंत्री आणि राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार पक्षाचे नेते माणिकराव कोकाटे यांच्या शिक्षेला स्थगिती दिली आहे. या याचिकेवरील सुनावणी पूर्ण होईपर्यंत एक लाखाच्या जातमुचलक्यावर माणिकराव कोकाटेंना जामीन मंजूर करण्यात आला आहे. दरम्यान, त्यांच्या तब्येतीबाबत लीलावती रुग्णालयाकडून मेडिकल बुलेटिन जारी करण्यात आले आहे. त्यांच्यावर हृदय शास्त्रक्रिया केली जाणार असून डॉक्टरांनी त्यांना आराम करण्याचा सल्ला दिला आहे.

नाशिकच्या सदनिका घोटाळा प्रकरणात दोषी ठरल्यानंतर मंत्रिपदाचा राजीनामा दिल्यानंतर राष्ट्रवादी कॉंग्रेसचे नेते आणि माजी मंत्री माणिकराव कोकाटे यांच्यावर मुंबईतील लीलावती रुग्णालयात अँजिओग्राफी करण्यात आली. उच्च रक्तदाबाचा त्रास वाढल्यामुळे कोकाटेंवर अतिदक्षता विभाग मध्ये उपचार सुरू आहेत. तसेच त्यांच्यावर बायपास सर्जरीही करावी लागणार असल्याची माहिती डॉक्टरांनी यावेळी दिली आहे.

यावेळी माणिकराव कोकाटेंना जर बायपास सर्जरी करायची नसेल तर त्यांना अँजिओप्लास्टी करावी लागणार असल्याचंही डॉक्टरांनी यावेळी सांगितलं. तसेच बायपास असो वा अँजिओप्लास्टी या दोन्ही शस्त्रक्रियेनंतर पेशंटला सात दिवस रुग्णालयात राहावेच लागते, अशी माहिती लीलावती रुग्णालयाच्या डॉक्टरांनी माध्यमांशी संवाद साधताना सांगितलं. डॉक्टरांच्या प्राथमिक अहवालानुसार, कोकाटेंना पूर्ण विश्रांतीची आवश्यकता असून त्यांना कोणताही ताण येऊ नये, असा सल्ला दिला आहे.

माणिकराव कोकाटे यांच्यासोबत सध्या त्यांची मुलगी सीमंतिनी कोकाटे आणि पत्नी सीमा कोकाटे उपस्थित आहे. लीलावती रुग्णालयाची वैद्यकीय टीम त्यांच्यावर बारकाईने लक्ष ठेवून आहे. (पान ४ वर)

#### आमदारकी राहणार की जाणार?

मुंबई हायकोर्टाने दिलेल्या निकालाची प्रत प्राप्त झाल्यावर माजी मंत्री आणि राष्ट्रवादी कॉंग्रेसचे नेते माणिकराव कोकाटेंबाबत विधिमंडळ निर्णय घेणार असल्याची माहिती समोर येत आहे. त्यामुळं कोर्टानं शिक्षेला स्थगिती दिल्यानंतर आणि जामीन मंजूर होऊनही कोकाटेंची आमदारकी राहणार की जाणार? या चर्चांना उधाण आलं आहे.

## महत्वाचे...

### आंतरजातीय विवाह करणाऱ्या मुलीला संपत्तीत हिस्सा नाही, सुप्रीम कोर्ट

**मुंबई** : आंतरजातीय विवाह केल्यामुळे वडिलांनी मुलीला संपत्तीतून वगळलेल्या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने मुलीचा दावा फेटाळला. वैध मृत्युपत्रात हस्तक्षेप करता येत नाही, असे स्पष्ट करत न्यायालयाने मृत्युपत्र करणाऱ्याच्या इच्छेलाच प्राधान्य दिले. नऊ भावंडांपैकी शैला जोसेफ हिने वडिलांच्या मालमत्तेत समान हक्काची मागणी केली होती. मात्र वडिलांनी केलेल्या मृत्युपत्रात तिचे नाव वगळण्यात आले होते. सर्वोच्च न्यायालयाने उच्च न्यायालय व ट्रायल कोर्टाचे निर्णय रद्द करत शैला हिला मालमत्तेवर कोणताही अधिकार नाही, असा अंतिम निर्णय दिला.शैलाला मालमत्तेत वाटा का देण्यात आला नाही याबद्दल न्यायालयाने म्हटले की, ...आपण मृत्युपत्र करणाऱ्याला आमच्या जागी ठेवू शकत नाही....

# तिरंगी नव्हे, ही शिवसेनेची भगवी एकरंगी निवडणूक

### मक्तेदारी संपवण्यासाठी देवळालीत गणेश भांड मुसमाडेंबरोबर : एकनाथ शिंदे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**देवळाली प्रवरा** : दुरंगी, तिरंगी नव्हे ही शिवसेनेची भगवी एकरंगी निवडणूक आहे. देवळालीतील दादागिरी आणि मक्तेदारी संपवण्यासाठी उद्योजक गणेश भांड यांनी मनाचा मोठेपणा दाखवून शिवसेनेचे उमेदवार बाबासाहेब मुसमाडे यांना पाठिंबा दिला आहे. उशिर होऊनही तोबा गर्दीमुळे ही विजयी सभा असल्याचा विश्वास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला.

देवळाली प्रवरा नगरपालिकेच्या निवडणुकीसाठी येथील स्व. अण्णासाहेब कदम पुतळ्यासमोर आयोजित हजारो मतदारांसमोर शिंदे बोलत होते.



यावेळी शिवसेनेचे राज्याचे सचिव राम रेपाळे, संपर्कप्रमुख जालिंदर गालपगारे, माजी आमदार भानुदास मुरकुटे, माजी आमदार भाऊसाहेब कांबळे, चैतन्य उद्योग समूहाचे प्रमुख गणेश भांड, नगराध्यक्ष पदाचे उमेदवार बाबासाहेब मुसमाडे यांच्यासह नगरसेवक पदाचे उमेदवार, शिवसेनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

शिंदे म्हणाले, सभेला दोन तास उशीर होऊनही हजारोंच्या संख्येने महिला आणि पुरुष मतदार बसून आहेत. हा शिवसेनेच्या प्रती असलेला मोठा विश्वास आहे. ज्या उमेदवाराच्या पाठीशी महिला त्यांचा मतपेटीत नंबर पहिला अशी कोटी करत शिंदे यांनी ही सभा जिंकली.

मुख्यमंत्रीपदा बरोबरच असंख्य मंत्रीपदे आपण भूषवली आहेत. लाडक्या बहीण योजनेमुळे मला संपूर्ण महाराष्ट्रात लाडक्या भावाची ओळख मिळाली. हे माझे भाग्य आहे. नगर विकास खाते माझ्याकडे आहे. जे कमी आहे ते देणारच आपण शब्द फिरवीत नाही. उद्याच्या निवडणुकीत मुसमाडे यांना विजयी करून शिवसेनेच्या भगव्याला सन्मान मिळवून देण्याचे आवाहनही त्यांनी केले. पोलीस स्टेशनला स्वतंत्र इमारत, क्रीडा संकुल अशा इतर असंख्य सुविधा उपलब्ध करून देण्याचे अभिवचन शिंदे यांनी यावेळी दिले. आपण गरिबीतून वर आलोय. गरिबी काय असते हे आपल्या मातोश्रीने अनुभवली आहे. स्वतःचे पैसे स्वतः (पान ४ वर)

#### मुसमाडे फेवरेट

नगराध्यक्ष पदाचे उमेदवार बाबासाहेब मुसमाडे हे सर्वांचे फेवरेट आहेत. तसा मी पण आहे. मुसमाडे नेहमी सर्वांना मदत करतात तसा मीही करतो, असे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे मिश्किलपणाने म्हणताच सभेत हास्याचे फवारे उडाले.

# आ.संग्राम जगताप यांना मंत्रिपदी संधी?

### कोकाटे राजीनाम्यानंतर मंत्रिपदासाठी उत्सुकता

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर** : सदनिका गैरव्यवहार प्रकरणात दोषी ठरल्याने राष्ट्रवादी कॉंग्रेस (अजित पवार गट) चे मंत्री माणिकराव कोकाटे यांनी मंत्रिपदाचा राजीनामा दिला. त्यांच्याकडील क्रीडा व अल्पसंख्यांक विकास खाते उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे सोपवण्यात आले आहे. कोकाटे यांच्या जागी नव्या मंत्र्याची नेमणूक कधी आणि कोणाला होईल, याबाबत राज्याच्या राजकीय वर्तुळात जोरदार चर्चा सुरू आहे. विशेषतः अहिल्यानगर जिल्ह्यातील राजकीय वर्तुळात या रिक्त जागेसाठी मोठी उत्सुकता आहे. जातीय व प्रादेशिक समतोल साधण्यासाठी मराठा समाजातील नेत्याकडे हे खाते



जाण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. अहिल्यानगर शहरचे आमदार संग्राम जगताप यांचे नाव जोरदार चर्चेत आहे. जगताप हे अजित पवार यांचे विश्वासू सहकारी मानले जातात. राष्ट्रवादीची मजबूत पकड असलेल्या अहिल्यानगर जिल्ह्यात जगताप यांनी सलग निवडणुका जिंकून पक्षाला बळ दिले आहे.

सूत्रांच्या माहितीनुसार, नगरपरिषद, नगरपंचायत आणि जिल्हा परिषद निवडणुका संपल्यानंतरच या मंत्रिपदाची नव्याने वाटप होईल. सध्या निवडणूक आचारसंहिता लागू असल्याने तातडीने फेरबदल होण्याची शक्यता कमी आहे. कोकाटे यांच्या राजीनाम्यानंतर अजित पवार गटात मंत्रिपदासाठी लॉबिंग तीव्र झाले आहे. माजी मंत्री धनंजय मुंडे, अनिल पाटील, संजय बनसोडे यांची नावे इच्छुकांमध्ये समोर येत आहेत. सुनील शेळके आणि प्रकाश सोळंखे यांचीही नावे मराठा नेत्यांमध्ये समोर येत आहेत. जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका सुरू असताना हे मंत्रिपद जिल्ह्यातील नेत्याला मिळाल्यास पक्षाला निवडणुकीत फायदा होईल, असे मत राजकीय जाणकार व्यक्त करत (पान ४ वर)

### उर्वरित नगरपालिकांसाठी

# आज मतदान

### सर्व नगरपालिकांची उद्या २१ डिसेंबरला मतमोजणी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर** : महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या कार्यक्रमानुसार, राज्यातील उर्वरित २३ नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या अध्यक्षपद आणि सदस्यपदांसाठी तसेच विविध नगरपरिषदा व नगरपंचायतींमधील १४३ सदस्यपदांच्या जागांसाठी आज शनिवारी, २० डिसेंबर रोजी मतदान होणार आहे. अहिल्या नंतर जिल्ह्यातील कोपरगाव, देवळाली प्रवरा, नेवासा आणि पाथर्डी पालकांचा त्यात समावेश आहे. तर सर्व नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या निवडणुकांची मतमोजणी २१ डिसेंबर २०२५ रोजी एकत्रितपणे होईल.

राज्य निवडणूक आयोगाने ४ नोव्हेंबर २०२५ रोजी राज्यातील एकूण २८८ नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर केला होता. त्यानुसार, २ डिसेंबर २०२५ रोजी २६३ नगरपरिषदा व नगरपंचायतींसाठी मतदान यशस्वीरित्या पार पडले. मात्र, काही ठिकाणी न्यायालयीन प्रकरणे किंवा इतर कारणांमुळे निवडणुका पुढे ढकलण्यात आल्या होत्या. आता उर्वरित ठिकाणी उद्या मतदान होईल. (पान ४ वर)

# लिंपणगाव चौफुल्यावर इनोव्हा-दुचाकी अपघातात शेतकरी तरुणाचा मृत्यू

### डिव्हायडर व गतिरोधकांची जोरदार मागणी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा/लिंपणगाव** : श्रीगोंदा तालुक्यातील लिंपणगाव येथील मुंढेकरवाडी चौफुल्यावर घडलेल्या भीषण अपघातात पेडगाव (ता. श्रीगोंदा) येथील शेतकरी तरुण संतोष किसन मोहिते (वय ४५) यांचा उपचारापूर्वीच मृत्यू झाला. ही घटना दि. १९ डिसेंबर रोजी सकाळी साडेनऊ ते दहा वाजण्याच्या सुमारास घडली.



मिळालेल्या माहितीनुसार, संतोष मोहिते हे लिंपणगाव येथील जिनिंग प्लांटमध्ये कापसाची नोंद करून दुचाकीवरून घरी परतत होते. काष्टीलिंपणगाव मार्गे श्रीगोंद्याकडे जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५४८ डी वरील मुंढेकरवाडी फाटा, लिंपणगाव येथे रस्ता ओलांडताना काष्टीकडून भरधाव येणाऱ्या इनोव्हा कारने त्यांच्या दुचाकीला जोराची धडक दिली. धडकेनंतर मोहिते काही अंतरावर फेकले जाऊन रस्त्यावर कोसळले.

अपघातात त्यांच्या तोंडातून मोठ्या प्रमाणात रक्तस्राव झाला. घटनास्थळी उपस्थित तरुणांनी तातडीने त्यांना नगरकडे खासगी रुग्णालयात उपचारासाठी नेत असतानाच वाटेत त्यांचे दुर्दैवी निधन झाले. अपघाताचा प्रसंग अत्यंत थरारक असल्याचे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले. दरम्यान, काष्टीश्रीगोंदालिंपणगाव मार्गावरील राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५४८ डी हा मागील पाच-सहा वर्षांत नव्याने विकसित झाल्यानंतर वाहनांची गती प्रचंड वाढली आहे. अतिवेगामुळे या महामार्गावर अपघातांची मालिका सुरूच असून, (पान ४ वर)



# शनिशिंगणापूर देवस्थानचा कारभार नाशिक विभागीय आयुक्तांकडे

**सुप्रीम कोर्टाचा निर्णय**

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**सोनई** : मुंबई हायकोर्टाच्या निकाल रद्द करत सुप्रीम कोर्टाने शनिशिंगणापूर देवस्थानचा कारभार नाशिक विभागीय आयुक्तांकडे सोपवला आहे.

श्री शनी शिंगणापूर देवस्थान ट्रस्टच्या व्यवस्थापन संदर्भ प्रकरणात काल सुप्रीम कोर्टाने हा अंतरिम आदेश दिला. मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने १२ डिसेंबर २०२५ रोजी दिलेला निर्णय तसेच अहिल्यानगर जिल्हाधिकाऱ्यांनी दिलेले संबंधित आदेश सुप्रीम कोर्टाने तात्पुरते स्थगित केले आहेत.

काल सदस्य समितीने संभाजीनगर खंडपीठाने पूर्वीचे विश्वस्त मंडळाकडे कारभार देण्याचे आदेशानुसार त्यास सुप्रीम कोर्टात अपील करताच या आदेशाला स्थगिती देऊन कारभार नाशिक विभागीय आयुक्तांकडे दिल्याने निराशा पसरली आहे.

महाराष्ट्र सरकारने दाखल केलेल्या विशेष परवानगी याचिकेवर सुनावणी करताना, न्यायालयाने सर्व प्रतिवादींना नोटीस बजावली असून या प्रकरणाची पुढील सुनावणी १९ जानेवारी २०२६ रोजी होणार आहे. प्रतिवादींकडून तीन आठवड्यांत प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

देवस्थानच्या सध्याच्या व्यवस्थापन समितीचा कार्यकाळ ३१ डिसेंबर २०२५ रोजी संपत असल्याने, देवस्थानाच्या कारभारात कोणतीही अडचण निर्माण होऊ नये यासाठी सुप्रीम कोर्टाने नाशिक विभागीय आयुक्तांची प्रशासक म्हणून नियुक्ती करण्याचे आदेश राज्य सरकारला दिले आहेत.

प्रशासकांच्या मदतीसाठी दोन अधिकारी, शक्यतो उपविभागीय दंडाधिकारी (डऊ्) दर्जाचे, नेमण्याचेही निर्देश देण्यात आले आहेत. हे अधिकारी देवस्थानाचा दैनंदिन कारभार सुरळीत, पारदर्शक आणि प्रभावीपणे चालवण्यासाठी सहाय्य करतील.

ही प्रशासकीय व्यवस्था श्री शनीश्वर देवस्थान ट्रस्ट (शिंगणापूर) अधिनियम, २०१८ मधील कलम ५ नुसार नवीन समिती स्थापन होईपर्यंत लागू राहणार आहे. तसेच, समितीची स्थापना कधी होणार याचा निश्चित कालबद्ध आराखडा आणि अधिनियमातील नियमांची अंमलबजावणी याबाबत राज्य सरकारला स्थिती अहवाल सादर करण्याचे आदेश सुप्रीम कोर्टाने दिले आहेत.

- त्या एका दिवसात जो काय कोट्यावधीचा जमा खर्च झाला असून, त्याची चौकशी करणार आहे, आणि भ्रष्टाचार विरोधात लढा कायम राहणार आहे.
  **–ऋषिकेश शेटे,** भाजपा, जिल्हा उपाध्यक्ष
- या निर्णयामुळे शनी शिंगणापूर देवस्थानाच्या व्यवस्थापनावर थेट सुप्रीम कोर्टाचे नियंत्रण आले असून, अंतिम निकालाकडे भाविकांसह सर्वांचे लक्ष लागले आहे.
  **– यु. एम. बल्लाळ,** माजी मुख्य कार्यकारी अधिकारी, नेवासा

# संपादकीय

## एपस्टीन फाइल्स : ‘भूकंप’ येणार का?

जेफ्री एपस्टीन हे नाव गेल्या काही वर्षांत जगभरात चर्चेचे केंद्रबिंदू बनले आहे. अमेरिकेतील हा श्रीमंत व्यावसायिक, जो लैंगिक शोषण आणि अल्पवयीन मुलींच्या तस्करीच्या आरोपांखाली तुरुंगात होता, त्याच्या मृत्यूनंतर (२०१९) त्याच्या नेटवर्कशी जोडलेल्या उच्चपदस्थ व्यक्तींची नावे सतत समोर येत आहेत. २०२५ च्या डिसेंबर महिन्यात अमेरिकेतील हाऊस ओव्हरसाईट कमिटीच्या डेमोक्रॅट सदस्यांनी एपस्टीनच्या इस्टेटकडून मिळालेल्या ९५,००० हून अधिक छायाचित्रांमधून निवडक ७० हून अधिक फोटो आणि कागदपत्रे सार्वजनिक केली. यात बिल गेट्स, स्टीव्ह बॅनन, नोएम चॉम्स्की, वुडी ॲलन यांसारख्या अमेरिकन आणि युरोपीय सेलिब्रिटींचे फोटो आहेत. काही फोटोंमध्ये रेडॅक्टेड पासपोर्ट्स आणि चिंताजनक मेसेजेस आहेत, पण हे मुख्यत्वे अमेरिकन राजकारण आणि सेलिब्रिटींशी जोडलेले आहेत.

या खुलाशांमुळे भारतात मात्र एक वेगळीच चर्चा रंगली. काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी डिसेंबरच्या सुरुवातीला वक्तव्य केले की, एपस्टीन फाइल्सच्या खुलाशामुळे भारताच्या राजकारणात ‘मोठा भूकंप’ येईल. सत्ताधारी पक्षातील खासदारांची नावे समोर येतील, पंतप्रधानांना राजीनामा द्यावा लागू शकतो आणि महाराष्ट्रातून ‘मराठी माणूस’ पंतप्रधान होण्याची शक्यता आहे. चव्हाण यांनी हे वक्तव्य १९ डिसेंबर २०२५ – अमेरिकन न्याय विभागाच्या ( डीओजे) मोठ्या फाइल्स रिलीजच्या तारखेशी जोडले. त्यांच्या मते, या फाइल्समध्ये भारतीय नेत्यांची नावे असतील आणि त्यामुळे राजकीय उलथापालथ होईल. पण आज, १९ डिसेंबर २०२५ पर्यंतच्या उपलब्ध माहितीनुसार, चव्हाण यांचा दावा पूर्णपणे खोटा ठरला आहे का? की यात काही तथ्य आहे? हा प्रश्न भारतीय राजकारणाच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे, कारण अशा अफवा आणि अटकळींमुळे जनमानसात गोंधळ निर्माण होतो आणि राजकीय पक्षांना त्याचा फायदा किंवा तोटा होतो.

प्रथम, एपस्टीन फाइल्सच्या पार्श्वभूमी समजून घेऊया. एपस्टीनला २००८ मध्येच लैंगिक गुन्ह्यांसाठी शिक्षा झाली होती, पण त्याचे उच्चपदस्थांशी संबंध कायम राहिले. २०१९ मध्ये त्याच्या अटकेनंतर त्याचा तुरुंगात मृत्यू झाला, ज्याला अधिकृतरीत्या आत्महत्या म्हटले जाते, पण याबाबत कटकारस्थानाच्या थिअरी सतत फिरतात. अमेरिकेत ‘एपस्टीन फाइल्स ट्रान्स्परन्सी ॲक्ट’ नोव्हेंबर २०२५ मध्ये पास झाला, ज्यामुळे ’डीओजे’ला १९ डिसेंबरपर्यंत सर्व फाइल्स सार्वजनिक कराव्या लागतील. या कायद्यामुळे हाऊस कमिटीने इस्टेटकडून मिळालेले फोटो रिलीज केले. यात ट्रम्प, क्लिंटन, गेट्स यांसारख्या अमेरिकन नेत्यांचे फोटो आहेत, पण कोणत्याही गुन्ह्याचा थेट पुरावा नाही – फक्त सामाजिक संबंध दाखवणारे.

भारताशी संबंधित भागाकडे येऊया. पूर्वीच्या काही डॉक्युमेंट्समध्ये (नोव्हेंबर २०२५ च्या रिलीजमध्ये) पंतप्रधान नरेंद्र मोदींचा उल्लेख एका ईमेलमध्ये आहे, ज्यात एपस्टीन स्टीव्ह बॅननला मोदींशी मीटिंग सेट करण्याचा प्रयत्न करत होता. तसेच, केंद्रीय मंत्री हरदीप सिंग पुरी यांच्याशी २०१४–२०१७ दरम्यान कॅलेंडर अपॉइंटमेंट्स आणि अनिल अंबानी यांच्याशी ईमेल्सचा उल्लेख आहे. हे संबंध मुख्यत्वे व्यावसायिक किंवा राजनैतिक मीटिंग्सशी जोडलेले आहेत – कोणतेही लैंगिक गुन्हे किंवा ब्लॅकमेलचे पुरावे नाहीत. भाजपने याला ‘रँडम नेम–ड्रॉपिंग’ म्हटले आहे आणि काँग्रेसने यावरून प्रश्न उपस्थित केले होते, पण नवीन रिलीजमध्ये (१८–१९ डिसेंबर) भारतातील कोणत्याही राजकीय व्यक्तीचे नवे नाव किंवा फोटो समोर आलेले नाही.चव्हाण यांचे वक्तव्य राजकीयदृष्ट्या धाडसी होते. त्यांनी सोशल मीडियावर आणि पत्रकार परिषदांमध्ये सांगितले की, फाइल्समध्ये सध्याच्या किंवा माजी भारतीय खासदारांची नावे आहेत आणि १९ डिसेंबरनंतर ‘राजकीय भूकंप’ येईल. महाराष्ट्रातून पंतप्रधान होण्याची शक्यता वर्तवताना त्यांनी भाजपमधील पर्यायांचा उल्लेख केला. हे वक्तव्य विरोधी पक्षाच्या रणनीतीचा भाग वाटते – सत्ताधाऱ्यांना अडचणीत आणण्यासाठी अफवा किंवा अटकळी पसरवणे. पण सध्याच्या रिलीजमध्ये असा कोणताही ‘धमाका’ झालेला नाही. जग च्या आजच्या रिलीजकडे लक्ष आहे, पण त्या मुख्यत्वे अमेरिकन तपासाशी संबंधित आहेत आणि रेडॅक्शनमुळे संवेदनशील भाग लपवले जाऊ शकतात.

भारतीय राजकारणावर परिणाम होण्याची शक्यता कमी का आहे? कारण एपस्टीनचे नेटवर्क मुख्यत्वे अमेरिकन आणि युरोपीय आहे. भारतातील उल्लेख अप्रत्यक्ष आणि पुराव्याविना आहेत. जर खरोखरच ठोस पुरावे असते, तर ते आधीच गाजले असते. चव्हाण यांच्यासारख्या नेत्यांचे दावे राजकीय फायदा घेण्यासाठी असू शकतात, पण पुराव्याअभावी ते फार काळ टिकत नाहीत. महाराष्ट्रात काँग्रेसला याचा फायदा होईल असे वाटले होते, पण आता हे ‘राजकीय अटकल’ म्हणूनच राहील.यातून एक धडा मिळतो: आंतरराष्ट्रीय घडामोडींचा भारतीय राजकारणात वापर करताना पुरावे महत्त्वाचे असतात. अफवा पसरवून जनतेला दिशाभूल करणे लोकशाहीसाठी धोकादायक आहे. एपस्टीन प्रकरण हे अमेरिकेतील पारदर्शकतेच्या लढाईचे प्रतीक आहे, पण भारतात ते फक्त राजकीय हत्यार बनले. जर नवीन रिलीजमध्ये भारताशी थेट संबंधित काही समोर आले तरच चर्चा पुन्हा रंगेल, अन्यथा हे प्रकरण अमेरिकेपुरतेच मर्यादित राहील. शेवटी, राजकारणात अपेक्षा आणि वास्तव यांच्यातील अंतर नेहमीच असते. चव्हाण यांचा ‘भूकंप’ आला नाही, पण यामुळे राजकीय चर्चेची एक संधी निर्माण झाली. भारतीय लोकशाहीत अशा दाव्यांना पुराव्याची कसोटी लागते – आणि सध्या तरी एपस्टीन फाइल्स त्या कसोटीवर उतरलेल्या नाहीत.

# विविधांगी उपक्रमातून विद्यार्थ्यांचा विकास हाच प्रवरेचा ध्यास : डॉ.सुस्मिता विखे



**सास्कतिक कार्यक्रमातून**

**उत्तर भारतीय लोकसंस्कृतीची बोलकी रचना रेखाटलेल्या प्रवेशद्र व भव्य व्यासपीठ सामूहिक श्रीगणेश आराधना, रामायणातील घटना-प्रसंगाची चित्रकथा, पंजाब लोकनृत्य, जम्मू कश्मीरची सुंदरता सुंदरता, हरियाणा लोकसंस्कृती इत्यादी पारंपरिक लोकरंगभूमीवरील सांस्कृतिक आविष्कार विद्यार्थ्यांनी प्रसंगानुरूप वेशभूषा परिधान करून उत्कृष्टरित्या सादर केला.**

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोल्हार** : प्रवरेत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी संस्थेमध्ये विविधांगी उपक्रम राबविण्यात येत त्या माध्यमातून कला, क्रीडा, शिक्षण, क्षमता, करियर यामध्ये निश्चितच प्रगती दिसत असल्याचे गौरवोद्गार लोकनेते डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी सुस्मिता विखे पाटील यांनी व्यक्त केले. कोल्हार भगवतीपूर येथील प्रवरा हायस्कूल या सीबीएससी स्कूलमध्ये वार्षिक स्नेहसंमेलन आणि पारितोषिक वितरण समारंभ उत्साहात संपन्न झाला. यावेळी मार्गदर्शन करत होत्या. यावेळी विद्यालयातील विद्यार्थ्यांनी अत्यंत उत्कृष्टरित्या सांस्कृतिक कार्यक्रमांचे सादरीकरण केले. यशस्वी विद्यार्थी – विद्यार्थिनींना पारितोषिके प्रदान करण्यात आली. याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून हर्षल शिरसाठ,अशोकशेठ आसावा,ॲड उदय खर्डे,प्रशांत खर्डे,मधुकर खर्डे तसेच संस्थेचे सहसचिव भारत घोगरे, कर्नल सुभाष घोडगिरी, कोल्हार येथील प्रवरा हायस्कूलचे प्राचार्य सुधीर मोरे, प्रवरा पब्लीक स्कुलचे डॉ. बी. बी. अंबाडे, कोल्हार येथील कला विज्ञान वाणिज्य महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. हरिभाऊ आहेर, प्रवरा गर्ल्स स्कुलच्या प्रा. रेखा रत्नपारखी, उपसरपंच सविता खर्डे, गोपिका दळे, पत्रकार संजय कोळसे, सुहास वैद्य, संतोष बोरुडे, पंढरीनाथ खर्डे, स्वप्नील निबे, मच्छिंद्र पावडे, ऋषिकेश खांदे, इलियास शेख, संभाजी देवकर, सर्जेराव खर्डे, गोरक्षनाथ खर्डे, राजेंद्र आदि उपस्थित होते. प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेमध्ये राबविल्या जात असलेल्या वेगवेगळ्या उपक्रमाबाबत सांगताना सुस्मिता विखे पाटील म्हणाल्या, जेईई सारख्या स्पर्धा परीक्षांसाठी प्रवरेत अभ्यासिका सुरू करण्यात आल्या आहेत. जूनमध्ये वारीचा उपक्रम राबविण्यात आला. यात ३० हजार विद्यार्थी – विद्यार्थिनींनी सहभाग नोंदवून रेकॉर्ड बनवला. प्रवरा स्पोर्ट्स अकॅडमी स्थापन करण्यात आली. त्या विविध खेळांमध्ये राष्ट्रीय स्तरावर मुले चमकत आहेत. संस्थेचे अध्यक्ष मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या प्रेरणेतून नोव्हेंबर महिन्यात प्रवरेमध्ये सेंट्रलाइज किचन ही संकल्पना राबविण्यात आली. त्या माध्यमातून संस्थेच्या सर्व हॉस्टेलमधील साडेसहा हजार मुलांचे जेवण एकाच ठिकाणाहून बनविले जाते. इयत्ता ६ वी ते १० वीपर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी १ जानेवारी २०२६ पासून फाउंडेशन अकॅडमी सुरू होईल. गुणवत्ता वाढीसाठी मध्यंतरी शिक्षकांचे ट्रेनिंग घेण्यात आले. एक्सपर्टच्या मदतीने प्रवरेची पुस्तके तयार केली जाणार असल्याचे त्यांनी सांगितले. हर्षल शिरसाट म्हणाले, मी आज अतिथी म्हणून जरी आलो असलो तरी मी प्रवरेचा विद्यार्थी आहे याचा मला अभिमान आहे. त्यावेळी स्कूलमध्ये मिळालेले शिस्तीचे धडे आज जीवनात उपयोगी पडत जीवनात तुमच्या चारित्र्यावरून चरित्र घडत असते. न्यूनगंड न बाळगता शालेय जीवनात सर्व कार्यक्रमांमध्ये तसेच प्रत्येक स्पर्धांमध्ये सहभाग घ्यावा असा सल्लाही त्यांनी दिला. प्रास्ताविक व अहवाल वाचन प्रवरा हायस्कूलचे प्राचार्य सुधीर मोरे यांनी केले. उपस्थितांचे आभार प्रमोद काळे यांनी मानले. सूत्रसंचालन सायली खर्डे, मिताली अंबुलगेकर, श्रावस्ती वानखेडे यांनी केले.

# समृध्द पंचायत राज अभियानाची प्रभावी अंमलबजावणीला सुरुवात



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**बालाजी देडगाव** : नेवासा देडगाव येथे मुख्यमंत्री समृध्द पंचायत राज अभियान अंतर्गत ग्रामपंचायतमार्फत विविध कार्यक्रमांची अंमलबजावणी करण्यात आली. यामध्ये मोफत सर्वरोग निदान शिबिर व हिमोग्लोबिन तपासणी, गर्भवती मातांची मोफत आरोग्य तपासणी, बालकांचे मोफत लसीकरण, ग्रामस्वच्छतेसाठी श्रमदान करणे, आपले सरकार सेवा केंद्रामार्फत विविध दाखले वाटप करणे, दिव्यांगांना वैश्विक कार्ड वाटप करणे, ५०% कर सवलतीचा देणे या विविध कार्यक्रमांची अंमलबजावणी करण्यात आली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी चेअरमन कडूभाऊ तांबे होते. यावेळी प्रमुख मान्यवर म्हणून सरपंच चंद्रकांत मुंगसे, गटविकास अधिकारी संजय लखवाल उपस्थित होते. यावेळी तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. कानडे, सरपंच चंद्रकांत मुंगसे, शाखा अभियंता पंचायत समिती नेवासा महाडुळे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अधिकारी संतोष उल्हारे यांनी केले. यावेळी बालाजी देवस्थानचे अध्यक्ष नवनाथ मुंगसे, बाबासाहेब मुंगसे, सुभाष मुंगसे, प्राचार्य स्वरुपचंद गायकवाड, ज्येष्ठ पत्रकार बन्सी एडके, उपसरपंच बाळासाहेब मुंगसे, जालिंदर खांडे, आनंद दळवी, अंबादास तांबे, सामाजिक न्याय विभागाचे अध्यक्ष अभिजीत ससाणे, ग्रामपंचायत कर्मचारी बाळासाहेब म्हस्के, उपस्थित होते.

# मतमोजणीची तयारी पूर्ण : प्रांताधिकारी सावंत

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** - श्रीरामपूर नगरपालिका निवडणुकीची मतमोजणी उद्या रविवार सकाळी दहा वाजता प्रांत कार्यालयाच्या प्रांगणात उभारलेल्या मंडपात होणार असून मतमोजणीची सर्व तयारी पूर्ण झाल्याची माहिती प्रांत अधिकारी किरण सावंत यांनी दिली.

आज शनिवारी प्रभाग तीन मधील न्यायालयाच्या निर्णयामुळे लांबलेल्या एका जागेची निवडणूक होत असून जागा अनुसूचित जातीची आहे. या ठिकाणी पाच मतदान केंद्रे असून ३५ कर्मचारी त्या ठिकाणी मतदानाचे कर्तव्य पार पाडणार आहेत.सर्व मिळून १०० लोकांचा स्टाफ आज होणाऱ्या निवडणूकीसाठी सज्ज आहे. प्रभाग ३ मध्ये ४४८० एवढी मतदार संख्या आहे.सीडीजे कॉलेज ऑफ कॉमर्सच्या इमारतीमध्ये हे मतदान केंद्र आहे.मतदान केंद्रावर ऑनलाईन नजर ठेवली जात प्रांत कार्यालयातून संपूर्ण मतदान प्रक्रियेवर देखरेखीसाठी सीसीटीव्ही यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली आहे.

नगरपालिकेच्या नगराध्यक्ष व १७ प्रभागातील नगरसेवकांच्या निवडणुकीसाठी दोन डिसेंबर रोजी झालेल्या मतदानाची मतमोजणी उद्या रविवारी सकाळी दहा वाजता सुरू होणार आहे.त्यासाठी प्रांत कार्यालयात उभारलेल्या मंडपात १० टेबल लावण्यात आले असून मतमोजणीचे दहा राऊंड होणार आहेत.प्रभाग तीन मध्ये मतदान झाल्यामुळे हे १० राऊंड होत आहेत. काही टेबलांवर चार, काहींवर पाच तर काहींवर सहा आणि एका केंद्रावर सात मतदान केंद्रे असल्याने प्रत्येक टेबलावर वेगवेगळे राऊंड होणार आहेत. एकूण १७ टेबलवर ही मतमोजणी होणार आहे . त्यासाठी प्रत्येक टेबलावर तीन याप्रमाणे ५१ कर्मचारी नियुक्त करण्यात आले असून दोन पर्यवेक्षक तसेच पेट्या ने आण करण्यासाठीचे धरून सुमारे ८० कर्मचारी मतमोजणीसाठी कार्यरत राहणार आहेत. मतमोजणी झाल्यानंतर उमेदवार व त्यांचे प्रतिनिधी यांना तीन वेळा मतमोजणीची आकडेवारी दाखवण्यात येणार आहे.फेर पडताळणी करूनच मत पेट्या परत बंद केल्या जातील.दहा वाजता मतमोजणी सुरू झाल्यानंतर आकडेवारी तीन ठिकाणी घेतली जाणार असून तिन्ही ठिकाणची आकडेवारी ही तपासणी अंतिम निकाल साधारणपणे साडेबारापर्यंत जाहीर करण्यात येईल अशा पद्धतीने नियोजन करण्यात आल्याची माहिती ही प्रांत अधिकारी सावंत यांनी दिली. यावेळी तहसीलदार मिलिंद वाघ व मुख्याधिकारी मच्छिंद्र घोलप हे देखील उपस्थित होते.

# मतदार सावध, नगरसेवक व नगराध्यक्ष एकाच पक्षाचे : विवेक कोल्हे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोपरगाव** : कोपरगाव नगर परिषदेची निवडणूक अंतिम टप्प्यात आली वीस तारखेला होणाऱ्या मतदानात मोठ्या संख्येने भारतीय जनता पार्टी मित्रपक्षाचे नगरसेवक विजय होत आहेत. गत वेळी नगरसेवक निवडून आले मात्र नगराध्यक्ष वेगळा असल्याने नागरिकांना अपेक्षित कामे पूर्ण करून मिळाली नाही यावेळी मात्र मतदारांनी कोल्हे गटाचे बहुसंख्य नगरसेवक निवडून देण्याचा निर्धार केलेला असून नगराध्यक्ष देखील उच्चांकी मताधिक्याने भाजपा मित्र पक्षांचे संधान हे विजयी होणार असल्याचे युवा नेते विवेक कोल्हे यांनी प्रभाग क्रमांक २,७,१४ येथील प्रचार सभा दरम्यान मनोगत व्यक्त केले. मोठ्या प्रमाणावर सर्वच घटकांनी आमच्यावर विश्वास दाखवला असून अफाट जनसमुदाय विकासाच्या मुद्द्यावर आमच्या पाठीशी खंबीरपणाने उभा आहे. विरोधकांकडे संपूर्ण निवडणुकीत प्रचारादरम्यान दाखवण्यासारखं सांगण्यासारखं काहीही नसल्याने लोणचे पापड यावरती त्यांना न्यावी लागली. आम्ही विश्वासनामा सादर करून तो पूर्ण करण्यास देखील सुरुवात केली आहे त्यामुळे प्रत्यक्ष घडणाऱ्या कृतीने महिला वर्ग देखील मोठ्या संख्येने भारतीय जनता पार्टी मित्र पक्षांसोबत उघडपणाने प्रचारात सक्रिय झाला आहे.

अल्पसंख्यांक समाजाला कधीही कोल्हे कुटुंबाने दुरावा दिलेला नसून भारतीय जनता पार्टी केंद्र आणि राज्य सरकारच्या माध्यमातून शेकडो सर्वांपर्यंत पोहोचवण्याचं काम केले जाते. कुठेही दूजाभाव न करता सर्वांना सोबत घेऊन जाण्याचं प्रामाणिक समाजकारण स्वर्गीय कोल्हे साहेबांपासून आम्ही करतो आहोत. शहरातील विविध भागातील नागरिकांना शासकीय जमिनीवरील त्यांची घरे आणि जागा नियमाकुल करून मिळण्यासाठी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी घेतलेला निर्णय कोपरगावकरांच्या हक्काच्या घराचे स्वप्न साकार करणारा असल्याने सर्वत्र वातावरण आहे.




अतिशय सकारात्मक प्रतिसाद प्रचारदरम्यान आम्हाला मिळाला असून सर्व नगरसेवक आणि नगराध्यक्ष अतिशय मोठ्या मताधिक्याने विजय होणार आहेत यात कुठलीही शंका आता उरली नाही. प्रलोभनाला बळी पडून नागरिक विरोधकांच्या भूलथापांना भीक घालणार नसल्याने वीस तारखेला मतदान संपल्यानंतर प्रत्येक घरामध्ये एकच चर्चा सुरू असेल सगळीकडे कमळाला आणि मित्र पक्षांना मतदान झालं.

# फायनान्सचे पैसे वसूल करण्यासाठी मारहाण

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : फायनान्स चे पैसे घेण्याच्या कारणावरून आरोपींनी दगाबाई पवार व त्यांच्या मुलाला हेल्मेटने मारहाण करून जखमी केल्याची घटना राहुरी तालुक्यातील वांजुळपोई येथे घडली.

दगाबाई रावसाहेब पवार, वय ५० वर्षे, रा. वांजुळपोई, ता. राहुरी, यांनी राहुरी पोलीस ठाण्यात फिर्यादीत म्हटले आहे की, दि. १२ डिसेंबर २०२५ रोजी सायंकाळी ७ वाजेच्या सुमारास दगाबाई व त्यांचा मुलगा घरी असताना तेथे आरोपी कांतीलाल पवार हा आला व मला म्हणाला की, तुमचे फायनन्सचे प्रकरण मी केले होते. त्याचे पैसे मला दया, असे म्हणाला

तेव्हा दगाबाई त्याला म्हणाल्या की, आम्ही तुला फायनन्सचे पैसे दिलेले आहेत. तेव्हा कांतीलाल पवार हा म्हणाला की, सदर फायनान्सचे पैसे मी भरले आहेत. तेव्हा दगाबाई यांचा मुलगा अजय हे कांतीलाल पवार याला म्हणाले की, आमचे फायनान्सचे पैसे तुम्हाला भरताच येत नाही.असे म्हणला असता त्याला त्याचा राग आल्याने त्याने दगाबाई पवार व त्यांच्या मुलाला शिवीगाळ करुन हेल्मेटने मारहाण जखमी केले. तसेच तुम्ही माझे फायनान्सचे पैसे दिले नाहीतर तुम्हाला जिवंत सोडणार नाही, अशी धमकी दिली.

दगाबाई रावसाहेब पवार यांच्या फिर्यादीवरून राहुरी पोलीस ठाण्यात आरोपी कांतीलाल हिरालाल पवार, रा. वांजुळपोई, ता. राहुरी, याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला असून या घटनेचा पुढील तपास पोलीस निरीक्षक संजय ठेंगे हे करीत आहेत.

# संजीवनी अकॅडमीच्या बाल तंत्रज्ञांनी राष्ट्रीय स्पर्धेत मिळविली बक्षिसे



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोपरगाव** : संजीवनी अकॅडमीच्या बाल तंत्रज्ञांनी दिल्ली येथे क्रीएटीव्हीटी लिग प्रायोजीत व भारत सरकारच्या इंडियन इन्स्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजी (आयआयटी), दिल्ली आयोजीत राष्ट्रीय तांत्रिक स्पर्धेत तब्बल ६४ हजार रूपयांची बक्षिसे जिंकून आपल्या प्रतिभा संपन्नेतुन तंत्रज्ञ जाणकारीचे प्रदर्शन घडविले. वास्तविक संपुर्ण देशातील मोठ्या महानगरातील स्पर्धक असुनही संजीवनी अकॅडमी सारख्या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी संजीवनी मिळालेल्या तांत्रिक ज्ञानाच्या जोरावर रोबोवार व रोबोक्स्ट प्रकारात नैपुण्य मिळविले. संजीवनीच्या बालकांची तंत्रज्ञानावरील पकड पाहुन दिल्ली येथे संजीवनीचाच बोलबाला पहायला मिळाला. या यशामुळे संजीवनीच्या शिरपेचात अधिकचा एक मानाचा तुरा खोवला गेला आहे, अशी माहिती संजीवनी ग्रुप ऑफ स्कूलच्या संचालिका डॉ. मनाली अमित कोल्हे यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे दिली आहे.

पत्रकात कोल्हे पुढे म्हणाल्या की दिल्ली येथे रोबोक्स्ट स्पर्धेत ओजस अमोल पहिलवान, अमेय योगेश बनकर, उत्कर्ष मुकूल खासणे आणि शाहू प्रसादकुमार निकम यांनी देश पातळीवर ५० स्कूल्सच्या सुमारे ५०० स्पर्धकांमधुन दुसरा क्रमांक मिळविला. त्यांच्या या यशाबध्दल रू ३०,००० किमतीचे ड्रोन बक्षिस मिळाले. याच स्पर्धेत शौर्य अमितकुमार कालगुंडे आणि सार्थक उमेश यांना तृतिय क्रमांक मिळाला. त्यांना रू ४००० किमतीचे रोबोक्स्ट किट बक्षिस मिळाले. रोबोवार प्रकारात प्रज्वल भागवत भड आणि सर्वेश तुषार शेळके यांनी उत्कृष्ट तांत्रिक कौशल्य आणि रणनिती दाखवत देशात दुसऱ्या क्रमांकाचे यश मिळविले. त्यांना रू ३०,००० किमतीचे ड्रोन बक्षिस मिळाले. संजीवनीच्या या बाल तंत्रज्ञांचे यश हे मेहनत, नवकल्पना, संघभावना शिक्षकांच्या सातत्यपुर्ण पाठींब्याचे प्रतिक मानले जाते. या स्पर्धेत देशभरातुन सुमारे ५००० संघांनी भाग घेतला होता.

यापुर्वीही संजीवनी अकॅडमीच्या बाल तंत्रज्ञांनी आयआटी बॉम्बे, आयआटी इंदौर, आयआयटी गांधीनगर, आयआयटी गुवाहाटी येथे तांत्रिक स्पर्धांमध्ये भाग घेवुन यश संपादन केले होते. या सर्वांना संजीवनी अकॅडमीचे टेक्निकल कोच व नॅशनल ट्रॅक रेकॉर्ड असणारे प्रा. गायकवाड यांचे मार्गदर्शन लाभले.

संजीवनीचे अध्यक्ष नितिन कोल्हे, मॅनेजिंग ट्रस्टी अमित कोल्हे, संजीवनी ग्रुप ऑफ स्कूल्सच्या संचालिका डॉ. मनाली कोल्हे यांनी सर्व गुणवंत यशस्वी स्पर्धकांचे व त्यांच्या पालकांची अभिनंदन केले. तसेच या पुढीलही विविध स्पर्धांसाठी शुभेच्छा दिल्या. तसेच प्राचार्या शैला झुंजारराव व हेड मिस्ट्रेस अपर्णा फडणीस यांचेही अभिनंदन केले. मनाली कोल्हे यांनी सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचा व त्यांच्या पालकांचा सत्कार केला. यावेळी संजीवनी इंजिनिअरींग कॉलेजच्या मेकॅट्रॉनिक्स इंजिनिअरींग विभागाचे विभाग प्रमुख डॉ. आर. ए. कापगते यांची प्रमुख उपस्थिती होती.

# नगरपालिका निवडणुकीत प्रशासनाची मोलाची कामगिरी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : नऊ वर्षाच्या दीर्घ कालावधीनंतर दोन डिसेंबरला मतदानाने संपन्न झालेल्या नगरपालिका निवडणुकीची मतमोजणी उद्या आहे. यासाठीची सर्व यंत्रणा सज्ज झाली आहे. प्रांत अधिकारी तथा या निवडणुकीचे निवडणूक निर्णय अधिकारी किरण सावंत पाटील यांनी अतिशय कौशल्याने आपले सहकारी सहाय्यक निवडणूक अधिकारी तहसीलदार मिलिंद कुमार वाघ आणि या संपूर्ण निवडणुकीमध्ये अत्यंत मोलाची भूमिका बजावणारे दुसरे सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी नगरपालिकेचे मुख्याधिकारी मच्छिंद्र घोलप यांच्या सहकार्याने निवडणुकीचे अतिशय चांगले नियोजन केले. मतदार याद्या प्रसिद्ध करणे,त्यावर सूचना हरकती मागविणे, याद्या अंतिम करणे,निवडणूक प्रक्रिया सुरू असताना नामनिर्देशन पत्रे दाखल करून घेणे, आवश्यक तेथे सुनावणी घेणे, निवडणूक इतर कामे,मतदान केंद्राचे नियोजन, तेथे कर्मचाऱ्यांची नियुक्ती, मतदानाच्या दिवशी कोणतीही तक्रार न येता सुरळीतपणे मतदान प्रक्रिया पार पाडणे, यासाठी कर्मचाऱ्यांचे योग्य नियोजन करून जबाबदाऱ्या निश्चित करणे,मतदानानंतर मतपेट्या सुरक्षित ठेवणे,अचानकपणे निवडणुकीची मतमोजणी पुढे ढकलली गेल्याने यंत्रणेवर मोठा ताण आला.त्यासाठी स्ट्राँग रूम आणि त्याची व्यवस्था अत्यंत चोख ठेवण्यात निवडणूक यंत्रणेने महत्त्वाची भूमिका बजावली. मतदानाच्या दिवशी जवळपास एक हजार कर्मचाऱ्यांना सोबत घेऊन अतिशय नियोजनबद्धपणे निवडणुकीचे कामकाज पार पाडण्यात आले.मतदान केंद्रावर कोणत्याही प्रकारची तक्रार नाही.मतदान अधिकाऱ्यांना काम करताना अडचणी येणार नाही.त्यांच्या मुक्कामाची सोय करताना त्यांना आवश्यक त्या सर्व सोयी सुविधा पुरविण्याबाबत देखील या तिन्ही अधिकाऱ्यांनी मोठे परिश्रम घेतले.निवडणुकीचे कामकाज करणारी यंत्रणा जर नीटनेटकी आणि निष्णात असेल तर सर्व कामकाज सुरळीत पार पडते असा अनुभव असल्याने सक्षम कर्मचाऱ्यांची टीम प्रत्येक बुथवर नियुक्त करण्यात आली मुक्कामाच्या ठिकाणी गाद्यांची सोय करण्यात आली होती.त्यांना नाष्टा आणि जेवण सुद्धा देण्यात आले. साधारणतः निवडणुकीच्या दिवशी जेवणाची सोय होत नाही.परंतु यावेळी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी कटाक्षाने कर्मचाऱ्यांना कुठलाही त्रास होणार नाही याची खबरदारी घेत सुंदर नियोजन केले. प्रभाग तीन मध्ये आज मतदान होत असताना तेथे सकाळी कर्मचाऱ्यांना थंडीचे दिवस असल्याने गरम पाण्याची सोय करण्यात आली आहे.हे महाराष्ट्रातील बहुतेक पहिलेच उदाहरण असावे.महिला कर्मचाऱ्यांची गैरसोय होणार नाही याची सुद्धा पुरेपूर काळजी घेत त्यांना सोयीच्या ठिकाणी नियुक्त्या देण्यात आल्या. पिंक केंद्रावर सर्वच महिला कर्मचारी नियुक्त असताना त्या केंद्राचे काम अतिशय चांगले झाल्याचे बोलले जात आहे.

## प्रशासनाचे बहुमोल सहकार्य

**निवडणुकीच्या दिवशी आमची नियुक्ती पिंक बूथवर करण्यात आली होती.त्या ठिकाणी नियोजनामध्ये प्रशासनाने सर्व प्रकारचे मोलाचे सहकार्य केले.बाबीसाठी आम्हाला सहाय्यक अधिकारी देखील देण्यात आले.सर्व व्यवस्था अतिशय उत्तम ठेवण्यात आली होती.**

**कल्पना बाविस्कर ,मतदान अधिकारी**




यामध्ये प्रशासनाचे सुयोग्य नियोजन महत्त्वाचे ठरले आहे. मतमोजणी लांबल्याने प्रशासनावर थोडा ताण पडला. मात्र निवडणुकीच्या संपूर्ण काळात सर्व कामकाज व्यवस्थित पार पाडण्यासाठी निवडणूक यंत्रणेची सुयोग्य मांडणी करण्याचे काम मुख्याधिकारी घोलप,तहसीलदार वाघ यांनी प्रांत अधिकारी किरण सावंत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली केले. तिन्ही अधिकाऱ्यांना याबाबतचा दांडगा अनुभव असल्याने कुठेही अडचण आली नाही तसेच तक्रारी देखील निर्माण झाल्या नाहीत विशेष.उद्या मतमोजणी झाल्यानंतर नगरपालिका निवडणुकीची प्रक्रिया पूर्ण होणार आहे. या संपूर्ण प्रक्रियेमध्ये निवडणूक यंत्रणेने जबाबदारीने काम करीत सर्व प्रकारचे कामकाज सुरळीतपणे पार पाडले आहे.महसूल तसेच नगरपालिका विभागातील सर्व कर्मचाऱ्यांनी या निवडणुक कामी स्वतःला झोकून देऊन काम केल्याने सर्व काही सुरळीत झाले आहे. नगराध्यक्ष व नगरसेवक पदाच्या उमेदवारांना देखील सर्व मार्गदर्शन आणि सहकार्य निवडणूक यंत्रणेकडून करण्यात आले. त्यामुळे सर्वच उमेदवारांनी निवडणूक निर्णय अधिकारी किरण पाटील सावंत व त्यांचे सहकारी तहसीलदार वाघ, मुख्याधिकारी घोलप आणि इतर सर्व संबंधितांना धन्यवाद दिले. निवडणूक यंत्रणा हा निवडणूक प्रक्रियेचा महत्त्वाचा दुवा असल्याने तो सुरळीतपणे हाताळण्याचे काम प्रांत अधिकारी यांनी केल्याने सर्वजण त्यांच्या कामाचे कौतुक करीत

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय –कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर–मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer Kakasaheb Babasaheb Nawale To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: Karan Babasaheb Nawale" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, Emal ID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

# अकोल्यात २०० मेगावॅट क्षमतेचा जलविद्युत प्रकल्प होणार

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**प्रवरानगर :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने राज्यातील तीन उदंचन जलविद्युत प्रकल्पासाठी करण्यात आलेल्या सामंजस्य करारामध्ये अकोले तालुक्यात २०० मेगाव्हॅट क्षमतेच्या सरोवर उदंचन जलविद्युत प्रकल्पाचा समावेश असून, सुमारे १०५० कोटी रुपयांच्या गुंतवणूकीतून जलविद्युत प्रकल्प कार्यान्वित होणार असल्याची माहीती जलसंपदा तथा पालकमंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्यात आतापर्यत पंप स्टोरेजमध्ये सुमारे ७६ हजार ११५ मेगाव्हॅट क्षमतेपर्यंत मजल मारली आहे. महाराष्ट्राला पंप स्टोरेज हब बनविण्यासाठी मुख्यमंत्र्यांनी यशस्वी प्रयत्न सुरु केले आहेत.नागपुर हिवाळी आधिवेशना दरम्यान झालेल्या सामंजस्य करारातून २३ हजार ८०० कोटी रुपयांची गुंतवणूक या प्रकल्पांमध्ये होणार असून, या माध्यमातून राज्यात ११ हजार ५०० रोजगार निर्मिती करण्याचे उद्दिष्ट आहे.राज्य सरकारने अकोले येथील सरोवर उदंचन प्रकल्पासह (२०० मेगॅवॉट) पश्चिम घाट (५२०० मेगॅवॉट) व कोयना टप्पा ६ (४०० मेगॅवॉट) आशा तीन प्रकल्पांचे करार मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत जलसंपदा विभागाने कंपन्याशी केले असल्याची माहिती मंत्री विखे पाटील यांनी दिली.

आपल्या जिल्ह्यातील अकोले तालुक्यात १०५० कोटी रुपयांच्या गुंतवणूकीतून सरोवर उदंचन जलविद्युत गुंतवणूक प्रकल्प निर्मितीला प्राधान्य देण्यात आले असून, न्यु एशियन इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीशी सामंजस्य करार झाला असून, २०० मेगाव्हॅट क्षमतेचा प्रकल्प कार्यान्वित होण्यामुळे २हजार एवढी रोजगार निर्मिती होणार असल्याचे मंत्री विखे पाटील म्हणाले.राज्यात उदंचन जलविद्युत प्रकल्पासाठी आतापर्यंत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने ५४ सामंजस्य करार करण्यात आले आहेत. या प्रकल्पामुळे ७६ हजार ११५ मेगाव्हॅट वीजनिर्मिती होणार असल्याचे स्पष्ट करुन मंत्री विखे पाटील म्हणाले की, अकोले येथील प्रकल्पा प्रमाणेच पश्चिम घाट उदंचन जलविद्युत प्रकल्प तसेच कोयना टप्पा ६ उदंचन जलविद्युत प्रकल्प यासाठीही कंपन्यांशी राज्य सरकारने करार केले आहेत. यामुळे राज्यात ४.०६ लाख कोटी रुपये इतकी गुंतवणूक तसेच १ लाखाहून अधिक मनुष्यबळ रोजगार निर्मिती होईल.

## दखल

### झरेकाठी येथे आज विविध कार्यक्रमांचे आयोजन

**झरेकाठी :** माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा शालिनीताई विखे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त तालुक्यातील झरेकाठी येथे धनश्री सुजय विखे पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत विविध शैक्षणिक, पर्यावरणपूरक व सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. जनसेवा फाउंडेशन लोणी अंतर्गत व जनसेवा युवा मंच झरेकाठी यांच्या वतीने हा उपक्रम राबविण्यात येणार आहे. आज शनिवार, दि. २० डिसेंबर रोजी सकाळी नऊ वाजता जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, झरेकाठी येथे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या वेळी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना 'चला शिकूया -झटपट उजळणी' या शैक्षणिक साहित्याचे वाटप व आंबा रोपांचे वाटप करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला जाणार.

### आज जेष्ठ नागरिक आनंद मेळाव्याची मासिक सभा

**शिरसगाव :** श्रीरामपूर येथील जेष्ठ नागरिक आनंद मेळाव्याची मासिक सभा दि २० डिसेंबर रौजी दुपारी चार वाजाता विरंगुळा केंद्रात संपन्न होणार आहे. अशी माहिति अध्यक्ष लक्ष्मण निकम यानी दिली. या मासिक सभेत संघटनेतील दिवंगत सभासदाना श्रद्धांजली वाहण्यात येणार आहे. तसेच इतिवृत वाचन जमाखर्च मांडुन मंजूर करण्यात येणार आहे. डिसेंबर महिन्यात ज्या सभासदाचे वाढदिवस आहेत त्याचा सत्कार करण्यात येणार आहेत. तरी सर्व सभासद बंधु व भगिनीनी उपस्थित राहावे असे आवाहन सचिव प्रभाकर भोंगळे, दामोदर जानराव, प्रा सुभाष लिंगायत, प्रा टी ई.शेळके, प्रा. शंकर अनारसे, प्रा. शिवाजी बारगळ, लेविन भौसले सुरेखा कासार शोभा निकम प्रभा नाईक प्रभा विघातेताई विजय पवार सभारंजक, विजय निर्मळ, अब्दुल रज्जाक पठाण, बाबासाहेब दिघे, प्रवीण साळवे, सी आर भोसले, श्रीराम बोबडे आदी मान्यवरानी केले आहे.

### डॉ. घोलप यांना पीएच.डी.



**राहुरी :** येथील श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे, लोकनेते रामदास धुमाळ कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, राहुरीतील गणित विषयाचे विभाग प्रमुख डॉ. पंकज घोलप यांना मंगळवार दि. १६ डिसेंबर रोजी गणित विषयातील संशोधन कार्याबद्दल सावित्रीबाई फुले विद्यापीठ पुणे यांची विद्यावाचस्पती (पीएच. डी.) पदवी प्रदान करण्यात आली. त्यांनी स्टडी ऑफ सम टॉपिक्स इन फजी ग्राफ्स या विषयात आपला पीएच. डी. शोधप्रबंध सादर केला. या कार्यासाठी त्यांना मार्गदर्शक डॉ. पी. जी. अंधारे (आर. बी. एन. बी. कॉलेज, श्रीरामपूर ) व त्यांचे मार्गदर्शक शिक्षक डॉ. विनायक निकुंभ, गणित विभागप्रमुख, (पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, लोणी ) यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या यशाबद्दल अरुण तनपुरे, हर्ष तनपुरे, सेवानिवृत्त प्राचार्य डॉ.संभाजी पठारे, प्राचार्या प्रो. डॉ. अनिता वेताळ, उपप्राचार्य प्रो. डॉ. राजेंद्र गोसावी, सर्व शिक्षक व शिक्षकेतर सेवक यांच्या वतीने सन्मान करण्यात आला व पुढील संशोधन कार्यास शुभेच्छा देण्यात आल्या.

# संगमनेर तालुक्याला अद्यावत अभ्यासिका : डॉ. जयश्री थोरात

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर :** यशवंतराव चव्हाण यांची समृद्ध वारसदार अशी ओळख असलेली लोकनेते बाळासाहेब थोरात यांनी सहकार, शेती, शिक्षण, ग्रामीण अर्थव्यवस्था, दूध व्यवसाय या सर्व क्षेत्रातून संगमनेर तालुका हा राज्यासाठी आदर्शवत मॉडेल बनवला आहे. याचबरोबर तालुक्यातील युवकांना करिअरच्या विविध संधी उपलब्ध करून दिल्या आहेत. वाचन चळवळ समृद्ध होण्याबरोबर तरुणांना अभ्यासासाठी मदत होण्याकरता ९ अद्यावत अभ्यासिका होणार असून ही राज्यातील आदर्शवत संकल्पना असल्याचे युवक काँग्रेसच्या अध्यक्षा डॉ. जयश्रीताई थोरात यांनी म्हटले आहे.

लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या माध्यमातून राजापूर येथे ग्राम विकास २५१५ अंतर्गत सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वतीने ३० लाख रुपये निधीतून होणाऱ्या अद्यावत अभ्यासिकेच्या भूमिपूजन प्रसंगी कार्यक्रमात त्या बोलत होत्या. यावेळी समवेत रामहरी कातोरे. संतोष हासे, माधव हासे, सौ.लतिका गायकर, कुसुमताई पानसरे, बाबासाहेब गायकर, सोमनाथ हासे, संजय हासे,प्रदीप हासे, अजय हासे, रावसाहेब खतोडे, राजेंद्र खैरनार, विनीत खतोडे,रमेश जाधव, शैला हासे, राजश्री घोलप, जयश्री हासे, मनीषा हासे, देवराम हासे, आनंदा हासे , प्रशांत तिकांडे, बाळासाहेब बर्डे, भास्कर मोहिते, अविनाश शेलकर, भारत हासे, सुशांत हासे, राहुल गायकर, संभाजी हासे, विकास हासे, अमोल साळुंके, आदी मान्यवर उपस्थित होते.

याप्रसंगी बोलताना डॉ. जयश्रीताई थोरात म्हणाल्या की, संगमनेर हे अद्यावत शिक्षणाचे केंद्र झाले आहे. तालुक्यामध्ये विविध भागांमध्ये अद्यावत अभ्यासिका उभारून विद्यार्थ्यांच्या करिअरसाठी महत्त्वाच्या सुविधा करण्याकरता लोकनेते बाळासाहेब थोरात यांनी ९ अभ्यासिकांची संकल्पना राबवली आहे. याप्रसंगी संतोष हासे,बाबासाहेब गायकर यांनीही आपली मनोगती व्यक्त केली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रदीप हासे यांनी केले तर रावसाहेब खतोडे यांनी आभार मानले. यावेळी राजापूर सह परिसरातील नागरिक महिला व युवक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सरपंचानी स्वखर्चातून रस्ता केला

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**राहुरी :** टाकळीमिया येथील वार्ड क्रमांक एक मधील चारी क्रमांक पाच वरील रस्ता मागील ३५ वर्षापासून कोणत्याही सत्ताधाऱ्यांनी केलेला नव्हता ३५ वर्षापासून या रस्त्याकडे ग्रामपंचायतीसह शासनाच्या इतर विभागातून देखील कायम दुर्लक्षित राहिला होता. परंतु येथील जनतेच्या मागणीवरून टाकळीमियाच्या लोकनियुक्त सरपंच लीलाताई गायकवाड व उद्योजक राजू अण्णा गायकवाड यांनी स्वखर्चाने हा रस्ता पूर्णत्वास नेल्याने टाकळीमिया ग्रामस्थांकडून त्यांचे मोठे कौतुक होत आहे.

हा रस्ता करण्यासाठी या परिसरातील नागरिकांनी अनेक वर्षे पाठपुरावा केला होता तरीही हा रस्ता प्रलंबितच राहिला होता. परंतु येथील ग्रामस्थांनी सरपंच लीलाताई गायकवाड व उद्योजक राजू गायकवाड यांना या रस्ता करण्याचे साकडे घातल्याने ग्रामस्थांच्या मागणीमुळे सरपंच यांनी या रस्त्याच्या कामासाठी कोणत्याही निधीची वाट न बघता स्वखर्चाने हा रस्ता केल्याने ग्रामस्थांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. याप्रसंगी ग्रामपंचायत सदस्य विजय जुंदरे, गोपीनाथ सोनवणे, बाबासाहेब जुंदरे ,नाना जाधव ,गोपीनाथ जुंदरे, विलास निमसे, शिरीष निमसे, यासीन शेख, पिनू जाधव, शौकत शेख, शहाजी मोरे, डॉ. दळवी, हसन शेख, इरफान शेख, भाऊसाहेब गडगुळे, रावसाहेब लांडगे, हरिभाऊ लोंढे, निजामभाई, सारिका जाधव, दळवी मॅडम, रुफाय्या शेख, परीगा बाई जाधव यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# विरोधकांनी विकासाचे स्वप्न दाखवून फक्त दिशाभूल केली : आ.आशुतोष काळे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोळपेवाडी :** कोपरगाव नगरपरिषद निवडणूक प्रचाराच्या माध्यमातून विरोधकांच्या तोंडून विकासाच्या गप्पा कोपरगावकरांना ऐकायला मिळाल्या आणि त्यांनी नेहमीप्रमाणे विकासाचे स्वप्न दाखवत आहे जे आजपर्यंत कधीच त्यांनी पूर्ण केलेले नाही आणि यावेळी सुद्धा करणार नाही. कारण ४० वर्ष कोपरगाव नगरपरिषदेची सत्ता त्यांच्या ताब्यात होती तरी त्यांना कोपरगाव शहराचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविता आला नाही व कोपरगाव शहराचा विकासही करता आला नाही. विकास करण्याच्या भूलथापा देवून त्यांनी नेहमीच कोपरगावकरांची दिशाभूल केली आहे आणि आताही करत आहेत. विरोधक आज विकासाबद्दल जे सांगतात ते त्यांना चाळीस वर्षात का करता आले नाही? असा प्रश्न कोपरगावकरांना पडला आहे. त्यामुळे ज्यांना सत्ता असतांना विकास करता आला नाही ते आता काय विकास करणार? त्यामुळे कोपरगावकरांसाठी हीच नामी संधी आहे. मी दिलेला शब्द पूर्ण करतोच हे



कोपरगावकरांनी पिण्याच्या पाण्याच्या प्रश्नावरून आणि २०१९ पासून कोपरगाव शहराच्या झालेल्या विकासावरून पाहिले आहे. त्यामुळे कोपरगावकरांच्या मनातील विकास सत्यात उतरविण्यासाठी कोपरगाव नगरपरिषदेच्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नगराध्यक्ष आणि नगरसेवक मोठ्या मताधिक्याने निवडून द्या असे आवाहन आ.आशुतोष काळे यांनी केले आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसचे नगराध्यक्ष आणि नगरसेवक पदाच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ गुरुवार (१८) रोजी आयोजित करण्यात आलेल्या प्र.क्र.०७ व प्र.क्र.१५ मधील कॉर्नर सभेत नागरीकांशी आ.आशुतोष काळे यांनी संवाद साधला याप्रसंगी ते बोलत होते. ते पुढे म्हणाले की, विरोधकांकडे चाळीस वर्ष सत्ता असूनही त्यांनी कोपरगावकरांना मुलभूत सुविधांपासून वंचित ठेवले आहे. विरोधकांच्या नेहमीच्या भूलथापांना फसायचे की, विकासाला साथ द्यायची याचा विचार करा. मी दिलेला शब्द आणि दिलेली आश्वासने पूर्ण करून कोपरगावचा शाश्वत विकास झाला असून शहराचा विकास अधिक गतिमान आणि लोकाभिमुख होण्यासाठी विकासात आडवे येणाऱ्या विरोधकांना सत्तेपासून दूर ठेवा.

कोपरगाव शहरात मागील चाळीस वर्षापासून रखडलेली विकासाची कामे प्रगती पथावर आहे. पुढच्या तीन वर्षात शहराचे मुलभूत प्रश्न सोडवून शहराचा सर्वांगीण विकास करण्याचे माझे स्वप्न आहे. सहा वर्षांपासून कोपरगावचे अनेक दशकापासुंचे प्रलंबित प्रश्न सोडवत आहे. पुढच्या काळात कोपरगाव शहराला नव्या उंचीवर घेऊन जायचे आहे. शहराचा विकास साधण्यासाठी पालिकेची सत्ता असणे अत्यंत आवश्यक असून प्रत्येक प्रभागाचा सर्वांगीण विकास करण्यासाठी सक्षम आणि विकासाभिमुख प्रतिनिधी निवडणे गरजेचे आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार हे विकासाचे प्रतिनिधी असून, त्यांच्या माध्यमातून कोपरगावच्या प्रगतीचा वेग अधिक वाढणार आहे.त्यासाठी माझ्या विचाराचे प्रतिनिधी आणि काकांसारखा अनुभवी साथीदार नगरपालिकेत असणे आवश्यक आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसचे नगराध्यक्षपदाचे उमेदवार काका कोयटे हे गेल्या अनेक वर्षांपासून सामाजिक क्षेत्रात कार्यरत असून समाजाच्या प्रत्येक घटकासाठी त्यांचे योगदान आहे. समता उद्योग मंदिराच्या माध्यमातून शेकडो महिलांना रोजगार उपलब्ध करून देत महिलांना स्वावलंबी बनवण्याचे महत्त्वपूर्ण काम ते करीत आहे. कोपरगावच्या सर्वांगीण विकासासाठी समाजाची जाण असलेला, सामाजिक भान ठेवणारा व्यक्ती काकासाहेब कोयटे यांच्या रूपाने नगराध्यक्ष म्हणून शहराला मिळाला, तर कोपरगावचा चेहरा-मोहरा निश्चितच बदलणार आहे. कोपरगाव नगरपालिका निवडणुकीच्या माध्यमातून शहरात परिवर्तनाची लाट सुरू आली आहे वर्षानुवर्ष सत्ता असूनही विकास करू न शकणाऱ्या विरोधकांना सत्तेपासून दूर ठेवण्याची ही संधी न गमावता राष्ट्रवादी काँग्रेसचे नगराध्यक्ष व नगरसेवकांना बहुमताने विजयी करा असे आवाहन आ.आशुतोष काळे यांनी यावेळी केले.

# विज्ञान प्रदर्शनात पाथरे विद्यालयाचे घवघवीत यश

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**झरेकाठी :** नुकत्याच पार पडलेल्या राहाता तालुका गणित विज्ञान व कला प्रदर्शन-२०२५ श्री यशवंतराव चव्हाण विद्यालय राजुरी तालुका राहाता येथे संपन्न झाले.



यामध्ये उद्घाटन समारंभात विद्यालयाचे प्राचार्य बारगुजे यांचा राहता तालुका कृतिशील मुख्याध्यापक पुरस्कार देऊन मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुष्मिता विखे पाटील यांनी सत्कार केला. श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय पाथरे बुद्रुक ता. राहाता विद्यालयातील इयत्ता पहिली ते पाचवीमध्ये कुमारी समृद्धी महाले हिच्या मॅप कॅल्क्युलेशन ग्राफ या उपकरणास उत्तेजनार्थ स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र तसेच इयत्ता नववी ते बारावीमध्ये चिरंजीव कृष्णा उमाकांत कडू यास नदीजोड प्रकल्पसाठी उत्तेजनार्थ स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र तर विज्ञान परिचार गटातून नवनाथ मोरे यांना माजी प्रयोगशाळा या उपकरणास द्वितीय क्रमांक तर शिक्षक गटामध्ये विद्यालयाच्या विज्ञान शिक्षिका अनिता नळे यांना बायटेनियस या उपकरणास द्वितीय क्रमांक स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र तसेच विद्यालयातील कला शिक्षक राधाकृष्ण को-हाळे यांना कला विभागात तृतीय क्रमांकाचे स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी माजी मंत्री अण्णासाहेब म्हस्के यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी स्थानिक स्कूल कमिटीचे अध्यक्ष मारुती गोविंद गोरे पाटील होते. यावेळी गटशिक्षणाधिकारी राजेश पावसे, विस्तार अधिकारी विष्णू कांबळे, केंद्रप्रमुख कानिफनाथ कोळेकर, विद्यालयाच्या प्राचार्य सातपुते, प्रा. बारगजे, मुख्याध्यापक संजय उंबरकर, प्रवरा कलाध्यापक संघाचे अध्यक्ष राजेंद्र तुपे राहाता तालुका गणित विज्ञान कला संघटनेचे अध्यक्ष डॉ. संदीप म्हस्के ड. गोरे यांचे सह पालक, शिक्षक -शिक्षिका, विद्यार्थी -विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.पुरस्कार प्राप्त विद्यार्थ्यांचे, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे, माजी खा. डॉ. सुजय विखे, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष शालिनीताई विखे, स्मितताई विखे, स्थानिक स्कूल कमिटीचे उपाध्यक्ष आबासाहेब घोलप, सरपंच उमेश घोलप, उपसभापती अण्णासाहेब कडू, बलराज पाटील यांच्यासह ग्रामस्थांनी अभिनंदन केले आहे.

# कडाक्याच्या थंडीने गहू पिकाला 'सोनेरी' बहार

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**प्रवरानगर. :** अहिल्यानगर जिल्ह्यात अलीकडेच वाढलेल्या कडाक्याच्या थंडीमुळे गहू पिकाला मोठा लाभ होत असून शेतशिवारात सध्या गव्हाची जोमदार व उत्साहवर्धक वाढ पाहायला मिळत आहे. दरवर्षी डिसेंबरजानेवारी महिन्यातील थंडी गहू पिकासाठी वरदान मानली जाते आणि यंदा तर तापमानातील लक्षणीय घसरण गहू उत्पादनाच्या दृष्टीने अत्यंत अनुकूल ठरत असल्याचे चित्र आहे.

गेल्या दहा ते पंधरा दिवसांपासून सकाळ व संध्याकाळी जाणवणाऱ्या वाढलेल्या थंडीमुळे गहू पिकातील पाने गडद हिरवी, तजेलदार व सशक्त दिसत आहेत. दिवसा मध्यम तापमान आणि रात्री नीचांकी तापमान अशी स्थिती गहू पिकाच्या वाढीसाठी आदर्श असल्याचे कृषी तज्ज्ञांचे मत आहे. या हवामानामुळे मुळांची वाढ चांगली होत असून फुटवे जोमाने वाढत आहेत. परिणामी, पिकाची घनता आणि उत्पादनक्षमता वाढण्यास मदत होत आहे.

जिल्ह्यातील अनेक तालुक्यांमध्ये शेतकऱ्यांमध्ये यंदाच्या रब्बी हंगामाबाबत विशेष आशावाद दिसून येत आहे. काही शेतकऱ्यांनी सांगितले की, यंदा थंडी वेळेवर व योग्य प्रमाणात आली आहे. पिकाची वाढ अत्यंत समाधानकारक आहे. पानांना चांगला तजेला आला असून आतापर्यंत रोगराईचे प्रमाणही कमी आहे. जर असेच हवामान कायम राहिले, तर यंदा गव्हाचे उत्पादन मागील वर्षाच्या तुलनेत निश्चितच अधिक येईल, अशी भावना अनेक शेतकऱ्यांतून व्यक्त होत आहे.

> यंदाची थंडी गहू पिकासाठी खूपच फायदेशीर ठरली आहे. गेल्या काही दिवसांत पिकाची वाढ लक्षणीय दिसून येते. गव्हाची पाने गडद हिरवी व तजेलदार झाली आहेत, फुटवेही चांगले फुटत आहेत. आतापर्यंत कुठलाही मोठा रोगराईचा त्रास जाणवत नाही. थंडी अशीच टिकून राहिली आणि हवामानाने शेवटपर्यंत साथ दिली, तर यंदा गव्हाचे उत्पादन निश्चितच चांगले येईल, अशी आमची अपेक्षा आहे.

थंडीमुळे गव्हामध्ये दाणे भरण्याच्या टप्प्यातही चांगला परिणाम होण्याची शक्यता असून, उत्पादनाची गुणवत्ता वाढण्यास मदत होणार आहे. गव्हाच्या कणसांची वाढ सुरळीत होण्यासाठी थंड व कोरडे वातावरण अत्यंत उपयुक्त ठरते. यंदाच्या हवामानामुळे हा काळ गहू पिकासाठी पोषक ठरत असल्याचे शेतकरी वर्गाचे निरीक्षण आसल्याची माहिती मिळत आहे..दरम्यान, हवामानातील संभाव्य अनिश्चिततेचा विचार करता शेतकऱ्यांनी सिंचन व्यवस्थापनाकडे विशेष लक्ष देण्याचे आवाहन कृषी विभागाने केले आहे. दवाचा परिणाम कमी करण्यासाठी सकाळी लवकर सिंचन टाळावे, त्याऐवजी दुपारी किंवा संध्याकाळी हलके सिंचन करावे, असा सल्ला देण्यात आला आहे. तसेच पानांवर रोगांचा प्रादुर्भाव होऊ नये यासाठी नियमित पाहणी करून गरज भासल्यास संरक्षणात्मक फवारणी करावी, असे मार्गदर्शन प्रादेशिक कृषी तज्ज्ञांनी केले आहे.

हवामान खात्याच्या अंदाजानुसार थंडीचे हे वातावरण मकर संक्रांतीपर्यंत टिकून राहण्याची शक्यता आहे. त्यामुळे येत्या काही दिवसांत गहू पिकाची वाढ याच गतीने सुरू राहील, अशी अपेक्षा आहे. अखेरपर्यंत हवामानाने साथ दिल्यास अहिल्यानगर जिल्ह्यातील गहू उत्पादनात लक्षणीय वाढ होईल, असा विश्वास शेतकरी व्यक्त करत आहेत. शेतशिवारात सध्या दिसणारी हिरवळ आणि पिकाचा जोम पाहता यंदाचा रब्बी हंगाम शेतकऱ्यांसाठी दिलासादायक ठरेल, अशी चिन्हे स्पष्टपणे दिसून येत आहेत.

# कॅप्टन डॉ. राजेंद्र पवार यांना बेस्ट एन.सी.सी. ऑफिसर अवॉर्ड

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**लोणी :** लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या येथील पद्मश्री विखे पाटील महाविद्यालयातील एन.सी.सी. ऑफिसर कॅप्टन डॉ. राजेंद्र पवार यांना राज्यस्तरीय बेस्ट एन.सी.सी. ऑफिसर अवार्ड नुकताच प्रदान करण्यात आल्याची माहिती महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. रामनाथ पवार यांनी दिली.

असोसिएट एन.सी.सी. ऑफिसर वेल्फेअर बोर्ड, महाराष्ट्र राज्य यांच्या पुढाकाराने राष्ट्रीय छात्र सेना अधिकारी सन्मान सोहळा नुकताच कुर्ला, मुंबई येथे दिमाखात झाला. हा सोहळा औरंगाबाद ग्रुपचे माजी ग्रुप कमांडर ब्रिगेडिअर शिरीष ढोबळे, कॅप्टन मनोज भामरे, कॅप्टन आशिष दामले, प्रा. सुमन सिंग यांच्या हस्ते दिमाखात पार पडला. एन.सी.सी.च्या माध्यमातून तरुण पिढीला शिस्तबद्ध, जबाबदार व देशप्रेमी घडवणाऱ्या अधिकारी वर्गाच्या कार्याचा गौरव करण्यासाठी या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.



कॅप्टन डॉ. राजेंद्र पवार यांनी शिस्तबद्ध प्रशिक्षण, आदर्श नेतृत्व आणि प्रभावी सामाजिक सहभागाच्या माध्यमातून पी.व्ही.पी. महाविद्यालयाच्या एन.सी. सी. युनिटमध्ये उल्लेखनीय परिवर्तन घडवून आणले आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक कॅडेट्सनी राष्ट्रीय स्तरावरील शिबिरांत सहभाग नोंदवला असून अनेकांनी संरक्षण दलात तसेच नागरी सेवांमध्येही यशस्वीरीत्या स्थान मिळवले आहे. त्यांनी रक्तदान शिबिरे, पर्यावरण जनजागृती उपक्रम, तसेच सी.ए.टी.सी शिबिरांचे उत्तम नियोजन अशा प्रभावी उपक्रमांचे नेतृत्व केले असून यामुळे कॅडेट्समध्ये कौशल्य विकास आणि सामाजिक जबाबदारीची भावना दृढ झाली आहे. प्रशिक्षण, प्लेसमेंट आणि समाजोपयोगी उपक्रमांमधील त्यांच्या सातत्यपूर्ण उत्कृष्ट कामगिरीमुळे ते बेस्ट एन.सी.सी. ऑफिसर अवार्ड साठी अत्यंत पात्र ठरतात. महाविद्यालयाच्या माध्यमातून एन.सी.सी. तून अनेक विद्यार्थी हे आर्मी आणि पोलीस भरतीमध्ये सहभागी झाले आहेत याशिवाय या ठिकाणी विविध विषयावरती आर्मीचे प्रशिक्षण देखील दिले जाते आणि याच माध्यमातून प्रवरेचा एन.सी.सी. हा राज्यामध्ये अव्वल स्थानावर पोहोचला आहे.

त्यांच्या या यशाचे संस्थेचे अध्यक्ष तथा जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, माजी मंत्री अण्णासाहेब म्हस्के, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्ष शालिनीताई विखे पाटील, विखे पाटील कारखान्याचे अध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील, संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुस्मिता विखे पाटील, सहसचिव भारत घोगरे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. शिवानंद हिरेमठ, शिक्षण संचालक डॉ. प्रदीप दिघे आदींसह महाविद्यालयातील प्राचार्य, उपप्राचार्य आणि प्राध्यापकांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

तहसिल कार्यालय नेवासा
क्रमांकः/जन्म-मृत्यु/एसआर/१७४/२०२५
नेवासा दिनांक. ११/१२/२०२५

**जाहिर प्रगटन**

अर्जदार श्री/श्रीम- सोपान नामदेव नागदे रा.लोहोगाव, ता. नेवासा यांनी तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी नेवासा यांचे कार्यालयास अर्ज सादर करुन श्री/श्रीम.कै.नामदेव सिताराम नागदे यांचा महाराष्ट्र जन्म मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३(३) अन्वये मृत्यू नोंद गावी जन्म-मृत्यु रजिस्टरला न झाल्याने सदरची नोंद होणेकामी योग्य तो आदेश देणेत यावा याकामी इकडेस अपिल दाखल केले आहे. सदरच्या अर्जात खालील प्रमाणे मृत्यू नोंद होणे बाबत नमुद केलेले आहे. अ.क्र. १, मृत्यू नोंद घेण्यात येणाऱ्या व्यक्तीचे नाव-कै. नामदेव सिताराम नागदे, गावाचे नाव-लोहोगाव, मृत्यू दिनांक-०६/०९/२००९ करिता या जाहिर प्रगटनादवारे सुचित करण्यात येते की, वरील व्यक्तीचे महाराष्ट्र जन्म-मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३(३) अन्वये मृत्यू नोंद गावी जन्म-मृत्यु रजिस्टरला घेणेबाबत कोणाचे आक्षेप असल्यास आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रतीसह आक्षेप लेखी स्वरुपात या जाहीर प्रगटना तारखेपासुन १५ दिवसाचे आत सादर करावा. मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास संबधित निबंधकास जन्म मृत्यु नोंदणी पुस्तकामध्ये नोंद करणेबाबत आदेशीत करण्यात येईल.

**तहलिसीर तथा
कार्यकारी दंडाधिकारी नेवासा**

# मनुष्याचे अज्ञान व भय दूर करण्याचे कार्य गंगागिरी महाराजांनी केले : महंत रामगिरी महाराज

## गंगागिरी महाराज १२३ व्या पुण्यतिथी सोहळ्याची सांगता

**वैजापूर :** मनुष्य देह मिळाल्यानंतर या जन्माचे नेमके प्रयोजन काय आहे, हे प्रत्येकाला कळणे गरजेचे आहे. मृत्यूलोकात माणूस स्वार्थासाठी जागा आहे, पण आत्मकल्याणासाठी अज्ञानी आहे आणि लोकांचे हे अज्ञान व भय दूर करण्याचे कार्य सद्गुरु गंगागिरी महाराज व संतानी सोप्या साध्या शब्दातील ग्रंथ विचारातून केले म्हणूनच संतांचे विचार आजही सुर्यासारखे प्रखर आहेत. या विचारांचे सर्वांकडून आचरण होणे हाच खरा परमार्थ आहे असे प्रतिपादन महंत रामगिरी महाराजांनी केले.

लाखो भाविकांचे श्रध्दास्थान गोदाधाम सराला बेटाचे योगीराज सद्गुरु गंगागिरी महाराज यांच्या १२३ व्या पुण्यतिथी महोत्सवात (दिं .१९) मै भुली घर जाने बाट,गोरस बैचनै आयी हाट,कान्हारे मन म ोहनलाल या गौळणी वर विवेचन करत गुरुचरित्रावर प्रकाशावर '

निरुपण महंत रामगिरी महाराजांनी केले. महाराज म्हणाले, माणसाने काही गोष्टी विचारल्या तर सांगाव्यात, काही गोष्टी विचारल्या तरी सांगू नयेत आणि काही गोष्टी नाही विचारल्या तरी सांगाव्यात हे तत्वज्ञान प्रत्येकाला कळावे यासाठी संत विचार आहेत. मृत्यूलोकात माणूस स्वार्थासाठी जागा,पण आत्म कल्याण, स्वहितासाठी तो अज्ञानी आहे आणि म्हणूनच जन्म-मरणाचा फेरा संपत नाही.

समाजातील लोकांचे अज्ञान दूर करण्याचे कार्य सर्व संतांनी केले. त्यासाठीच त्यांनी कोणी विचारले नाही तरी सम ाजाला त्यांच्या हितासाठी उपदेश केला. कारण अज्ञानी माणसाला उपदेश करण्याचा अधिकार संतांना होता. संतांनी केलेला उपदेश लोकांच्या भल्यासाठीच आहे, म्हणून संत विचार अंगीकारा, आचरणात आणा असे आवाहन कीर्तनातून रामगिरी महाराजांनी केले. महाराज म्हणाले, हजारो वर्षांपासून कुंभमेळ्याची परंपरा आहे नाशिक येथे होणाऱ्या कुंभमेळा साठी साधुग्राममधील काही झाडे तोडली जात असेल तर त्याच्या दुप्पट झाडे दुसऱ्या ठिकाणी लावावी परंतु कुंभमेळ्याला काही लोक विरोध करत



आहे ते चुकीचे आहे कारण साधुसंत जगाच्या कल्याण करिता असतात ते पर्यावरणाला विरोध करू शकत नाही सामंज्यातुन मार्ग काढावा व कुंभमेळा यशस्वी करावा असे महाराज यांनी आव्हान केले,वेदात विश्वाला सामावून घेणारे ज्ञान आहे, परंतू वेदातील हे ज्ञान अज्ञानी समाजाला कळावे यासाठी श्रृती,स्मृती नंतर उपनिषेद त्यानंतर भगवतगितेत हे ज्ञान मनुष्यापर्यंत पोहचवण्यात आले त्याहीपुढे जावून संत ज्ञानेश्वर माऊलींनी भावार्थ दिपीका अर्थात ज्ञानेश्वरीतून हे ज्ञान सोप्या-साध्या भाषेतून समाजापुढे मांडले.

अंधकाराकडून प्रकाशाकडे नेण्याचे महत कार्य सर्व संतांनी केले आहे असे महाराज म्हणाले. आहार, भय, निद्रा आणि मैथून या चार गोष्टीपेक्षा मनुष्याकडे विशेष ज्ञान आहे त्याव्दारे मनुष्याला देवत्व प्राप्त होवू शकते हे ज्ञान संतांनी माणसाला दिले म्हणून जीवनाचे कल्याण करा, मनुष्य देह दुर्लभ आहे ते समजून घेण्याची आवश्यकता आहे. कीर्तन परंपरा समाजाला जगण्याची उर्मी देत आली आहे. ही परंपरा जोपासण्यासाठी

> श्री क्षेत्र सरला बेटावर लाखो भाविक येतात त्यामुळे बेटाचा नियोजित विकास आराखडाचा गोदावरी नदीच्या मध्य बेट असल्यामुळे संरक्षण भित, बांधकाम, अंतर्गत रस्ते अशा विविध १०९ कोटी रुपयांचा प्लन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या बरोबर बैठक घेवून मार्गी लावुन भाविकांना सुख सुविधा उपलब्ध करून देणार आहे.
>
> **– गिरीश महाजन**

प्रत्येकाने पुढाकार घेण्याची गरज आहे असेही महाराज कीर्तनाच्या समारोपात म्हणाले.

ऋषी व कृषी संस्कृती मुळे देश व राज्य महासत्तेकडे प्रवास करत आहे.बेटात संत समाधी दर्शनाने मन निर्मळ होत असल्याने चारीधाम करण्याची गरज नाही भेट दर्शनानेच शरीराचं पुण्य पदरी पडते असे महाराज म्हणाले.

बेटाच्या परंपरेने चालत आलेल्या आमटी - भाकरी महाप्रसादाच्या पंगती सात दिवस अविरत चालू होत्या.यावेळी महायुतीच्या सरकारच्या माध्यमातून झालेल्या सत्संग भवन पत्रा डोम ७ कोटी, लाडगाव ते सरला बेट डांबरीकरण रस्ता ८ कोटी, माळेवाडी ते सरला बेट डांबरीकरण रस्ता १० कोटी गोदावरी नदीवरील पूल ५ कोटी अशा २१ कोटी रुपये विकासकांमाच लोकार्पण जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांच्या हस्ते झाले.

यावेळी माजी खा. सदाशिव लोखंडे, आ. रमेश बोरणारे,माजी नगराध्यक्ष दिनेश परदेशी, माजी सभापती अविनाश गंलाडे, बाळासाहेब संचेती, धनंजय धोर्ड, कल्याण दांगोडे, पंकज ठोंबरे, वंदना मुरकुटे, बाळासाहेब चिडे, बाळासाहेब कापसे, सुनील रक्टे,ब्रदीनाथ चव्हाण, ज्ञानेश्वर जगताप, सचिन वाणी, सरला बेटाचे विश्वस्त म धुकर महाराज यांच्यासह लाखो भांविक उपस्थित होते.

## निधन वार्ता..

### माधवराव पवार



**शिरसगाव :** येथील प्रगतिशील शेतकरी माधवराव बळवंतराव पवार (वय ७३) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले आहे. त्यांचे मागे पत्नी एक मुलगा, एक मुलगी, असा परिवार आहे. बाळासाहेब यांचे ते वडील होत.

### शकुंतला त्रिभुवन



**शिरसगाव :** हरिगांव चर्चगेट येथील शकुंतला बाई बाबूराव त्रिभुवन (वय ८८) यांचे वृद्धापकाळाने दुखःद निधन झाले. त्यांचे मागे दोन मुले दोन मुली नातवंडे असा परिवार आहे.

### शुभानंद भोसले



**शिरसगाव :** रिक्षा चालक मालक संघटनेचे अध्यक्ष हरिगांव आनंद नगर येथील शुभांनंद सदानंद भोसले (वय ५८) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले आहे. त्यांचे मागे पत्नी एक मुलगा, एक मुलगी असा परिवार आहे. हर्षल यांचे ते वडील होत.

# 'रक्षामंत्री पुरस्कार' अधिकारी व मुख्याध्यापकांचा भिंगारमध्ये गौरव

**अहिल्यानगर :** पीएम श्री योजनेअंतर्गत शैक्षणिक गुणवत्ता, सहशालेय उपक्रम, अद्ययावत भौतिक सुविधा व विद्यार्थीकेंद्रित शिक्षणपद्धतीद्वारे छावणी परिषद अहिल्यानगर अंतर्गत शाळांचा सर्वांगीण कायापालट केल्याबद्दल महानिदेशक रक्षासंपदा विभाग, नवी दिल्ली यांच्या वतीने दिला जाणारा राष्ट्रीय पातळीवरील प्रतिष्ठेचा 'रक्षामंत्री पुरस्कार' छावणी परिषद अहिल्यानगर यांना प्राप्त झाला आहे. या गौरवाबद्दल हरदिन मॉर्निंग ग्रुपच्या वतीने छावणी परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व मुख्याध्यापकांचा सत्कार करण्यात आला.

भिंगार येथील भगवान गौतम बुद्ध जॉगिंग पार्क परिसरात आयोजित कार्यक्रमात छावणी परिषदेच्या मुख्यकार्यकारी अधिकारी पल्लवी विजयवंशी, छावणी परिषद शाळांचे मुख्याध्यापक संजय शिंदे, मुख्याध्यापक राजेंद्र भोसले व मुख्याध्यापिका मुबिना सय्यद यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी सैन्यदलात भरती झाल्याबद्दल शिवतेज देविदास गंडाळ तसेच आर्मड कोअर सेंटर येथे इंजिनिअर सेक्शन हेड पदी नियुक्त झालेले संतोष मधुकरराव ससे यांचा देखील सन्मान करून राष्ट्रसेवेबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.

या सन्मान सोहळ्यासाठी संस्थापक अध्यक्ष संजय सपकाळ, सचिन चोपडा, सर्वेश सपकाळ, जहीर सय्यद, ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज अनावडे, अभिजीत सपकाळ, दिलीपराव ठोकळ, दिपकराव धाडगे, मनोहर दरवडे, दिनेश शहापूरकर, दिलीप गुगळे, संजय भिंगारदिवे, अविनाश जाधव, सुधीर कपाळे, दीपक घोडके, प्रांजली सपकाळ, सुरेखा आमले, गुरुद्याल कौर मिनहास, कविता भिंगारदिवे, सुवर्णा महागडे-भिंगारदिवे,विलास आहेर, शशांक अंबावडे, परेश मेवानी, अनंत सदलापूरकर, मुन्ना वाघस्कर, कुमार धतुरे, मुकेश मुथियान, संतोष ससे, देविदास गंडाळ, इंजि. नागेश खुरपे आदी ग्रुपचे सदस्य उपस्थित होते.

## पान १ वरुन

पान १ वरुन

### माणिकराव कोकाटे यांच्या शिक्षेला उच्च न्यायालयाची स्थगिती

मुंबई उच्च न्यायालयातील सुनावणीदरम्यान, लीलावती रुग्णालयातील डॉक्टर जलील पारकर यांनी माणिकराव कोकाटेंबाबत दिलेला अहवाल कोर्टात सादर करण्यात आला. कोकाटेंच्या वकिलांनी त्यांचा मेडिकल रिपोर्ट मांडला. आयसीयूच्या बेड नंबर ९ मध्ये दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर अँजिओग्राफी करण्यात येणार असल्याचं या वैद्यकीय अहवालात म्हटलं होतं.

### तिरंगी नव्हे, ही शिवसेनेची भगवी एकरंगी निवडणूक

काढण्यासाठीचा अधिकार आपण महिलांना मिळून दिला यापेक्षा आनंद दुसरा कोणताच नाही, असे शिंदे यांनी सांगून ही निवडणूक लाडक्या बहिणींनी हातात घेतली आहे. त्यामुळे शिवसेनेचा येथे विजय हा नक्की आहे.

### आ.संग्राम जगताप यांना मंत्रिपदी संधी?

आहेत.महायुती सरकारमध्ये खातेवाटपावरून आधीच नाराजीचे सूर उमटत असताना, कोकाटे यांच्या खात्याचे पुनर्वाटप मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासाठी समन्वयाची कसोटी ठरणार आहे. भाजप, शिवसेना (शिंदे गट) आणि राष्ट्रवादी यांच्यातील संतुलन राखण्याची जबाबदारी फडणवीस यांच्यावर आहे. लोकसभा आणि आगामी म हापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर सामाजिक समतोल महत्त्वाचा ठरणार आहे.अहमदनगर जिल्ह्यातील राजकीय वर्तुळात संग्राम जगताप यांना मंत्रिपद मिळाल्यास जिल्ह्याच्या विकासाला गती मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. मात्र, अंतिम निर्णय अजित पवार आणि फडणवीस यांच्यातील चर्चेनंतरच होईल.

### आज मतदान

मतमोजणीची प्रक्रिया २१ डिसेंबर रोजी सकाळी १० वाजता सुरू होईल. ही मतमोजणी २ डिसेंबरला झालेल्या मतदानाची आणि २० डिसेंबरला होणाऱ्या मतदानाची एकत्रितपणे होणार असल्याने, सर्व निकाल एकाच दिवशी लागतील. राज्य निवडणूक आयोगाने याबाबत सर्व तयारी पूर्ण केली असून, निवडणूक यंत्रणा सज्ज आहे. या निवडणुकांमुळे राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये नवे नेतृत्व निवडले जाईल. मतदारांनी मोठ्या संख्येने मतदान करावे, असे आवाहन निवडणूक आयोगाने केले आहे.

### लिंपणगाव चौफुल्यावर इनोव्हा-दुचाकी अपघातात शेतकरी तरुणाचा मृत्यू

प्रवाशांचा जीव धोक्यात येत आहे.या महामार्गावर काष्टी ते श्रीगोंदा दरम्यान मध्यभागी डिव्हायडर बसवण्याची मागणी वारंवार करण्यात आली, मात्र संबंधित रस्ते विकास महामंडळाकडून अद्याप दुर्लक्ष होत असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. आणखी किती बळी गेल्यावर डिव्हायडर बसवला जाणार? असा संतप्त सवाल प्रवासी व वाहनचालकांकडून उपस्थित केला जात आहे.विशेषतः लिंपणगाव येथे मुंढेकरवाडी रस्ता व श्रीगोंदा रेल्वे स्टेशनकडे जाणाऱ्या चौफुल्यामुळे अपघाताचा धोका अधिक असून, या ठिकाणी तातडीने गतिरोधक बसवावेत, अशी जोरदार मागणी ग्रामस्थ, प्रवासी व वाहनचालकांनी केली आहे.या प्रकरणाचा पुढील तपास श्रीगोंदा पोलीस निरीक्षक किरण शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस नाईक भागवत करीत आहेत.

# शेतकऱ्यांची दिवसाढवळ्या लूट : भास्कर मोटकर

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**पुणतांबा :** कृषी उत्पन्न बाजार समितीचे पदाधिकारी व सचिव तसेच राहाता तहसीलदार यांच्या दुर्लक्षामुळे पुणतांबा परिसरात खाजगी व्यापाऱ्यांकडून शेतकऱ्यांची दिवसाढवळ्या लूट सुरू असून, या प्रकाराला अधिकारी वर्गाचा वरदहस्त असल्याचा आरोप येथील जरांगे पाटील यांचे खंदे समर्थक व जिल्ह्यातील मराठा नेते भास्कर मोटकर यांनी केला आहे.

परिसरात २७ सप्टेंबर रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे खरीप पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले होते. त्यानंतर पिके तयार झाल्यावर आर्थिक अडचणीमुळे शेतकरी पुणतांबा येथे कृषी उत्पन्न बाजार समितीची शाखा नसल्याने नाईलाजाने खाजगी व्यापाऱ्यांना सोयाबीन, म का व कापूस हा शेतमाल विक्री करत आहेत.

मात्र व्यापाऱ्यांकडून शासकीय हमीभावापेक्षा अत्यंत कमी दराने व जाचक अटी घालून खरेदी केली जात असल्याचा आरोप आहे. मक्याचा हमीभाव २,४०० रुपये असताना प्रत्यक्षात १,१०० ते १,४०० रुपये प्रति क्विंटल दराने खरेदी केली जात आहे. सोयाबीनचा हमीभाव ५,३२८ रुपये असतानाही ४,२०० रुपये प्रति क्विंटल दराने, तर कापसाचा हमीभाव ८,१०० रुपये असताना खाजगी व्यापारी केवळ ७,००० रुपये प्रति क्विंटल दराने खरेदी करत आहेत.

याशिवाय प्रत्येक क्विंटलमागे एक किलोपेक्षा जास्त वजनकपात केली जात असल्याची तक्रार शेतकऱ्यांकडून होत आहे. कापूस खरेदीदरम्यान आर्द्रता जास्त असल्याचे कारण व्यापाऱ्यांकडून दिले जाते. मात्र प्रत्यक्षात कापूस ट्रकमध्ये भरताना १,००० लिटर क्षमतेची पाण्याची टाकी जवळ ठेवून कापसावर पाणी मारून कापूस भरला जात असल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. व्यापाऱ्यांची वजन-मापेही सदोष असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे.

या सर्व बाबींविषयी तक्रारी करूनही कृषी उत्पन्न बाजार समितीचे अधिकारी केवळ व्यापाऱ्यांची नावे नमूद करून लेखी निवेदन द्या, असा सल्ला देत असल्याने बाजार समिती, तहसीलदार आणि व्यापारी यांच्यात साटेलोटे तर नाही ना, असा संशय शेतकरी वर्गात निर्माण झाला आहे.

पुणतांबा गाव हे शेतकरी संपाचे केंद्र असतानाही या गंभीर प्रश्नावर सर्वच यंत्रणा बघ्याची भूमिका घेत असल्याचा आरोप करत, हे सरकार शेतकऱ्यांचे आहे की व्यापाऱ्यांचे? असा सवालही मोटकर यांनी उपस्थित केला आहे.

# बंद पडलेले पुलाचे काम तात्काळ सुरू करा, अन्यथा उपोषणाचा इशारा



> घोडेगाव ते डोमेगांव रोडवरील नारळीनदीवर पुलाच्या कामास प्रारंभ होऊन एक वर्ष होत आले.सध्या हे काम चार महीण्यापासुन बंद पडलेले आहे.यामुळे नागरिक, शेतकरी, वाहनधारक,शाळकरी म ुलांना जाण्यायेण्यासाठी मोठा त्रास सहन करावा लागत आहे सदरचे बंद असलेले पुलाचे काम तात्काळ सुरू करुन काम अंदाजपत्रकानुसार करावे अन्यथा बंद असलेल्या पुलाच्या ठिकाणीच ग्रामस्थांना सोबत घेऊन उपोषण सुरू करणार.
>
> **-श्रीराम साळुंके -**
> **माजी सरपंच घोडेगाव.ता.गंगापुर,**

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**गंगापूर :** तालुक्यातील घोडेगाव ते डोमेगांव रोडवरील नारळीनदीवर बंद पडलेले पुलाचे काम तत्काळ चालू करुन काम अंदाजपत्रकानुसार करावे अन्यथा बंद असलेल्या पुलाच्या ठिकाणीच ग्रामस्थांना सोबत घेऊन उपोषण करणार असल्याचा इशारा माजी सरपंचासह ग्रामस्थांनी दिला आहे.

गंगापूर तालुक्यातील घोडेगाव ते डोम ेगांव रोडवरील नारळीनदीवर असलेल्या पुलाच्या बांधकामासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून पाच कोटी रुपये मंजूर असुन या पुलाचे काम धिरज पवार कंपनी कडून जवळपास एक वर्षापासुन काम सुरू केले परंतु हे काम सध्या अर्धवट आहे.

या पुलाचे अत्यंत संथ गतीने सुरू असुन जवळपास एक वर्ष होत आले परंतु अद्याप पर्यंत काम पुर्णत्वास गेले नसल्याने नागरिकांना व शेतकऱ्यांना, वाहनधारकांना येण्या जाण्यासाठी हा एकमेव मार्ग असल्याने या पुलाच्या अपुर्ण कामामुळे नागरिकांना मोठा अडचणीचा सामना करावा लागत असून चार म हीण्यापासुन पुलाचे काम बंद पडलेले आहे. हे काम बंद असल्याने नागरिक व वाहनधारकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

येथील नागरिक व वाहनधारकांना हा एकमेव मार्ग असल्याने या रोडवर नेहमी वर्दळ असते एवढेच शेतकऱ्यांना शेतात जाण्यासाठी मुख्यरस्ता पावसाळ्यात नदीला पूर आल्याने नागरिकांना गावाशी संपर्क तुटला होता सध्या जाण्या येण्यासाठी मोठी तारेवरची कसरत करावी लागत आहे.पुलाचे काम सुरू करावे म्हणून अनेक वेळा बांधकाम विभागाकडे मागणी करुनही काम अद्याप पर्यंत सुरू करण्यात आले नाही बंद पडलेले पुलाचे काम त्वरित सुरू करुन काम अंदाजपत्रकानुसार करावे नसता बंद असलेल्या पुलाच्या ठिकाणीच ग्राम स्थांना सोबत घेऊन उपोषण करणार असल्याचा इशारा माजी सरपंचासह ग्रामस्थांनी दिला आहे.

# विहिरीत बिबट्याची डरकाळी | रेस्क्यू ऑपरेशननंतर अखेर बिबट्या जेरबंद



**दिपक बरकसे । राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर :** तालुक्यातील ग्रामीण भागात सध्या बिबट्याच्या दहशतीने शेतकरी वर्ग हवालदिल झाला असतानाच, शुक्रवारी सकाळी वैजापूर येथील दाणे वस्ती परिसरात एका बिबट्याने थेट शेतकऱ्याच्या विहिरीत उडी घेतल्याची खळबळजनक घटना समोर आली आहे.

दाणे वस्ती येथील गट क्रमांक ४७४ मध्ये असलेल्या गणेश मलिक यांच्या विहिरीत हा बिबट्या पडल्याचे निदर्शनास आले. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात भीतीचे वातावरण पसरले होते. मात्र, स्थानिक तरुणांचे प्रसंगावधान आणि वनविभागाच्या तत्परतेमुळे या बिबट्याला सुरक्षितरीत्या बाहेर काढून जेरबंद करण्यात आले आहे. सुदैवाने, या संपूर्ण थरारात कोणतीही जीवितहानी झाली नाही.

शुक्रवारी सकाळच्या सुमारास नेहमीप्रमाणे शेतकरी गणेश मलिक हे आपल्या शेतात काम करण्यासाठी गेले होते. पिकांना पाणी देण्यासाठी शेतपंप सुरू करण्याच्या उद्देशाने ते विहिरीकडे वळले. विहिरीजवळ पोहोचताच त्यांना आतून आवाज येत असल्याचे जाणवले. त्यांनी विहिरीत डोकावून पाहिले असता, विहिरीच्या काठाला धरून एक पूर्ण वाढलेला बिबट्या बाहेर निघण्यासाठी धडपड करत असल्याचे दिसला. ही माहिती वाऱ्यासारखी पसरताच बघ्यांची मोठी गर्दी जमली.

बिबट्या विहिरीत पडल्याचे समजताच परिसरातील अरविंद दाणे, श्रीराम दाणे, ताराचंद दाणे, सतीश अंभोरे, दत्तू दाने, अजय मलिक, सागर आंबोरे, भगवान दाणे, सागर राजपूत आणि कचरू वाणी यांसारख्या धाडसी तरुणांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली. बिबट्या पाण्यात जास्त वेळ राहिल्यास थकून बुडण्याची भीती होती. त्यामुळे वनविभागाची वाट न पाहता या तरुणांनी माणुसकीच्या नात्याने आणि धाडस दाखवत विहिरीत एक मोठी 'बाज' (खाट) सोडली. बिबट्यानेही जीव वाचवण्यासाठी त्या बाजेचा आधार घेतला आणि तो त्यावर विसावला.


## स्त्री-पुरुष समस्या

मूत्रविकार, मुळव्याध, पोटविकार, रक्तदोष ,मधुमेह, सांधेदुखी, मेंदू दोष, त्वचा विकार, यकृत दोष, हृदयविकार, स्त्रिदोष, श्वसन विकार, लठ्ठपणा, कंठदोष, मनोविकार, व्यसनाधीनता अशा अवघड त्रासांवर खर्च करूनही कोणी वैतागलेले असेल तर गरजवंतांसाठी आमच्याकडे निवडक शुद्ध गुणकारी औषधे हिशोबात उपलब्ध.

**स्थळ : स्वदेशी आयुर्वेद भंडार, भवानी देवी मंदिर जवळ, माळवडगाव ता. श्रीरामपूर,पिन ४१३७३९ जिल्हा अ. नगर**

**व्हॉट्सअप नं. : 9404002783**


## नशिबाची परिक्षा

**शनिवार दि.२० डिसेंबर २०२५**

| मिलनम डे | |
|---|---|
| उदय-अस्त | सिंगल ५-१-९ मजबुत |
| १२६ ४५० १४४ **९-२** १५६ १४७ ११० | जोड ९०-१२-५३ ४८-२७ |

| कल्याण | |
|---|---|
| उदय-अस्त | सिंगल ९-४-५ मजबुत |
| १२३ १५० ११४ **७-४** १३० ६८० ७७० | जोड ६०-१४-५२-३९-४८ |

| मुंबैम (मेन) | |
|---|---|
| उदय-अस्त | सिंगल ४-७-९ मजबुत |
| सुटी | जोड सुटी |

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## शुभ लाभ

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat |
|---|---|---|---|---|---|---|
| 28/04/2025 to 03/05/2025 | 789 43 256 | 128 14 167 | 345 25 168 | 150 69 180 | 136 05 159 | 127 00 569 |
| 05/05/2025 to 10/05/2025 | 135 98 116 | 479 04 112 | 136 03 148 | 123 62 138 | 158 47 269 | 257 45 258 |
| 12/05/2025 to 17/05/2025 | 233 82 336 | 569 00 389 | 278 74 590 | 288 83 157 | 389 08 468 | 690 57 160 |
| 19/05/2025 to 24/05/2025 | 900 99 360 | 190 00 145 | 167 47 340 | 237 21 137 | 179 72 129 | 390 26 367 |
| 26/05/2025 to 31/05/2025 | 148 30 145 | 259 61 128 | 470 16 457 | 125 81 678 | 790 65 690 | 247 38 170 |
| 02/06/2025 to 07/06/2025 | 229 34 455 | 899 62 138 | 778 21 470 | 244 02 336 | 255 23 247 | 110 24 248 |
| 09/06/2025 to 14/06/2025 | 579 11 335 | 990 89 568 | 356 40 578 | 160 76 790 | 158 44 167 | 133 75 159 |
| 16/06/2025 to 21/06/2025 | 578 07 115 | 220 42 138 | 446 48 125 | 148 33 599 | 278 72 390 | 689 34 770 |
| 23/06/2025 to 28/06/2025 | 159 53 247 | 125 81 236 | 279 81 137 | 248 48 800 | 256 31 344 | 349 64 590 |
| 30/06/2025 to 05/07/2025 | 145 06 349 | 470 14 699 | 334 02 660 | 470 15 780 | 369 89 126 | 223 75 267 |
| 07/07/2025 to 12/07/2025 | 189 81 380 | 233 88 224 | 378 88 189 | 699 41 335 | 248 48 125 | 458 77 467 |
| 14/07/2025 to 19/07/2025 | 789 44 248 | 116 85 140 | 138 28 189 | 359 72 138 | 689 36 268 | 678 13 346 |
| 21/07/2025 to 26/07/2025 | 790 68 350 | 678 10 299 | 389 05 456 | 377 71 669 | 378 82 345 | 150 61 678 |

* वरील शुभांक किंवा संख्या या ज्योतिषशास्त्र व संख्याशास्त्रावर आधारित आहेत. या शुभांकांचा कोणताही दुरुपयोग करू नये *

# जामखेड–सौताडा महामार्गाबाबत जिल्हाधिकारी ॲक्शन मोडवर

## ‘रस्ता तात्काळ पूर्ण करा, अडथळे घालणाऱ्यांवर कारवाई’

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**जामखेड :** गेल्या ते तीन वर्षांपासून सुरू असलेल्या जामखेड–सौताडा राष्ट्रीय महामार्गाच्या कामामुळे नागरिकांचे हाल वाढले असून, शहरातील मुख्य असलेला खर्डा चौक ते समर्थ हॉस्पिटल या अंतर्गत रस्त्याचे काम महिनोन्महिने संथगतीने सुरू आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी थेट ॲक्शन मोड मध्ये येत जामखेड तहसील कार्यालयात संबंधित विभागाचे अधिकारी व ठेकेदारांची आढावा बैठक घेतली.

या बैठकीत जिल्हाधिकाऱ्यांनी रस्त्याचे काम तात्काळ पूर्ण करण्याचे स्पष्ट आदेश दिले. रस्त्याच्या कामात कोणीही अडथळा निर्माण करत असल्यास ठेकेदारांनी पोलीस संरक्षण घेऊन थेट कायदेशीर कारवाई करावी, अशा ठाम सूचना त्यांनी दिल्या. रस्त्याच्या कामात कोणतीही दिरंगाई, निष्काळजीपणा खपवून घेतला जाणार नाही, असा स्पष्ट इशाराही जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी दिला. वेळी तहसीलदार धनंजय बांगर, गटविकास अधिकारी शुभम जाधव, पोलीस निरीक्षक दशरथ चौधरी, मुख्याधिकारी अजय साळवे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे शशिकांत सुतार, तालुका कृषी अधिकारी रवींद्र घुले, सहायक निबंधक दिलीप तिजोरे, महावितरणचे चव्हाण यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. अनेक महिन्यांपासून समर्थ हॉस्पिटल ते खर्डा चौक या रस्त्याचे काम अत्यंत संथगतीने असून, यामुळे व्यापारी, विद्यार्थी, रुग्ण व नागरिकांना मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत आहे. या गंभीर बाबीची दखल घेत जिल्हाधिकाऱ्यांनी अधिकारी व ठेकेदारांची झाडाझडती घेत ‘हा रस्ता तात्काळ पूर्ण झाला पाहिजे’ अशा स्पष्ट सूचना दिल्या.

दरम्यान, जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी जामखेड उपजिल्हा रुग्णालयाच्या बांधकामाची पाहणी करून ते कामही लवकर पूर्ण करण्याच्या सूचना ठेकेदाराला दिल्या. तसेच मतदान स्ट्राँग रूमची पाहणी



करून सुरक्षिततेचा आढावा घेतला. २१ डिसेंबर रोजी निकाल असल्याने कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये यासाठी पोलीस प्रशासनाला योग्य त्या उपाययोजना करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

याशिवाय जिल्हाधिकाऱ्यांनी कृषी विभागाच्या योजनांचा लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांच्या शेतीस भेट देत झिक्री जामखेड) येथील शेतकरी चंद्रकांत आजबे यांच्या फळबागेची पाहणी केली. उपजिल्हा ग्रामीण रुग्णालयातील डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम वाचनालय, नगरपरिषद जामखेड व निवडणूक स्ट्राँग रूमलाही त्यांनी भेट दिली. जामखेड–सौताडा महामार्गाबाबत उपविभागीय अधिकारी कर्जत, सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता, भूमी अभिलेख उपअधीक्षक, नगरपरिषदेचे मुख्याधिकारी व ठेकेदार यांची संयुक्त बैठकही घेण्यात आली.

: ‘हा रस्ता आणखी किती जणांना अपंगत्व देणार?’ गेल्या अनेक महिन्यांपासून खर्डा चौक ते समर्थ हॉस्पिटल दरम्यानचा रस्ता खोदून ठेवण्यात आल्याने जामखेडकर अक्षरशः मरणयातना भोगत आहेत. अपघातांचे प्रमाण वाढले असून, काही नागरिकांना कायमस्वरूपी अपंगत्व आले आहे. हा रस्ता नेमका कधी पूर्ण होणार? असा संतप्त सवाल आता जामखेडकर विचारत आहेत. व ठेकेदारांच्या निष्काळजीपणामुळे आणखी किती जणांचे जीव व आरोग्य धोक्यात येणार? असा प्रश्न उपस्थित होत आहे.

जिल्हाधिकारी ॲक्शन मोडमध्ये आल्याने जामखेड–सौताडा महामार्ग लवकर मार्गी लागणार का? याकडे आता संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

## द • ख • ल

### थंडीमुळे वाटाणा पिक जोमदार

**दिवे :** सध्या थंडीचा जोर वाढल्याने सर्वच पिकांना पोषक वातावरण निर्माण झाले आहे. त्यामुळे पिके जोमदार दिसत आहेत. खासकरून



पुरंदर तालुक्यातील मुख्य पिक वाटाण्याला पोषक वातावरण मिळत असून मागील वर्षापेक्षा यंदा वाटाण्याचे क्षेत्र वाढले आहे.वाटाण्या बरोबरच हरभरा, ज्वारी ही पिके देखील वाढत्या थंडीमुळे जोमदार आली आहेत सध्या अनेक ठिकाणी वाटाणा तोडणीला आला पुरंदरच्या प्रसिद्ध चविष्ट आणि गोड वाटाणा खरेदिसाठि व्यापारी गर्दी करत आहेत यावर्षी पाणीसाठा टिकून असल्याने अजून देखील वाटाणा पेरणी शेतकरी करत आहेत पंचेचाळिस दिवसात वाटाणा तोडणी योग्य होतो त्यामुळे चार पैसे हातात मिळवून देणारे पिक म्हणून वाटाण्याकडे पाहिले जाते इतरत्रहि वाटाण्याचे उत्पन्न मोठ्या प्रमाणात घेतले जाते परंतु पुरंदरच्या वाटाण्याला गोडी यामुळे इथला वाटाणा नेहमीच जास्तीचा बाजार खात असतो सध्या मात्र आवक वाढत असल्याने किलोला पन्नास रूपयाच्या दरम्यान बाजारभाव मिळत आहे......

### ’स्नेहबंध’तर्फे सुदाम बटुळे यांचा सन्मान



**अहिल्यानगर :** सुदाम बटुळे यांची आकाशवाणी कार्यक्रम अधिकारी, अहिल्यानगर म्हणून पदोन्नती झाल्याबद्दल स्नेहबंध फौंडेशनच्या वतीने त्यांचा सन्मान करून शुभेच्छा देण्यात आल्या. स्नेहबंध सोशल फौंडेशनचे संस्थापक अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे हस्ते सन्मानपत्र व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी डॉ. उद्धव शिंदे म्हणाले, ‘‘सातत्य, प्रामाणिकपणा आणि समाजाभिमुख कार्याची जाणीव ठेवून काम केल्यास यश निश्चित मिळते. सुदाम बटुळे यांनी आपल्या कार्यकाळात जबाबदारीने काम करत विश्वास संपादन केला असून ही पदोन्नती त्यांच्या कार्याची पावती आहे.या वेळी जयंत लाटे, पांडुरंग जोशी, काकफळे, वृषाली घनवट, अर्चना जाधव, ऐश्वर्या ढवळीकर आदी मान्यवर उपस्थित होते.

### शनि अमावस्येनिमित्त शनिशिंगणापूर येथे दर्शन व्यवस्थेत बदल

**अहिल्यानगर :** शनि अमावस्येनिमित्त शनिशिंगणापूर येथे मोठ्या प्रमाणात भाविकांची गर्दी होण्याची शक्यता लक्षात घेता, भाविकांची सुरक्षितता व गर्दीचे योग्य नियोजन करण्यासाठी प्रशासनाने शनि चौथऱ्यावरील दर्शन व्यवस्थेत महत्त्वाचा बदल केला आहे. प्रशासनाच्या निर्णयानुसार शुक्रवार, १९ डिसेंबर रोजी रात्री १२ वाजल्यापासून शनिवार, दि. २० डिसेंबर रोजी दुपारी २ वाजेपर्यंत शनि चौथऱ्यावर प्रवेश बंद राहणार आहे. या कालावधीत शनि चौथऱ्यावर जाऊन दर्शन घेणे तसेच तैलाभिषेक करण्यास मनाई करण्यात आली आहे.

मात्र भाविकांची गैरसोय होऊ नये यासाठी मंदिराचे मुख्य प्रवेशद्वर खुले ठेवण्यात येणार असून, तेथून भाविकांना घेता येणार आहे. गर्दी नियंत्रणात ठेवणे, चेंगराचेंगरी टाळणे व सुरक्षेच्या दृष्टीने हा निर्णय घेण्यात आल्याचे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे. दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांनी प्रशासनाने केलेल्या नियमांचे पालन करून सहकार्य करावे, असे आवाहन प्रांताधिकारी सुधीर पाटील व तहसीलदार डॉ. संजय बिरादार यांनी केले आहे

## आंतरशालेय क्रीडा महोत्सवात आनंदाश्रम शाळेचे यश

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**तळेगाव ढमढेरे:** येथील समता शिक्षण संस्था संचालित प्राथमिक शाळेत आंतरशालेय प्राथमिक शाळा गटाच्या वैयक्तिक व सांघिक हिवाळी क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले असताना आनंदाश्रम प्राथमिक शाळेने या स्पर्धेत यश मिळवले आहे.

तळेगाव ढमढेरे (ता. शिरूर) येथे विलास वाघ मेमोरियल फाउंडेशनच्या अध्यक्षा प्रा. उषा वाघ व प्रदीप संकपाळ यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामीण भागातील पहिली ते सातवीच्या विद्यार्थ्यांचा शारीरिक, विकास व्हावा आणि विद्यार्थ्यांना खेळण्याची संधी उपलब्ध व्हावी या हेतूने या स्पर्धांचे आयोजन केलेले होते. या स्पर्धेत परिसरातील दहा शाळेतील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. स्पर्धेचे उद्घाटन संस्थेचे संचालक विवेक वाघ, सरपंच रोहिणी तोडकर, भाजपा तालुकाध्यक्ष जयेश शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले, याप्रसंगी उद्योजक राहुल करपे, माजी सभापती आरती भुजबळ, जितेंद्रकुमार थिटे, चेतना ढमढेरे, डॉ. धनंजय लोंढे, डॉ. चंद्रकांत केदारी, अशोक दहिफळे, बाळासाहेब चव्हाण, भाऊसाहेब वाघ, शिवाजीराव आढाव, महेश सूर्यवंशी यांसह आदी शिक्षक उपस्थित होते. स्पर्धा पार पाडण्यासाठी शंकर मुनोळी, शशिकला खेडेकर, सुनीता पाटील, कविता बागले, दिलीप गायकवाड, नवल राठोड व परेश पाटील यांनी विशेष परिश्रम घेतले, आयोजित स्पर्धेत शाळेंनी यश मिळवले असताना आनंदाश्रम प्राथमिक शाळेने जास्त खेळामध्ये घवघवीत यश मिळवले, तर स्पर्धेत विजेत्या खेळाडू, शाळा आणि क्रीडा स्पर्धा आयोजनासाठी कष्ट घेणारे आसिफ शेख यांना संस्थेचे संचालक ॲड. संपतराव कांबळे, देवेंद्र कोळपकर. पंडित भुजबळ, कुमार अय्यर, ॲड. शहाजीराव पाटोळे, ॲड. संतोष गवारी, मंगला कांबळे, सुरेखा ओव्हाळ यांसह आदींच्या चषक, मेडल व प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले, सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचलन श्रीमती राजश्री येरपुडे यांनी केले तर प्रास्ताविक मुख्याध्यापक संदीप गोसावी यांनी केले आणि शंकर शिंदे व नीलेश देसले यांनी आभार मानले.

## सिध्देश्वर संस्थानला धाकट्या अलंकापुरीचे वैभव देऊन महंतानी घेतला संन्यास !

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**सिध्देश्वर :** येथील सिध्देश्वर संस्थानचे महंत स्वामी विवेकानंद शास्त्री यांनी गुरूसेवा आणि गुरू आज्ञा प्रमाण मानत सिध्देश्वर संस्थानला धाकट्या अलंकापुरीचे वैभव प्राप्त करून देऊन आता संन्यास घेतला असुन आता त्यांना स्वामी विवेकानंद गिरी या नावाने ओळखले जाणार आहे .

सिध्देश्वर संस्थानचे महंत वै .आबादेव महाराज यांचे पश्चात महंतपदी स्वामी विवेकानंद यांची निवड झाली होती ,वै.विठ्ठलबुवा घुले आळंदी व श्रीक्षेत्र भगवान गडाचे महंत डॉ न्यायाचार्य नामदेव महाराज शास्त्री यांचे प्रमुख उपस्थितीत त्यांनी गादिचा पदभार सोळा वर्षापुर्वी स्विकार होता .

त्यानंतर विवेकानंद शास्त्रींनी संस्थानचा भरभरून भौतिक विकास करता करता भक्तगणांच्या मनावर अधिराज्य गाजवले होते.सतत हासत खेळत राहणारे व प्रतेक लहाण मुलांना गोडी लागावी म्हणून चॉकलेट देणारे बाबा अशी ओळख बालगोपाळात झाली होती . संस्थानचा विकास झाला पाहिजे या विचाराने त्यांनी सोळा वर्ष अथक परिश्रम घेतले,महाशिवरात्र सोहळा तर एका ऊंचीवर नेऊन ठेवला ,पंचक्रोशितील किमान पंचवीस गावांना संस्थानशी जोडले होते ,सर्व प्रथम क्षेत्र विकासासाठी त्यांनी संस्थान लगत असलेली जागा खरेदी केली त्यासाठी झोपडी पासुन माडीपर्यंत दारोदार फिरले ,जागा घेतल्यानंतर त्याचे सपाटीकरण ,कंपाऊंड वॉल,गोशाळा ,मंगल कार्यालय ,सुलभ शौचालय ,बगीचा ,वृक्षलागवड ,दशक्रिया विधी घाट निर्माण ,नर्मदेश्वर मंदिर उभारणी ,भाविकासाठी निवारा आदी काम करून घेत सिध्देश्वर संस्थानला धाकटी अलंकापुरी म्हणून नावलौकिक प्राप्त करून दिला . कांदिवली मुंबई येथील आनंदवन आश्रम येथे गुरू काशिकानंदगिरीजी यांचेकडे घेऊन श्रीक्षेत्र भगवानगडावर महंत डॉ न्यायाचार्य नामदेव महाराज शास्त्री यांचेसोबत भगवान गडावर आले होते ,

## वेठबिगारीस ठेवलेल्या नऊ मजुरांची सुटका

### दोन आरोपी ताब्यात



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पारनेर:कुरुंद** (ता. पारनेर) येथे वेगवेगळ्या ठिकाणाहून देतो असे सांगून काही मजुरांना आणले होते. त्यांना अर्ध पोटी ठेऊन किंवा अन्न पाणी न देता त्यांच्याकडून बळजबरीने गुरे चारण्याचे तसेच शेतातील कामे करून घेतले जात होती.अशा नऊ वेठबिगारी म्हणून ठेवलेल्या मजुरांची पारनेर पोलिसांनी काल (ता. १७) सुटका केली. त्यानंतर दोघांना त्यांच्या नातेवाईकांच्या तर उर्वरित सात जणांना अहिल्यानगर येथील पाठवण्यात आले आहे. यात दोन आरोपींनाही पोलिसांनी अटक केली आहे.

याबाबत माहिती अशी की, आरकेश बड्या काळे व नितेश आरकेश काळे यांनी तुम्हाला चांगले काम देतो, असे गोड बोलून वेगवेगळ्या ठिकाणाहून पुणे रेल्वे स्टेशन, नगर रेल्वे स्टेशन तसेच शिरूर बस स्थानक अशा ठिकाणाहून या लोकांना आणले होते. काळे हे दोन महिन्यापासून त्यांच्याकडून बळजबरीने शेतातील विविध कामे बळजबरीने करून घेत होते. तसेच त्यांना रात्री एका खोलीमध्ये कोंडून ठेवत असत. अश्या प्रकारे या नऊ कामगारांना सुमारे दोन महिन्यापासून काळे पिता पुत्रांनी डांबून ठेवले होते. याबाबतची माहिती पारनेर पोलिसांना समजल्यानंतर पोलिसांनी त्या नऊ व्यक्तीची सुटका करून काळे पिता पुत्रांना ताब्यात घेतले त्यांच्यावर गुन्हा दाखल केला आहे.

बाळू विठ्ठल भांगरे (वय-३३ )रा. एकदरा ता. अकोले जिल्हा अहिल्यानगर,अक्षय सुरेश पायमोडे (वय-२९) रा. कोथरूड पुणे, गोपाल जयाराम पाटोळे तालुका खामगाव जिल्हा बुलढाणा, जितेंद्र राजकमल (वय-२८) कर्नाटक, प्रतिक रामभाऊ कांबळे (वय-२९) पिंपरी चिंचवड, जिल्हा पुणे, संतोष कुमार (वय-३०) पत्ता माहित नाही, विराज शेखर (वय-४५ प्रदेश व एक मूकबधिर व्यक्ती अंदाजे (वय-४०) अश्या नऊ जणांना काळे पिता पुत्रांनी बळजबरी घरी ठेऊन त्यांच्याकडून शेतातील तसेच जाणावरे चारण्याची कामे करून घेतली. हे सुमारे एक ते दिड महिण्यापासून सुरु होते. याबाबत छत्रपती संभाजी नगर वाळुंज येथील पोलीस ठाण्यात अर्चना साबळे यांनी आपले वडील हरवले असल्याची फिर्याद दिली त्यानुसार पारनेर पोलिसांना गुप्त माहिती मिळाल्यानुसार पोलिसांनी कुरुंद येथे जाऊन या नऊ वेठ बिगाराची सुटका केली.

यातील दोघांना त्यांच्या नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आले तर सात जणांना आहिल्यानगर येथील स्नेहालयात दाखल करण्यात आले आहे. ही कारवाई उपविभागीय पोलीस अधिकारी शिरीष वमने यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक संतोष खेडकर, सहाय्यक पोलीस निरीक्षक खंडागळे, सहायक फौजदार शिवाजी कडूस, हवालदार अमोल धामणे, कल्याण लगड, सागर साबळे, सारंग वाघ, गणेश डोंगरे, महिला हवालदार हर्षदा ठुबे यांच्या पथकाने केली. पुढील तपास पोलीस निरीक्षक खेडकर यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक खंडागळे व पारनेर पोलीस करत आहेत.

## शेतीसाठी शेतकऱ्यांना १२ तास वीजपुरवठा करा : प्राजक्त तनपुरे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**राहुरी :** बिबट्यांच्या वाढत्या संचारामुळे शेतकऱ्यांचे प्राण धोक्यात आल्याने तालुक्यातील शेतकऱ्याच्या शेतीसाठी किमान १२ तास दिवसा वीज द्यावी – मा. राज्यमंत्री प्राजक्त तनपुरे मागणी केली आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यात व विशेषतः राहुरी तालुक्यात, शहरात बिबट्यांचा मोठ्या प्रमाणावर वावर सुरु झाल्याने शेतकरी, नागरिक, स्त्री शाळकरी मुले, यांच्या भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यात महावितरण कडून शेतकऱ्यांना दिवस व रात्री अशा दोन्ही वेळेस कधी रात्री तर कधी दिवसा अश्या शिफ्टमध्ये वीजपुरवठा केला जात आहे.सद्या शेतीमध्ये हरभरा,ऊस तसेच इतर पिकांची लागवड सुरू असल्याने पिकांना पाणी देण्यासाठी शेतकऱ्यांना रात्रीच्या वेळी शेतात जावे लागत आहे. मात्र सर्वत्र बिबट्यांचा वाढता संचार लक्षात घेता शेतकऱ्यांच्या जीवितास गंभीर धोका निर्माण झाला आहे.

## पाडेगाव ऊस संशोधन केंद्राची आजपर्यंतची वाटचाल कौतुकास्पद : डॉ. खर्चे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** पाडेगाव येथील ऊस संशोधन केंद्राने ऊस पिकातील जागतिक दर्जाचे काम उभे केले आहे. यामध्ये आजपर्यंत कार्यरत होऊन गेलेल्या सर्व ऊस विशेषज्ञांपासून ते प्रत्यक्ष कष्ट करणाऱ्या सर्व मजुरांचा देखील व मोलाचा वाटा आहे. संशोधन केंद्राची इथपर्यंतची यशस्वी वाटचाल होण्यामध्ये विद्यापीठाचे सर्व माजी कुलगुरू व संशोधन संचालकांचे देखील मोठे योगदान आहे. या यशस्वी कामामध्ये सातत्य राखणे महत्त्वाचे असून आज अनेक शेतकऱ्यांनी

त्यांच्या घरांना या ऊस संशोधन केंद्राने विकसीत केलेल्या वाणांची नावे दिली आहेत हेच या संशोधन केंद्राचे सर्वात मोठे असल्याचे प्रतिपादन महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. विलास खर्चे यांनी केले.

महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विलास खर्चे यांनी पाडेगाव येथील मध्यवर्ती ऊस संशोधन केंद्राला भेट दिली. यावेळी मार्गदर्शन करतांना कुलगुरु डॉ. विलास खर्चे बोलत होते. यावेळी संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के, पाडेगाव ऊस संशोधन केंद्राचे ऊस डॉ. राजेंद्र भिलारे उपस्थित होते.

यावेळी त्यांनी संशोधन केंद्राच्या नवीन होऊ घातलेल्या कार्यालयीन इमारती, प्रयोगशाळा, शेतकरी प्रशिक्षण व निवासस्थान तसेच कर्मचारी निवासस्थान या जागांची देखील त्यांनी पाहणी करुन महत्वपूर्ण सूचना केल्या. याप्रसंगी संशोधन केंद्रातील ऊस शरीरक्रिया शास्त्रज्ञ डॉ. कैलास भोईटे, ऊस रोगशास्त्रज्ञ डॉ. सुरज नलावडे यांच्यासह सर्व शास्त्रज्ञ, अधिकारी कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. दत्तात्रय थोरवे यांनी तर आभार डॉ. सुरेश उबाळे यांनी मानले.



## संत सोपानदेव महाराज संजीवन समाधी उत्साहात साजरा



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**माळशिरस :** क्षेत्र सासवड ( ता. पुरंदर ) येथे १२ डिसेंबर पासून संत सोपानदेव महाराज संजीवन समाधी सोहळा सुरु असून शुक्रवारी दि. १९ रोजी सांगता करण्यात आली. बुधवारी नामदेव महाराज यांचे १६ वे वंशज केशव महाराज नामदास यांचे समाधी वर्णनाचे कीर्तन होवून समाधीवर पुष्पवृष्टी करण्यात आली. तर गुरुवारी बोफळे दिंडीतर्फे काल्याचे कीर्तन त्यानंतर दहीहंडी फोडून दिंडी प्रदक्षिणा घालण्यात आली.

शुक्रवारी दि. १९ हा समाधी सोहळ्याचा शेवटचा दिवस असल्याने पहाटे काकडा आरती होवून देवस्थानचे विश्वस्त एड. श्रीकांत गोसावी यांच्या हस्ते महापूजा झाली. सकाळी ९.वा. चांबळी येथील कीर्तनकार हभप म्हस्कुजी महाराज कामठे यांचे कीर्तन झाले. त्यांनी !! सुख वाटे ठायी ! बहु पायी संतांचे !! १ !! म्हणऊनी केला वास ! नाही नास ये ठायी !! २ !! न करवे हाली चाली ! निवारली चिंता हे !! ३ !! तुका म्हणे निवे तनु ! रजः कणु लागता !! ४ !! या संत तुकाराम महाराजांच्या अभंगावर संदर निरुपण केले. ११.३० वा. हभप म्हस्कुजी कामठे यांच्यासह देवस्थानचे मुख्य विश्वस्त एड. त्रिगुण महाराज गोसावी, श्रीकांत गोसावी, गोपाळराव गोसावी, व्यवस्थापक हिरुकाका गोसावी, सीमा गोसावी, मधुकाका गोसावी, चोपदार सिद्धेश शिंदे, मनोज रणवरे, अभय जगताप, विजय भिसे, राजेंद्र महाजन, बाळासाहेब जगताप, राजेंद्र लांडगे यांच्यासह राज्यभरातील वारकऱ्यांच्या वतीने समाधीवर लिंबू साखर आणि गरम पाण्याने पूजा घालण्यात आली. सायंकाळी हभप पोमण गुरुजी यांचे सोपानदेव महात्म्य निरुपण झाले. तसेच हभप अविनाश फडतरे यांचे प्रवचन झाले. संत नामदेव महाराज यांचे वंशज हभप मुरारी महाराज नामदास यांचे काढ्याचे कीर्तन झाले. त्यानंतर भाविकांना काढ्याचा प्रसाद देवून समाधी सोहळ्याची सांगता करण्यात आली.

## अहिल्यानगर महापालिका निवडणूक

### सहा भरारी, सात स्थायी पथकांची नियुक्ती

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर:** अहिल्यानगर महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आदर्श आचारसंहितेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी प्रशासनाकडून कडक उपाययोजना करण्यात आल्या आहेत. आचारसंहिता पालनासाठी सहा भरारी पथके व सात स्थायी पथकांची नियुक्ती करण्यात येणार असल्याची माहिती मुख्य निवडणूक निर्णय अधिकारी तथा महापालिका आयुक्त यशवंत डांगे यांनी दिली.

राज्य निवडणूक आयोगाने अहिल्यानगर महानगरपालिकेच्या कार्यक्रम जाहीर केल्यानंतर महापालिका क्षेत्रात तत्काळ आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. निवडणूक कार्यक्रम जाहीर झालेल्या दिनांक व वेळेपासून ही आचारसंहिता लागू असून, निकाल जाहीर होईपर्यंत ती प्रभावी राहणार आहे. निवडणूक काळात कोणतेही उल्लंघन होऊ नये, यासाठी प्रशासन सज्ज झाले आहे. आचारसंहितेच्या अंमलबजावणीसाठी शहरात प्रवेश करणार्या प्रमुख सात रस्त्यांवर स्थायी नेमण्यात आली आहेत.राज्य निवडणूक आयोगाने अहिल्यानगर महानगरपालिकेच्या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केल्यानंतर महापालिका क्षेत्रात तत्काळ आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. निवडणूक कार्यक्रम जाहीर झालेल्या दिनांक व वेळेपासून ही आचारसंहिता लागू असून, निकाल जाहीर होईपर्यंत ती प्रभावी राहणार आहे. निवडणूक काळात कोणतेही उल्लंघन होऊ नये, यासाठी प्रशासन सज्ज झाले आहे. आचारसंहितेच्या शहरात प्रवेश करणार्या प्रमुख सात रस्त्यांवर स्थायी पथके नेमण्यात आली आहेत.

केडगाव, दौंड रस्ता, कल्याण रस्ता, मनमाड रस्ता, छत्रपती संभाजीनगर रस्ता, पाथर्डी रस्ता आणि सोलापूर रस्ता या मार्गांवर ही पथके कार्यरत राहणार असून, शहराच्या हद्दीत येणार्या वाहनांची तपासणी करण्यात येणार आहे. यासोबतच सहा भरारी पथकांची नियुक्ती करण्यात आली असून, तीन पथके दिवसा तर तीन पथके रात्री कार्यरत राहणार आहेत. ही पथके आचारसंहितेच्या उल्लंघनासंदर्भातील तक्रारींची तात्काळ दखल घेऊन आवश्यक कारवाई करणार आहेत.

दरम्यान, महापालिका निवडणुकीसाठी लोकसभा व विधानसभा निवडणुकांच्या आधारेच मतदान केंद्रे निश्चित करण्यात आली आहेत. त्यानुसार शहरात एकूण ३४५ मतदान केंद्रे राहणार असून, लोकसभा व विधानसभा निवडणुकीसाठी ज्या मतदान केंद्रे होती, त्याच ठिकाणी यावेळीही मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. निवडणूक प्रक्रिया शांततापूर्ण, पारदर्शक व भयमुक्त वातावरणात पार पडावी, यासाठी सर्व संबंधित यंत्रणांनी समन्वयाने काम करावे, असे आवाहनही डांगे यांनी केले आहे

दखल

## संपतराव जाधव 'राष्ट्रीय भारत भूषण' पुरस्काराने सन्मानित

**पुणे** : मानव अधिकार व भ्रष्टाचार निवारण संघटना, नवी दिल्ली या नोंदणीकृत संस्थेच्या वतीने जागतिक मानवाधिकार दिनानिमित्त महाराष्ट्र सदन, नवी दिल्ली येथे पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. समाजातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य



करणाऱ्या मान्यवरांचा या कार्यक्रमात गौरव करण्यात आला. या सोहळ्यात केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले व मानव अधिकार व भ्रष्टाचार निवारण संघटनेचे अध्यक्ष सतीश केदारी यांच्या पुरस्कार प्रदान करण्यात आले.

राष्ट्रपती पोलीस पदक व पोलीस महासंचालक सन्मानचिन्हाचे मानकरी, सेवानिवृत्त पोलीस अधिकारी तथा पोलीस कल्याणकारी शिखर संस्थेचे राज्याध्यक्ष संपतराव जाधव यांना 'राष्ट्रीय भारत भूषण' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. तसेच प्रथम लोकनियुक्त आदर्श सरपंच नामदेवराव जाधव, आदर्श सरपंच अरुणराव घावटे व रामदास जामदार यांना 'राष्ट्रीय सरपंच रत्न' प्रदान करण्यात आला.उद्योग क्षेत्रातील योगदानाबद्दल दशरथ कुदळे व बाबासाहेब सोनवणे यांना 'उद्योग रत्न', तर सामाजिक कार्यासाठी अर्चना देसाई व अनिल जगताप यांना 'समाज रत्न' पुरस्काराने गौरवण्यात आले. सदर कार्यक्रमाचे आयोजन मानव अधिकार व भ्रष्टाचार निवारण संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष सतीश केदारी यांनी केले होते.

## शिक्रापुरात भरधाव कारच्या धडकेत युवक ठार

**तळेगाव ढमढेरे,:** शिक्रापूर (ता. शिरुर) येथील सूर्या हॉस्पिटल समोर दुचाकीवर चाललेल्या युवकाच्या भरधाव वेगाने आलेल्या कारची धडक बसून झालेल्या अपघातात संजय नागनाथ रहाटे या युवकाचा जागीच मृत्यू झाल्याची घटना घडली. याप्रकरणी शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे शुभम शाम सांगळे या कार चालकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



शिक्रापूर (ता. शिरुर) येथील पुणे नगर महामार्गावरुन संजय रहाटे हा युवक त्याच्या ताब्यातील एम एच सि जि ११३९ या दुचाकीहून नगर बाजूने पुणे च्या दिशेने चाललेला असताना नगर बाजूने भरधाव वेगाने आलेल्या एम एच २३ बी सि ५५२२ या कार ची संजय च्या दुचाकीला जोरात धडक बसून अपघात झाला, अपघाताची तीव्रता इतकी भीषण होती कि कार मधील सर्व एअर बॅग खुल्या झाल्या, दरम्यान नागरिकांनी संजयला उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी संजय नागनाथ रहाटे (वय ३५ वर्षे रा. सध्या रा. शिक्रापूर ता. शिरुर जि. पुणे मूळ रा. कंदार ता. कंदार जि. नांदेड) याचा उपचारापूर्वी मृत्यू झाल्याचे घोषित केले, याबाबत वृषभ विनोद कार्लेकर (वय २४ वर्षे सध्या रा. मलठण फाटा शिक्रापूर ता. शिरुर जि. मूळ रा. कोंढा ता. भद्रावती जि. चंद्रपूर) यांनी शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिल्याने पोलिसांनी शुभम शाम सांगळे (रा. महेशनगर बीड रोड कडा ता. आष्टी जि. बीड) याचे विरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस हवालदार उद्धव भालेराव हे करत आहे.

## ईपीएफओच्या उच्च पेन्शन योजनेसाठी निवृत्तीधारकांचे ऑफलाईन अर्ज

**लोणी धामणी:** ईपीएफओच्या उच्च पेन्शन योजनेसाठी सन २०२३साली पेन्शनधारकांनी प्रत्यक्ष ईपीएफओच्या कार्यालयात जाऊन जमा केलेले (ऑफलाईन)संयुक्त दावा अर्ज ग्राह्य धरुन त्या पेन्शनधारकांना ईपीएफओच्या उच्च पेन्शन योजनेसाठी सामावून घेण्याची किंवा पेन्शनधारकांना ईपीएफओने त्यांचे अधिकृत ऑनलाईन पोर्टल उपलब्ध करुन देण्याची विंनती पेन्शनधारकानी कर्मचारी भविष्य निर्वाह निधी कार्यालयाच्या आयुक्ताकडे केलेली आहे.पेन्शनधारकांसाठी हायर पेन्शन योजना ही सामाजिक सुरक्षा योजना असल्याने व पेन्शनधारकांच्या दैनदिन जीवनाशी व आरोग्याशी निगडीत असल्याने त्याचा सहानभूतीपूर्वक निर्णय घेण्याची विंनती पंतप्रधान .नरेंद्र मोदी.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस.व केंद्रीय कामगार व रोजगार करंदलाजे.केंद्रीय राज्यमंत्री .मुरलीधर मोहोळ.व खासदार सुप्रिया सुळे यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली असल्याचे निवृत्तीधारकांचे वतीने सांगण्यात आले.

# राज्य उत्पादन शुल्क कारवाईत

## सुमारे ४८ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे:**परराज्यातून महाराष्ट्रात होणाऱ्या अवैध मद्याच्या तस्करीविरुद्ध राज्य उत्पादन शुल्क, पुणे विभागाने सापळा रचून दोन स्वतंत्र कारवाया केल्या असून एकूण पाच आरोपींना अटक करून वाहनांसह सुमारे ४८ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.उरुळी कांचन गावाच्या हद्दीत पुणे-सोलापूर रोडवर गोपनीय माहितीच्या आधारे निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, विभाग, पुणे पथकाने चारचाकी वाहन (चक१२-चठ-१९०४) तपासले. वाहनातून गोवा राज्य निर्मित विदेशी मद्याच्या विविध ब्रँडच्या मोठ्या प्रमाणात बाटल्या आढळून आल्या. वाहनचालकास अटक करण्यात आली. पुढील तपासात मुख्य सूत्रधारास करमाळा (जि. सोलापूर) येथून अटक करण्यात आली. या प्रकरणात एकूण तीन आरोपींना अटक करून वाहनासह सुमारे ४ लाख ७१ हजार ७८० मुद्देमाल जप्त करण्यात आला. सासवड विभागाच्या पथकाने सातारा-पुणे राष्ट्रीय महामार्गावर सारोळा गावाच्या हद्दीत सापळा रचून सहाचाकी ट्रक (चक१२-डऋ-५९१८) तपासला. औषधांच्या आडून गोवा राज्यात विक्रीसाठी असलेले विदेशी मद्य वाहतूक होत असल्याचे उघडकीस आले. पुढील तपासात एक ट्रक चारचाकी वाहनासह मोठ्या प्रमाणात मद्य जप्त करण्यात आले. या प्रकरणात दोन आरोपींना अटक वाहनांसह एकूण ४३ लाख ५७ हजार ४०० किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. ही कारवाई आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, मुंबई राजेश देशमुख, सह-आयुक्त (अंमलबजावणी व दक्षता) प्रसाद सुर्वे तसेच विभागीय उपआयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, पुणे विभाग, पुणे सागर धोमकर यांच्या आदेशानुसार आणि अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, पुणे अतुल कानडे यांच्या करण्यात आली. जिल्ह्यातील दोन महानगरपालिकांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर मतदारांना प्रलोभन देण्यासाठी परराज्यातील स्वस्त दारू येण्याची शक्यता लक्षात घेऊन पुणे राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून २१ पथके कार्यरत ठेवण्यात आली आहेत. सराईत गुन्हेगारांवर विशेष पाळत, रात्रगस्त व वाहनांची कसून तपासणी करण्याचे निर्देश अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क अतुल कानडे यांनी दिले आहेत. अवैध निर्मिती, वाहतूक व विक्रीविरुद्ध पुढेही कठोर कारवाई सुरू राहणार आहे. अवैध मद्याबाबत कोणतीही माहिती असल्यास नागरिकांनी टोल फ्री क्रमांक १८००-२३३-९९९९ किंवा दूरध्वनी क्रमांक ०२०-२६१२७३२१ वर संपर्क साधावा, असे आवाहनही राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून करण्यात आले आहे.

# आंबेगावत कांदा लागवडीची लगबग

## मजुरांसह, कांद्याच्या रोपाचा तुटवडा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**निरगुडसर :** रब्बी हंगाम कांदा पिकासाठी अधिक पोषक असल्याने शेतकरी कांदा लागवडीत मग्न झाला असून आंबेगाव मेंगडेवाडी, निरगुडसर,लोणी, धामणी,जारकरवाडी, लाखणगाव,काठापूर बुद्रूक, पोंदेवाडी, खडकवाडी, वाळूंजनगर, रानमळा आदी गावांमध्ये कांदा लागवडीची लगबग पहावयास मिळत आहे. कांदा लागवड करताना मजूर व कांदा रोपाचा तुटवडा जाणवत असल्याचे शेतकरी मजुरांना जास्तीचा रोज देऊन व अधिकचे पैसे देऊन रोप खरेदी करत कांदा लागवड करत आहे.



**सध्या कांदा लागवडीसाठी मजूरांना ४०० रुपये मजूरी द्यावी लागते शिवाय बाहेर गावावरून मजूर आल्यास गाडीभांडे १५० ते २०० रुपये द्यावे लागतात. साधारण एक एकर कांदा लागवडी साठी १६ मजूर लागतात. त्यामुळे कांदा लागवड महागात पडते. पण बाजार चांगला मिळाला ठिक नाहीत आर्थिक फटका सहन करावा लागतो.**

**अजिंक्य टेमकर – कांदा उत्पादक शेतकरी , बेलसरवाडी**

शेतकऱ्यांकडून बाजारात येणाऱ्या कांद्याची आवक दरवर्षीच्या कमी-अधिक प्रमाणात होत आलेली आहे.कांदा बाजारात प्रतिकिलो किलो २६ ते २७ रुपये दराने विकला जातो. पण कांद्याच्या रोपाला कांद्यापेक्षा अधिक भाव असून, सध्या एकरभर कांदा लागवडीच्या रोपासाठी १५ ते २० हजार रुपये मोजावे लागत आहेत. कांद्यापेक्षा रोपाला अधिक भाव आल्याने यंदा कांद्याची लागवड महागडी ठरत असली, तरी कांदा लागवडीसाठी लगबग सुरू आहे.यंदा कांदा रोपांची मागणी वाढल्याने तालुक्यात मोठ्या प्रमाणात कांदा लागवड होण्याचा अंदाज आहे.सध्या तालुक्यातील शेतकऱ्यांकडे उन्हाळी कांदा लागवड सुरू आहे. शेतकरी नोव्हेंबर, डिसेंबर महिन्यात मोठ्या प्रमाणात नवीन कांद्याची लागवड करतात. अल्पभूधारक शेतकरी कांद्याच्या बियाण्यांपासून रोपे तयार करून योग्य त्या बाजारभावाने विक्री करतात. काही शेतकरी मिळेल त्या भावात रोपे घेत असून,आपली लागवड उरकून घेत आहेत. बाजारात कांद्याची आवक वाढली की कांद्याचे भाव पडतात. कांद्याची टंचाई निर्माण होते तेव्हा भाव वाढतात. सध्या अशीच परिस्थिती निर्माण झाली आहे. शेतकऱ्यांकडे कांदा नसल्यामुळेच सध्या कांद्याला दहा किलोस २६० ते २७० रुपये भाव मिळत आहे. त्यामुळे कांद्याच्या रोपालाही सुगीचे दिवस आले आहेत. डिसेंबर कांद्याचे भाव स्थिर राहतील, असा अंदाज आहे.

## गावडेवाडी उपसरपंच पदाच्या निवडणुकीत संख्याबळ नसतानाही भाजप

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**आंबेगाव :**तालुक्याच्या पूर्व भागातील आदर्शगाव गावडेवाडी येथील ग्रामपंचायतीवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे एकहाती वर्चस्व असताना उपसरपंचपदाच्या निवडणुकीत भाजप पक्षाचे बहुमत नसताना ही एकनाथ बाळकृष्ण गावडे हे निवडून आल्यामुळे खळबळ उडाली.विशेष म्हणजे एकूण ११ ग्रामपंचायत सदस्यांमध्ये भाजपचा एकच सदस्य असताना त्यांनी मिळवलेला विजय चर्चेचा विषय झाला आहे.

ग्रामपंचायत कार्यालयात निवडणूक निर्णय तथा सरपंच प्रियांका गावडे यांच्या अध्यक्षतेखाली सहाय्यक निवडणूक अधिकारी ग्रामसेविका तृप्ती झरेकर यांच्या उपस्थितीत निवडणूक प्रक्रिया पार पडली. उपसरपंचपदासाठी राष्ट्रवादी काँग्रेसतर्फे लक्ष्मण शंकर गावडे व भाजप पक्षाच्या वतीने एकनाथ गावडे यांनी उमेदवारी अर्ज दाखल झाले.गुप्त पद्धतीने मतदान झाले. लक्ष्मण गावडे यांना तीन मते मिळाली व एकनाथ गावडे यांना आठ मिळाली.एकनाथ गावडे यांचा सन्मान भाजपचे जिल्हाध्यक्ष प्रदीप कंद व श्यामकांत शिंदे यांच्या हस्ते करण्यात आला. दरम्यान, आदर्शगाव गावडेवाडी ग्रामपंचायत तीन महिन्यांपूर्वी राष्ट्रवादी काँग्रेसचे सहा व शिवसेनेचे चार असे पक्षीय बलाबल होते.शिवसेनेच्या सर्व सदस्यांनी मंचर येथे माजी गृहमंत्री दिलीप वळसे पाटील व म्हाडाचे अध्यक्ष शिवाजीराव आढळराव पाटील यांच्या उपस्थितीत काँग्रेसमध्ये प्रवेश केला होता.

त्यामुळे उपसरपंचपदी राष्ट्रवादी काँग्रेसचे लक्ष्मण गावडे निवडून येतील, असा अंदाज होता.पण प्रत्यक्षात मात्र भाजपचे गावडे विजयी झाले आहेत.'पूर्व भागातील ग्रामपंचायतीवर प्रथमच भाजपचा झेंडा फडकला आहे. असे उपसरपंच एकनाथ गावडे यांनी सांगितले.

# ऊसाच्या पट्ट्यात केळीची लागवड

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**लोणी धामणी :** आंबेगाव तालुक्यासह उत्तर पुणे जिल्ह्यात केळी पिकाची लागवड मोठ्या प्रमाणात होताना दिसून येत आहे. आंबेगाव वरदान ठरलेल्या डिंभे धरणं ( हुतात्मा बाबू गेणू जलाशय ) मुळे शाश्वत पाण्याची उपलब्धता झाल्याने डिंभे धरणाच्या डावा उजवा कालव्याला व घोडनदी नदीला यांना नियमित पाणी सुटत असल्याने या परिसरातील शेतकरी उसा बरोबर केळीचे पीक मोठ्या प्रमाणात घेऊ लागले आहेत. आंबेगाव तालुक्यातील अनेक शेतकरी उसाबरोबरच इतर पिकांकडेही वळत आहेत. वर्षांत उसाऐवजी केळीचे उत्पादन घेण्याला अनेक शेतकऱ्यांनी पसंती देत आहे. नगदी



पीक म्हणून घेतलेल्या या पिकातून शेतकऱ्यांना एकरी ३५ ते ४० टन उत्पादन मिळत आहे.

शाश्वत पाणी उपलब्ध असणाऱ्या गावांमधून अनेक शेतकऱ्यांनी भाजीपाला, वेलवर्गीय पिकविण्याला पसंती दिली. तर काही शेतकऱ्यांनी नगदी पीक म्हणून उसाऐवजी केळीचे उत्पादन घेण्यास सुरुवात केली. या परिसरात मोजकेच शेतकरी केळीचे उत्पादन घेत होते. मात्र आता या परिसरात केळी लागवडी खालील क्षेत्र वाढलं आहे

आंबेगाव तालुक्यातील परिसरातील शेतकऱ्यांनीही केळीचे उत्पादन घेण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे या परिसरातील ऊस पट्ट्यातही केळीच्या बागा जोमाने डोलू लागल्या आहेत. शेतकऱ्यांना सध्या केळीच्या लागणीला एकरी ३५ ते ४५ टनाचे उत्पन्न तर खोडव्याला २५ ते ३० टनांपर्यंत उत्पन्न घेण्यात येत आहे.

## बेकायदेशीर घरतोड प्रकरणी, मंडळ अधिकारी, पोलिस , मोजणीदार यांच्या विरोधात पोलिसांना तपासाचे निर्देश

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**जेजुरी:** नागरिकांच्या मालमत्ता हक्कांचे संरक्षण आणि शासकीय अधिकाऱ्यांच्या मनमानीला आळा एक महत्त्वपूर्ण आदेश सासवड येथील प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी न्यायालयाने दिला आहे.

फौजदारी अर्ज क्र. ६८/२०२४ (हरिदास अबा माने विरुद्ध उमेश व इतर) या प्रकरणात शासकीय अधिकारी, मंडळ अधिकारी, पोलिस नाईक, मोजणीदार यांच्यावर गंभीर स्वरूपाच्या गुन्ह्यांच्या चौकशीचे आदेश देण्यात आले आहेत. माननीय न्यायालयाने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २०२ अंतर्गत पोलीस ठाण्यास तपास करून अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. प्रकरणाची पार्श्वभूमी दि. २१ फेब्रुवारी २०२४ रोजी आरोपी शासकीय अधिकाऱ्यांनी पोलिस दलासह व गउइ मशीनच्या सहाय्याने पुरंदर तालुक्यातील दौंडज येथील तक्रारदाराचे राहते घर व गोठा बेकायदेशीररीत्या पाडला. तक्रारदाराचा तहसीलदाराच्या कथित आदेशाशी कोणताही संबंध नव्हता, तसेच ठढख डरे मिळालेल्या माहितीमध्ये झाले की त्या आदेशात तक्रारदाराच्या मालमत्तेबाबत कोणताही उल्लेख नाही.तक्रारदाराने जेजुरीरी पोलीस ठाणे तसेच वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे वारंवार लेखी तक्रारी करूनही पोलीसांनी कोणतीही ऋखठ नोंदवली नाही, त्यामुळे न्यायालयाचा दरवाजा ठोठावावा लागला. न्यायालयाचे निरीक्षण तक्रारदाराची शपथपूर्वक साक्ष नोंदविण्यात आली, ७ स्वतंत्र प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांची प्रतिज्ञापत्रे सादर करण्यात आली,गंभीर स्वरूपाचे गुन्हे असल्याने पोलीस आवश्यक असल्याचे न्यायालयाचे स्पष्ट मत या प्रकरणात फिर्यादी तक्रारदार यांच्या वतीने अ‍ॅड.हेमचंद्र मोरे यांचा युक्तिवाद न्यायालयाने मान्य केला व या प्रकरणात चौकशीचे आदेश केले आहे. या प्रकरणात अ‍ॅड.हेमचंद्र मोरे यांना अ‍ॅड.अभिनय हुंबरे यांनी सहाय्य केले आहे.

# 'भीमा पाटस' कारखान्यातील पारदर्शकतेसाठी आंदोलन करणार : माजी आमदार थोरात

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे:**भीमा सहकारी साखर पारदर्शकतेसाठी लवकरच संघर्ष समिती स्थापन करून आंदोलन करणार असल्याची घोषणा माजी आमदार रमेश थोरात यांनी केली. भीमा पाटस कारखान्याच्या संदर्भात सभासदांनी मागितलेली माहिती देण्यात येत नाही.मी स्वतः कारखान्याचा सभासद असून, लेखी स्वरूपात काही कागदपत्रांची मागणी केली आहे. सहकार कायद्यानुसार ही माहिती ३० दिवसांत देणे बंधनकारक असताना सहा महिने उलटूनही मिळालेली नाहीत. हा सहकार कायद्याचा स्पष्ट भंग असून, कारखान्याचे प्रमुख, आमदार राहुल कुल हे स्वतः कायद्याचा अवमान करत आहेत असा आरोप थोरात यांनी केला. काही वर्षापूर्वी कारखान्याच्या गोडावूनमधील सुमारे एक लाख साखर पोती जळाल्याच्या प्रकरणात नेमकी कोणती चौकशी झाली, याचा खुलासा झालेला नाही. याप्रकरणी उच्च न्यायालयात धाव घेणार असल्याचेही स्पष्ट केले.

दरम्यान, या आरोपांना प्रत्युत्तर मा पाटस कारखान्याचे अध्यक्ष तथा आमदार राहुल कुल यांनी उत्तर दिले. ते म्हणाले की, नुकत्याच पार पडलेल्या कारखान्याच्या सर्वसाधारण सभेत सभासदांनी विचारलेल्या सर्व प्रश्नांची हजारो सभासदांच्या साक्षीने उत्तरे देण्यात आली आहेत. तसेच माहिती मागणाऱ्या सभासदांना वेळोवेळी आवश्यक माहिती दिलेली असून, कुणाच्याही हक्कांची पायमल्ली नाही. भीमा पाटस कारखाना सध्या प्रगतीपथावर असून, कामगारांचे वेतन वेळेवर दिले जात आहे. तसेच कारखान्यावरचे कर्ज हळूहळू कमी होत असल्याचेही राहुल कुल यांनी स्पष्ट केले.

## निविदा नोटीस

### ग्रामपंचायत करंजविहिरे, ता. खेड, जि. पुणे

ग्रामपंचायत करंजविहिरे, ता. खेड, जि. पुणे हे महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हा परिषद यांचेकडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत ठेकेदारांकडून लिफाफा पध्दतीने खालील कामांच्या सीलबंद निविदा पाकीट पध्दतीने मागविण्यात येत आहे. निविदा ग्रा.पं. करंजविहिरे, ता. खेड, जि. पुणे यांचेकडून दि. २०/१२/२०२५ ते २९/१२/२०२५ पर्यंत दुपारी ०३.०० वाजेपर्यंत कोऱ्या निविदा देण्यात येतील. व भरुन पाठविलेल्या मोहोरबंद निविदा याच कालावधीत १०.०० ते ०५.०० वाजेपर्यंत स्वीकारल्या जातील. व शक्य झाल्यास शेवटच्या दिवशी सायं. ०५.०० वाजता उघडण्यात येतील.

| अ. क्र. | कामाचे नाव | निधीस्तर | अंदाजपत्रकीय रक्कम | इसारा रक्कम | निविदा फी |
|---|---|---|---|---|---|
| १. | मौजे करंजविहिरे येथे ग्रामपंचायत कार्यालयाच्यावरती सभागृह बांधकाम करणे | ग्रामनिधी | ६,६७,०५३/- | ६,६७१/- | ५००/- |

**टीप** : १) कोणत्याही निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार ग्रा.पं. ने राखुन ठेवला आहे. २) कोणतीही निविदा कारण न देता रद्द अथवा फेरबदल करण्याचा अधिकार ग्रा.पं. ने राखून ठेवला आहे. ३) सदर निविदा बंद लिफाफ्यामध्ये आवश्यक आहे. ४) सोबत पुढील कागदपत्रे आवश्यक आहे. (अ. नोंदणी प्रमाणपत्र, ब. जीएसटी रजीस्ट्रेशन, क. पॅनकार्ड)

**सही/- ग्रामसेवक**
**ग्रामपंचायत करंजविहिरे, ता. खेड, जि. पुणे**

**सही/- सरपंच**
**ग्रामपंचायत करंजविहिरे, ता. खेड, जि. पुणे**

# कर्जाच्या जाचातून किडनीपर्यंत : सावकारीचे भयावह वास्तव आणि शासनाची अपयशी यंत्रणा

**निसर्गाशी** झुंज देत जगणारा बळीराजा आज सावकारीच्या अमानुष जाळ्यात अडकून अक्षरशः उध्वस्त होत आहे. कर्ज फेडण्यासाठी शेतकऱ्याला आपली शेती, घरदार, साधनसामग्री विकावी आणि तरीही कर्ज संपत नसेल तर शेवटी स्वतःच्या शरीराचा अवयव विकण्याची वेळ येते हे केवळ विदारकच नव्हे, तर राज्यासाठी लाजिरवाणे वास्तव आहे. चंद्रपूर जिल्ह्यात उघडकीस आलेले किडनी काढण्याचे प्रकरण हे या अमानवी व्यवस्थेचे जिवंत उदाहरण ठरले आहे.

राज्यात सावकारीविरोधी कायदे अस्तित्वात असतानाही प्रत्यक्षात सावकारांचा धाक का कायम आहे, हा प्रश्न एकदा ऐरणीवर आला आहे. मुंबई, नवी मुंबई, पनवेल परिसरात यापूर्वी घडलेल्या घटनांनी सावकारांची क्रूर मानसिकता स्पष्ट केली होती. पैसे देण्यास असमर्थ कर्जदाराला जाळणे, मारहाण करून आत्महत्येस प्रवृत्त करणे, अपहरण करणे या घटना अपवाद नसून व्यवस्थेच्या अपयशाची लक्षणे आहेत. काही वेळा माध्यमांच्या दबावामुळे कारवाई होते, पण ती अपवादात्मकच ठरते. बहुतेक वेळा प्रशासन, महसूल यंत्रणा आणि संबंधित विभागांची भूमिका संशयास्पद राहते. चंद्रपूरमधील रोशन सदाशिव कुडे या शेतकऱ्याची कहाणी राज्यातील हजारो शेतकऱ्यांची वेदना सांगणारी आहे. चार एकर शेतीवर कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवणाऱ्या रोशन यांनी शेतीपूरक दुग्धव्यवसाय उभारण्याचा प्रयत्न केला. त्यासाठी सावकाराकडून घेतलेले एक लाख रुपयेच त्यांच्या आयुष्याचा शाप ठरले. खरेदी केलेल्या गाई मरण शेतीला निसर्गाची साथ मिळाली नाही, आणि कर्जाचा डोंगर वाढतच गेला. कर्जातून मुक्त होण्यासाठी त्यांनी दोन एकर जमीन विकली, ट्रॅक्टर व घरातील सामान विकले, तरीही सावकारांचा जाच थांबला नाही. अखेर कर्ज फेडण्यासाठी किडनी विकण्यास प्रवृत्त होणे यापेक्षा भयंकर शोषण दुसरे कोणते असू शकते?या प्रकरणामुळे मानव तस्करी, अवयव तस्करी आणि बेकायदेशीर यांचे भयावह जाळे उघड झाले आहे. ग्रामीण भागातील असहाय्य शेतकऱ्यांना लक्ष्य करून एजंटमार्फत परदेशात नेऊन अवयव काढण्याचा प्रकार गंभीर गुन्हा आहे. स्थानिक प्रशासन, पोलीस यंत्रणा आणि आरोग्य विभागाला अशा हालचालींची माहिती कशी मिळत नाही, हा प्रश्न अनुत्तरित आहे. नागरिक परदेशात जात असताना त्याची नोंद, चौकशी आणि देखरेख का होत की सगळे काही दिसत असूनही दुर्लक्ष केले जाते?चंद्रपूर पोलिसांनी या प्रकरणात सहा आरोपींना अटक करून सावकारी कायद्यान्वये गुन्हे दाखल केले आहेत, ही बाब स्वागतार्ह आहे. मात्र केवळ अटक पुरेशी नाही. दोषींना कठोर शिक्षेपर्यंत नेणे ही सरकारची जबाबदारी आहे. पीडित शेतकऱ्यांना तातडीची आर्थिक, वैद्यकीय आणि मानसिक मदत देणेही तितकेच आहे. अन्यथा अशा घटना पुन्हा पुन्हा घडत राहतील. आज शेतकरी कर्जमुक्तीच्या घोषणा दिल्या जातात, पण प्रत्यक्षात शेतकऱ्याची अवस्था अधिकच बिकट होत चालली आहे. सावकारीविरोधी कायदे जर फक्त कागदावरच राहणार असतील, तर त्यांचा उपयोग काय? अनधिकृत सावकारांवर कठोर कारवाई, पोलीस व प्रशासनाची जबाबदारी निश्चित करणे, आणि शेतकऱ्यांना सुलभ व पारदर्शक उपलब्ध करून देणे हे उपाय तातडीने राबवले गेले पाहिजेत.कर्ज फेडण्यासाठी शेतकऱ्याला किडनी विकावी लागते, हे केवळ त्या एका शेतकऱ्याचे दुर्दैव नाही, तर संपूर्ण राज्याच्या व्यवस्थेवरचा कलंक आहे. हा कलंक पुसायचा असेल, तर संवेदनशीलता, कठोर कायदे आणि प्रामाणिक अंमलबजावणी याशिवाय पर्याय नाही.

जा.क्र./६८१५/२५
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, पुणे विभाग पुणे, वाडीया कॉलेजसमोर,
४५-२, कै.बाळकृष्ण सखाराम ढोले पाटील मार्ग, पुणे-१
दि.१९/१२/२५

## चौकशीची जाहीर नोटीस

चौकशी अर्ज क्रमांक २१३४/२०२५ सार्वजनिक न्यासाचे नाव नोंदणी क्रमांक DRISHTEE EPIDEMIOLOGY AND PUBLIC HEALTH RESEARCH ORGANISATION बाबत DR. MRS. PRIYA YOGESH KULKARNI ... अर्जदार

सर्व संबंधित लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, धर्मादाय उप आयुक्त/सहायक धर्मादाय आयुक्त-१ पुणे विभाग, पुणे हे वर नमूद केलेल्या फेरफार अहवाल/अर्ज यासंबंधी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम २२/१९ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत.

१) वर नमूद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय?

२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय?

अ) जंगम मिळकत : (वर्णन) : 5000/- (Five Thousand only)

ब) स्थावर मिळकत : (वर्णन) Nil

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिद्ध झाल्या तारखेपासून तीस दिवसाचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठविणे. नंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरील मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मी, सहायक धर्मादाय आयुक्त-१, पुणे विभाग, पुणे यांचे शिक्क्यानिशी आज दि.१९/१२/२०२५ रोजी दिली.

शिक्का

**अधिक्षक (न्याय शाखा)**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय**
**पुणे विभाग, पुणे**

## ग्रामपंचायत पिंपळगाव तर्फे महाळुंगे, ता.आंबेगाव, जि.पुणे

### खुली निविदा सूचना क्र.१

### बी-१ निविदा सूचना क्र.१/२०२५-२०२६

| अ. क्र. | कामाचे नाव | टेंडर रक्कम रक्कम | टेंडर फी | इसारा रक्कम | कंत्राटदार वर्ग |
|---|---|---|---|---|---|
| १. | संत रोहिदास नगर वस्ती येथे सौर हायमास्ट दिवे बसविणे ( संख्या २) | ४,२८,३८९/- | ५००/- | १% | नोंदणीकृत कंत्राटदार |

**अटी व शर्ती खालीलप्रमाणे**-१) वरील कामाचे प्रपत्र ग्रामपंचायत कार्यालय पिंपळगाव तर्फे महाळुंगे, ता.आंबेगाव, जि.पुणे येथे उपलब्ध करून देण्यात येईल. २) सदर निविदा पत्रासोबत नियम व अटी शर्ती असतील. ३) सदर निविदा बुधवार, दि.१७/१२/२०२५ ते सोमवार दि. २२/१२/२०२५ सकाळी ११ वाजेपर्यंत नियम व अटीनुसार जमा करावीत.

## ग्रामपंचायत नारोडी, ता.आंबेगाव, जि.पुणे

### खुली निविदा सूचना क्र.१

### बी-१ निविदा सूचना क्र.१/२०२५-२०२६

| अ. क्र. | कामाचे नाव | टेंडर रक्कम रक्कम | टेंडर फी | इसारा रक्कम | कंत्राटदार वर्ग |
|---|---|---|---|---|---|
| १. | मौजे नारोडी येथे ग्रामपंचायत कार्यालयाची सुधारणा करणे ता.आंबेगाव, जि.पुणे | ३,३६,०२२/- | ५००/- | १% | नोंदणीकृत कंत्राटदार |

**अटी व शर्ती खालीलप्रमाणे**-१) वरील कामाचे प्रपत्र ग्रामपंचायत कार्यालय नारोडी, ता.आंबेगाव, जि.पुणे येथे उपलब्ध करून देण्यात येईल. २) सदर निविदा पत्रासोबत नियम व अटी शर्ती असतील. ३) सदर निविदा बुधवार, दि.१७/१२/२०२५ ते सोमवार दि.२२/१२/२०२५ सकाळी ११ वाजेपर्यंत नियम व अटीनुसार जमा करावीत.

द•ख•ल

## जिनत सय्यदचे सायकलिंग स्पर्धेत यश

**ढोरजळगांव** :-महात्मा फुले नूतन महाविद्यालय मिरजगाव येथे अहिल्यानगर जिल्हा अंतर्गत महाविद्यालयीन सायकलिंग स्पर्धेत निर्मलाताई काकडे महाविदयालयाची विदयार्थीनी कु. जिनत अय्युब सय्यद हिने प्रथम क्रमांक पटकावल्याबद्दल संस्थेचे



अध्यक्ष अॅड.डॉ विद्याधर काकडे, मार्गदर्शिका हर्षदाताई काकडे,मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.लक्ष्मण बिटाळ, उपमुख्य कार्यकारी अधिकारी पृथ्वीसिंह उच्च शिक्षण विभाग प्रमुख डॉ. गांगुर्डे हेमंत,शिक्षण विभाग प्रमुख वंदना पुजारी,सह प्रमुख अशोक आहेर, प्राचार्य डॉ. पी.ए.दुकळे,प्रा. फाटके संदीप (मार्गदर्शक) व सर्व प्राध्यापक तसेच पालकांनी अभिनंदन केले आहे.

## ढोरजळगांव सोसायटीच्या चेअरमन पदी लांडे व्हा चेअरमनपदी ससाणे

**ढोरजळगांव**:-शेवगाव तालुक्यातील ढोरजळगाव विविध कार्यकारी सोसायटीचे चेअरमनपदी राजेंद्र किसन लांडे व व्हाईस चेअरमनपदी राजेंद्र मुरलीधर ससाणे यांची निवड बिनविरोध करण्यात आली आहे .



यावेळी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून व्ही आर चौधरी यांनी काम पाहिले,त्यांना सचिव पोपट उगले यांनी सहकार्य केले.

यावेळी सुधाकर लांडे,राजेंद्र देशमुख, भाऊसाहेब अकोलकर , बंडू देशमुख,राजेंद्र लांडे,नानासाहेब पाटेकर,आंबादास गिर्हे, जयकुमार देशमुख,प्रल्हाद देशमुख, देविदास पाटेकर, कुंडलिक खोसे,शिवाजी शेलार,रोहन साबळे, सौ रागिणी लांडे ,शोभा गि-हे आदी उपस्थित होते.

चेअरमन पदाची आणि व्हा चेअरमन पदाची निवडणूक बिनविरोध राखल्याबद्दल मा.आ.नरेंद्र घुले,मा.आमदार चंद्रशेखर घुले,जि.प.अध्यक्षा राजश्री घुले शेवगाव पं स माजी सभापती डा.क्षितिज यांनी अभिनंदन केले आहे.

## मतदान केंद्र असलेल्या शाळांना आज व उद्या सुट्टी; जिल्हाधिकारी

**अहिल्यानगर:** जिल्ह्यातील नगरपरिषद आणि नगरपंचायत सार्वत्रिक निवडणूक २०२५ च्या पार्श्वभूमीवर, ज्या शाळांमध्ये मतदान केंद्रे आहेत, अशा शाळांना शुक्रवार डिसेंबर आणि शनिवार २० डिसेंबर २०२५ रोजी सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी याबाबतचे आदेश निर्गमित केले आहेत.

निवडणूक आयोगाच्या सुधारित कार्यक्रमानुसार जिल्ह्यातील संगमनेर, शिर्डी, राहुरी, श्रीरामपूर, शेवगाव, जामखेड व श्रीगोंदा (राहाता वगळून) तसेच कोपरगाव, देवळाली प्रवरा, पाथर्डी या नगरपरिषदा आणि नेवासा नगरपंचायत या ठिकाणी डिसेंबर २०२५ रोजी मतदान पार पडणार आहे.

मतदान प्रक्रियेसाठी नियुक्त अधिकारी आणि कर्मचारी मतदानाच्या एक दिवस अगोदर, म्हणजेच १९ डिसेंबर रोजी केंद्रांवर पोहोचणार आहेत. त्यामुळे निवडणूक कामात अडथळा येऊ नये, यासाठी संबंधित शाळांना दोन दिवसांची सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. या कालावधीत संबंधित मतदान केंद्रे (शाळांच्या इमारती) निवडणूक कामासाठी राहतील तसेच तेथे पिण्याचे पाणी व वीज व्यवस्था सुरळीत राहील, याची दक्षता घेण्याचे निर्देश प्रशासनास देण्यात आले आहेत.

# बेलवंडीत 'पांढऱ्या बोक्याचा' काळा धंदा उघड !

## आरोग्याशी खेळणाऱ्या बनावट पनीर कारखान्यावर कारवाई कधी?

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा** : श्रीगोंदा तालुक्यातील बेलवंडी येथे केंद्र शासनाचा ऑनलाईन परवाना मिळवून अनेक वर्षांपासून आरोग्यास घातक बनावट पनीर तयार कारखाना राजरोसपणे सुरू असल्याचा गंभीर आरोप समोर आला आहे. या प्रकरणाची माहिती असूनही अन्न व औषध प्रशासनाकडून कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याने, अधिकाऱ्यांचे हात ओले केले जात आहेत का? अशी चर्चा बेलवंडी गावासह संपूर्ण तालुक्यातील सजग नागरिकांमध्ये रंगली आहे.



याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, बेलवंडी गावातील एका महाठकाने 'मिल्क अॅण्ड मिल्क डेअरी फार्म' या नावाखाली पनीर उत्पादनाचा कारखाना उभारला आहे. कागदोपत्री दुधापासून पनीर निर्मिती दाखवली जात असली, तरी प्रत्यक्षात तेथे दूध नाममात्र वापरले जाते. कारखान्यात उभारलेली दुध रिफायनरीची यंत्रसामग्री केवळ नावापुरती असून ती बहुतांश वेळा बंद अवस्थेत असते. दररोज एनालिसिस, पामतेल, वेअरमिट पावडर, ग्लिसरॉल मोनो स्टेरीट, स्किम्ड मिल्क पावडर आणि प्रमाणात दूध यांचे मिश्रण करून ३ ते ४ हजार किलो भेसळयुक्त पनीर तयार केले जात असल्याचा आरोप आहे. हे पनीर नाशिक, पुणे, संभाजीनगर, मुंबई, सांगली, सातारा, सोलापूर, संगमनेर तसेच गुजरात आणि मध्यप्रदेशातील भोपाळ येथे हॉटेल व्यावसायिकांना १५० ते १८० रुपये किलो दराने विकले जात आहे.

तज्ज्ञांच्या मते, दूध व घटक एकत्र केल्याने तयार होणारे हे बनावट पनीर अत्यंत घातक असून त्याच्या सेवनामुळे पोटदुखी, डायरिया, अॅसिडिटी, अपचन, तसेच दीर्घकाळ सेवन केल्यास लिव्हर कॅन्सरसारख्या गंभीर आजारांची शक्यता नाकारता येत नाही. अंतर्गत अवयवांवरही याचा विपरीत परिणाम होऊ शकतो. मात्र स्वस्त दरामुळे हॉटेल व्यावसायिकांकडून या बनावट पनीरला मोठी मागणी आहे. ब्रँडेड कंपनीचे जिथे ३५० ते ४०० रुपये किलो दराने विकले जाते, तिथे हे भेसळयुक्त पनीर अवघ्या १८० ते १९० रुपये किलो दराने उपलब्ध असल्याने बाजारपेठेत याचा शिरकाव वाढला आहे. परिणामी, सामान्य नागरिक नकळतपणे विषारी पनीरचे सेवन करून आपल्या आरोग्याशी तडजोड करत आहेत.

श्रीगोंदा तालुका आधीच दुध भेसळ प्रकरणांमुळे चर्चेत असताना, आता उगमस्थानावरून दुधापासून बनविले जाणारे भेसळयुक्त उपपदार्थ मोठ्या प्रमाणावर तयार होत असल्याचे उघड झाले आहे. त्यामुळे जिल्हा अन्न व औषध प्रशासनाने तातडीने लक्ष घालून या बनावट पनीर कारखान्यावर छापा टाकावा, दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई करावी आणि नागरिकांच्या जीवाशी खेळणाऱ्या या 'पांढऱ्या बोक्या'चा पर्दाफाश करावा, अशी जोरदार मागणी सजग नागरिकांकडून होत

## पोलिसात दाखल केलेली केस मागे घेण्यासाठी मारहाण

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : पोलीस ठाण्यात दाखल केलेली केस मागे घे असे म्हणत कांतिलाल पवार यांना शिवीगाळ दमदाटी करुन लाकडी दांड्याने मारहान करण्यात आली. या प्रकरणी अजित पवार सह चार जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला.

कांतीलाल हिरालाल पवार, (वय ३८ वर्षे, रा. वांजुळपोई, ता. राहुरी), यांनी राहुरी पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, दि. १२ डिसेंबर रोजी सायंकाळी ६.३० वाजेच्या सुमारास कांतिलाल पवार हे त्यांचे मोटारसायकलवर घरी जात असताना अजित पवार याने त्यांची मोटारसायकल रस्त्यात थांबविली. आणि म्हणाला की, तुझ्या सोबत माझे वडीलांना बोलायचे आहे. तु आमचे घरी चल. तेव्हा कांतीलाल पवार त्याला म्हणाले की, मला आता वेळ नाही, तेव्हा अजित पवार याला राग आल्याने त्याने शिवीगाळ केली. व त्यांच्या मोटार सायकलची चावी काढुन घेतली. त्यानंतर कांतिलाल पवार हे अजित पवार याच्या घरी गेले. आणि अजित याचे वडील रावसाहेब यांना म्हणाले की, माझेकडे तुमचे काय काम आहे, तेव्हा रावसाहेब पवार मला म्हणाले की, तु माझे मुलांचे विरोधात दिलेली तक्रार माघे घे. कांतीलाल पवार त्यांना म्हणाले की, मी दिलेली तक्रार माघे घेणार नाही. तेव्हा अजित पवार व इतर आरोपींनी कांतीलाल पवार यांना शिवीगाळ दमदाटी करुन धक्काबुक्की केली. तसेच लाकडी दांड्याने बेदम मारहाण केली. त्या नंतर तु तक्रार माघे घेतली नाहीतर तुला जिवंत सोडणार नाही, अशी धमकी दिली.

घटने नंतर कांतीलाल हिरालाल पवार यांनी राहुरी पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली. त्या फिर्यादीवरून आरोपी अजित रावसाहेब पवार, रावसाहेब अर्जुन पवार, हरीभाऊ अर्जुन पवार, योगेश हरीभाऊ पवार, सर्व रा. वांजुळपोई, ता. राहुरी, अशा चार जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोलिस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरु आहे.

## आचारसंहितेत सोशल मीडियावर आक्षेपार्ह पोस्ट टाकणे आता भोवणार

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर** । महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शहरात आदर्श आचारसंहिता लागू झाली असून, सोशल मीडियाच्या गैरवापराला रोखण्यासाठी तोफखाना पोलिसांनी कंबर कसली आहे. प्रभारी अधिकारी जगदीश भांबळ यांनी सर्व सोशल मीडिया ग्रुप अॅडमिन आणि सदस्यांना कडक इशारा देणारी नोटीस बजावली आहे. निवडणूक प्रक्रिया शांततेत पार पाडण्यासाठी जिल्हाधिकार्यांनी जिल्ह्यात प्रतिबंधक आदेश लागू केले आहेत. कोणत्याही उमेदवाराची वैयक्तिक बदनामी करणे, फोटोंशी छेडछाड (मॉर्फिंग) करून ते प्रसारित करणे किंवा जातीय द्वेष पसरवणारे संदेश पाठवणे हा आता गंभीर गुन्हा ठरणार आहे. विशेषतः व्हॉट्सअॅप ग्रुपवर चुकीचा मजकूर आल्यास केवळ पाठवणाराच नाही, तर ग्रुप अॅडमिनलाही कायद्याच्या कचाट्यात धरले जाईल. राष्ट्रीय एकात्मतेला बाधा आणणारे स्टेटस ठेवल्यास थेट न्यायालयीन कारवाईचा इशारा पोलिसांनी दिला आहे. मतदान १५ जानेवारी आणि मतमोजणी १६ जानेवारीला होणार असून, तोपर्यंत सोशल मीडियावरील प्रत्येक हालचालीवर पोलिसांचे बारीक लक्ष राहणार आहे. नियमांचे उल्लंघन झाल्यास ही नोटीस न्यायालयात पुरावा म्हणून वापरली जाणार असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

## बायकोच्या नावावर ३० लाखांचे कर्ज काढून नवरा पळाला

**अहिल्यानगर:** दुसर्या विवाहाचा आधार घेत एका व्यक्तीने पत्नीला आर्थिक जाळ्यात ओढून तब्बल ३० लाख रुपयांची फसवणूक केली असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी पीडित महिलेने कोतवाली पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असून पतीवर शारीरिक आणि मानसिक छळाचे आरोप केले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, पीडित महिलेचा पहिला विवाह मोडीत निघाल्यानंतर ओळखीच्या व्यक्तीने तिला लग्नाचे आमिष दाखवले आणि पहिल्या पतीपासून असलेल्या मुलाची जबाबदारी घेण्याचे आश्वासन देऊन तिचा विश्वास संपादन केला. विवाहानंतर काही दिवसांतच व्यवसायाचे कारण सांगून नवर्याने महिलेच्या नावावर विविध बँकांमधून गृहकर्ज, वैयक्तिक कर्ज आणि सोने तारण अशा स्वरूपात सुमारे ३० लाख रुपये उकळलेकाही काळानंतर महिला गरोदर असताना नवर्याने किरकोळ कारणावरून वाद घालण्यास सुरुवात केली आणि त्यानंतर तो आपल्याच मूळ गावी पळून गेल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

## निर्भया पथकाकडून विद्यार्थी सुरक्षिततेबाबत जनजागृती

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर:** जिल्हा पोलीस दलाच्या निर्भया पथकाच्या वतीने राष्ट्रीय पाठशाळा विद्यालयात विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी प्रात्यक्षिकासह जनजागृती कार्यक्रम राबविण्यात आला. जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अप्पर पोलीस अधीक्षक वैभव कलबुर्मे तसेच शहर उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. दिलीप टिपरेसे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला. या प्रसंगी शहर निर्भया पथकाच्या प्रमुख पोलीस उपनिरीक्षक शीतल मुगडे, महिला पोलीस कॉन्स्टेबल श्रीमती नागरे, महाडीक, खाटीक तसेच पोलीस कॉन्स्टेबल संदीप थोरात आदी उपस्थित होते. यावेळी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना पोलीस उपनिरीक्षक शीतल मुगडे यांनी शाळा परिसरातील सुरक्षिततेबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

शाळेच्या प्रवेशद्वारावर सुरक्षा रक्षकांची नियुक्ती करणे, विद्यार्थ्यांना गणवेश व ओळखपत्राशिवाय शाळा परिसरात प्रवेश न देणे, परिसरात विनाकारण फिरणाऱ्या व्यक्तींविरोधात तत्काळ कारवाई करणे व पोलिसांना माहिती देणे, शाळेत उच्च दर्जाचे व जास्त साठवण क्षमतेचे सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे, तक्रार पेटीची व्यवस्था करणे आदी सूचना त्यांनी दिल्या. तसेच बसचालक, सुरक्षा रक्षक, सफाई कर्मचारी यांची पोलीस चारित्र्य पडताळणी करणे आवश्यक असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. याशिवाय, विद्यार्थ्यांच्या बॅग व लॉकरची वेळोवेळी तपासणी करणे, महिला शिक्षक अथवा कर्मचाऱ्यांची निर्भया पथक समन्वयक म्हणून नेमणूक करणे आणि महिला सुरक्षा व सायबर सुरक्षेबाबत नियमित जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्याचे आवाहन करण्यात आले. कोणतीही अडचण उद्भवल्यास विद्यार्थ्यांनी घाबरून न जाता थेट निर्भया पथकाशी संपर्क साधावा, असे आवाहनही त्यांनी केले.

## आमच्या भूमिकेला जनतेचा अफाट प्रतिसाद : पराग संधान

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**कोपरगाव..** कोपरगाव नगरपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पार्टी व मित्र पक्षांच्या उमेदवारांना प्रचारादरम्यान नागरिकांकडून अभूतपूर्व प्रतिसाद मिळत असून हा जनतेचा कौल आमच्या विजयाची स्पष्ट साक्ष देणारा आहे, असा विश्वास भाजपा मित्र पक्षांचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार पराग संधान यांनी व्यक्त केला आहे. शहरातील प्रत्येक प्रभागात प्रचारासाठी गेल्यानंतर नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. मतदारांनी आम्हाला केवळ उमेदवार म्हणून नव्हे, तर आपल्या हक्काचे, विश्वासार्ह आणि विकासाभिमुख प्रतिनिधी म्हणून स्वीकारले आहे. त्यामुळे येत्या निवडणुकीत सर्व उमेदवारांना मतरूपी आशीर्वाद मिळतील, असा ठाम विश्वास त्यांनी व्यक्त केला.

विरोधकांकडे कोणताही ठोस मुद्दा नसल्याने ते संभ्रमात सापडले असून, निवडणूक कोणत्या मुद्द्यावर लढवायची याचाच त्यांना अंदाज आला नाही. मेणबत्ती आणि अगरबत्तीपुरते मर्यादित राजकारण करत असताना, रस्त्यांची दुरवस्था, धूळ, पाणीपुरवठा, स्वच्छता यांसारखे मूलभूत प्रश्न विरोधकांना साधे आठवलेदेखील नाहीत, ही दुर्दैवी बाब असल्याचे पराग संधान यांनी सांगितले.

या सकारात्मक भूमिकेमुळे हजारो युवकांनी स्वयंस्फूर्तपणे पक्षात प्रवेश करत आम्हाला पाठिंबा देण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच महिला भगिनींना विश्वास वाटावा अशा ठोस, सुरक्षितता व सक्षमीकरणाच्या संकल्पना आम्ही मांडल्याने युवक,जेष्ठ आणि महिलांकडूनही उमेदवारांना मोठा प्रतिसाद मिळत आहे.

## रेसिडेन्शिअल हायस्कूलच्या बाल आनंद मेळाव्यात लाखाच्यावर उलाढाल

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**शेवगाव** – रेसिडेन्शिअल हायस्कूल मध्ये वार्षिक स्नेहसंमेलना निमित्त बाल आनंद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. विद्यालयाच्या आवारात वेगवेगळ्या प्रकारचे स्टॉल लावले. भेळ, इडली सांबर, व्हेज बिर्याणी , पाणीपुरी, भाजीपाला, गोळ्या, बिस्कीट, विविध प्रकारच्या वस्तु विक्रीस विद्यार्थी सज्ज झाले व्यवहारिक ज्ञानाचे कृतीशील शिक्षण मिळणार असल्याने बालगोपालांच्या चेहर्यावर वेगळाच आनंद आणि उत्सुकता झळकत होती. सर्व पालकांचे लक्ष वेधून घेत होते.



बाल आनंद मेळाव्यात उभारलेले विविध वस्तुंचे विक्रीच्या स्टॉलमधून व्यवहारिक ज्ञानाची निर्मिती होते. विद्यार्थांना खरेदी विक्रीचा मिळणारा आनंद निराळाच असतो , जमा खर्चाचा ताळेबंदाचे ज्ञान मिळाल्यानंतर विद्यार्थ्यांच्या चेहर्यावर निर्माण होणार विलक्षण अनुभूती देणारा दिसुन येत होता. तसेच उपस्थित मान्यवरांनी, पालकांनी, विद्यार्थ्यांनी तसेच शिक्षकांनी विविध अन्नपदार्थाचा आस्वादही घेतला. या आनंद मेळाव्यात १०५ विद्यार्थांनी सहभाग घेतला. व्यवहार ज्ञानात भर पडावी, सामान्य ज्ञान वृद्धिंगत व्हावे, श्रम प्रतिष्ठा वाढावी या उद्देशाने बाल आनंद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले.

बाल आनंद मेळाव्याचे उद्घाटन न्यू आर्ट्स सायन्स कॉलेजचे प्राचार्य डॉ.पुरुषोत्तम कुंदे यांचे हस्ते करण्यात आले. या वेळी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष मा.मनोज थोटे , अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे संस्था निरीक्षक . हरिभाऊ जावळे व . उत्तमराव राजळे तसेच विद्यालयाचे प्राचार्य बालाजी गायकवाड, उपप्राचार्य कचरू शिंदे ,पर्यवेक्षक विलास फटांगरे, उच्च माध्यमिक समन्वयक प्रा.संजय तसेच सर्व शिक्षक बंधू भगिनी व विद्यार्थी उपस्थित होते. या मेळाव्याचे नियोजन प्रा.किशोर थोरात, अमोल पवार, गोरक्षनाथ सोलाट यांनी विशेष परिश्रम घेऊन बालआनंद मेळावा यशस्वीपणे पार पाडला. विद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन २० डिसेंबर ते २४ डिसेंबर या कालावधीत होणार आहे.वार्षिक पारितोषिक समारंभ भारुड सम्राट गोविंद महाराज गायकवाड तसेच इतर मान्यवरांच्या पार पडणार आहे

# बसस्थानकातील मोबाईल चोरीचा पर्दाफाश

## सराईत चोर अटकेत,६५ हजारांचा मुद्देमाल जप्त

**श्रीरामपूर** ; श्रीरामपूर बसस्थानक परिसरात प्रवाशांकडून मोबाईल हिसकावून पळणाऱ्या सराईत मोबाईल चोरास अटक करून ६५ हजार रुपये किमतीचे ६ मोबाईल जप्त करण्यात श्रीरामपूर शहर पोलिसांना यश आले आहे. या कारवाईमुळे बसस्थानकातील प्रवाशांमध्ये दिलासा मिळाला आहे.



दि. १८ डिसेंबर २०२५ रोजी प्रकाश नारायण बोडखे हे आपल्या मुलगा गौरव नारायण बोडखे यांच्यासह श्रीरामपूर बसस्थानकात आले होते. गौरव यांची २० डिसेंबर रोजी बडोदा (गुजरात) येथील उखडऋ कॅम्पमध्ये कागदपत्र पडताळणी असल्याने ते नाशिकमार्गे सुरत–वडोदरा जाण्यासाठी बसची वाट पाहत होते. दुपारी साडेचारच्या सुमारास दोघे बसस्थानकाच्या मागील बाजूस असलेल्या सार्वजनिक शौचालयाकडे गेले असता दोन अनोळखी इसमांनी गौरव यांच्या हातातील १५ हजार रुपये किमतीचा ओप्पो मोबाईल जबरदस्तीने हिसकावून झाडाझुडपात पळ काढला.

या घटनेप्रकरणी श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात गुन्हा क्र. १०८७/२०२५ नोंद करण्यात आला असून, भारतीय न्याय संहिता कलम ३०९(४), ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.गुन्हा दाखल होताच पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांनी तपास पथकाला तात्काळ कारवाईचे आदेश दिले. तपासादरम्यान गुप्त बातमीदाराकडून मिळालेल्या माहितीनुसार निखिल नितीन आवारे (वय २१, रा. गोंधवणी पूलाजवळ, वॉर्ड नं. १, श्रीरामपूर) याने आपल्या साथीदारासह हा गुन्हा केल्याचे निष्पन्न झाले. पोलिसांनी त्याला तात्काळ ताब्यात घेऊन चौकशी केली असता, त्याने अरबाज ऊर्फ बाळया ऊर्फ बाज अब्बास शहा (रा. संजयनगर, श्रीरामपूर) याच्यासह गुन्हा केल्याची कबुली दिली.

आरोपीकडून ओप्पो अ५ झर्अे ५ऋ (१५,०००), व्हिवो कंपनीचे चार मोबाईल (४०,०००), ईटेल कंपनीचा एक मोबाईल (१०,०००) असे एकूण ६५,००० रुपये किमतीचे ६ मोबाईल फोन जप्त करण्यात आले आहेत. हे सर्व मोबाईल श्रीरामपूर बसस्थानक परिसरातून चोरीस गेलेले असल्याचे तपासात उघड झाले आहे.ही यशस्वी कारवाई पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अप्पर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे, उपविभागीय पोलीस अधिकारी जयदत्त भवर यांच्या मार्गदर्शनाखाली, पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांच्या नेतृत्वाखालील तपास पथकाने केली. पथकात सहाय्यक पोलीस निरीक्षक रामचंद्र शिखरे, उपनिरीक्षक रोशन निकम व अन्य पोलीस अधिकारी व अंमलदारांचा समावेश होता. सदर गुन्ह्याचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक रामचंद्र शिखरे करीत असून, बसस्थानक परिसरातील चोरीच्या घटनांवर आळा घालण्यास पोलिसांची कारवाई सुरूच राहणार असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले आहे.

## रोटरी क्लब ऑफ शेवगाव सिटीतर्फे मधुमेह हिमोग्लोबिन तपासणी शिबिर;

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**शेवगाव** : रोटरी क्लब ऑफ शेवगाव सिटीच्या वतीने शुक्रवार, दि. १९ डिसेंबर २०२५ रोजी हनुमान मंदिर, वडार गल्ली, शेवगाव येथे मधुमेह व हिमोग्लोबिन तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराचे आयोजन प्रोजेक्ट चेअरमन रो. डॉ. विकास बेडके व रो. अण्णासाहेब दिघे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.

या एकूण ११७ रुग्णांची रक्त तपासणी करण्यात आली. त्यापैकी १४ रुग्णांमध्ये मधुमेह आढळून आला. तसेच महिलांमध्ये हिमोग्लोबिन म्हणजेच रक्ताचे प्रमाण लक्षणीयरीत्या कमी आढळून आल्याचे निदर्शनास आले. या उपक्रमासाठी रोटरी क्लब ऑफ शेवगाव सिटीचे संस्थापक अध्यक्ष डॉ. संजय लड्डा, विद्यमान अध्यक्ष रो. युसुफ भाई पठाण, सचिव रो. प्रा. विजयकुमार मुधोळकर, खजिनदार गजानन लोंढे तसेच रो. भागिनाथ काटे उपस्थित होते. शिबिर यशस्वी होण्यासाठी शेवगाव अनिसचे चिमाजी धनवडे यांनी विशेष सहकार्य केले.



दैनिक
# राष्ट्र सह्याद्री

## बेलपिंपळगाव येथील कॉलेज तरुणीचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन



**टाकळीभान :** नेवासा तालुक्यातील बेलपिंपळगाव येथील कॉलेज तरुणी कु, साक्षी कैलास शेरकर (१७) हिचे नूकतेच हृदय विकाराने निधन झाले. टाकळीभान येथील न्यु इंग्लिश स्कुल व कै.आण्णासाहेब पटारे पाटील कनिष्ठ महाविद्यालयात साक्षी ही इयत्ता १२ वी कॉमर्स शाखेत शिक्षण घेत होती. तिच्या निधनाने परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. तिच्या पश्चात वडील, आजोबा, चुलते, भाऊ, बहिण असा मोठा परिवार आहे. अशोक कारखान्याचे कर्मचारी कैलास शेरकर यांची ती मुलगी होत.



# नेवासेत उपमुख्यमंत्री शिंदे यांचे शक्ती प्रदर्शन

## विकासाची गंगा आणण्यासाठी भगवा फडकवा : ना.एकनाथ शिंदे





**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** येथील नगरपंचायतच्या निवडणूकीच्या निमित्ताने शिवसेना भाजप महायुतीचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार डॉ. करणसिंह घुले पाटील यांच्यासह प्रभाग वाईज नगरसेवक उमेदवारांच्या प्रचारार्थ शिवसेना नेते उपमुख्यमंत्री ना.एकनाथराव शिंदे यांची शक्ती प्रदर्शन करत सभा झाली.

या सभेला लाडक्या बहिणींचा उत्स्फ ूर्त प्रतिसाद मिळाला. स्व.बाळासाहेबांचे करूया स्मरण,निवडून द्या डॉ.घुले करणअशी साद घालत नेवासा शहरात विकासाची गंगा आणण्यासाठी नगरपंचायत निवडणूकीत महायुतीचा भगवा फडकवा असे आवाहन ना.एकनाथराव शिंदे यांनी यावेळी बोलतांना केले.

नेवासा नगरपंचायत चौकात दुपारी झालेल्या जाहीर सभेच्या अध्यक्षस्थानी आ. विठ्ठलराव लंघे हे होते. तर जेष्ठ नेते किसनराव गडाख, उद्योजक प्रभाकर शिंदे,शिवसेना जिल्हा प्रमुख बाबू टायरवाले, शिवसेना विधानसभा अध्यक्ष भाऊसाहेब वाघ, भाजपचे जिल्हाध्यक्ष नितीन दिनकर,जिल्हा उपाध्यक्ष सचिन देसरडा, रत्नमालाताई लंघे, शिवसेना अनुसूचित जाती विभागाचे उत्तर महाराष्ट्र प्रमुख सुनील वाघमारे, गणेश लंघे, शिवसेना महिला आघाडी प्रमुख शोभाताई आलवणे, शिवसेना तालुका प्रमुख संजय पवार, भाजपचे तालुकाध्यक्ष प्रताप चिंधे, इंजिनिअर सुनील वाघ, राजेंद्र मुथा, भाजप महिला आघाडी प्रमुख मंगलताई काळे,अशोक ताके, रिपाईचे तालुकाध्यक्ष सुशील धायजे,रिपब्लिकन सेनेचे अध्यक्ष नितीन मिरपगार, शिवसेना शहरप्रमुख बंडू शिंदे व्यासपीठावर उपस्थित होते.

यावेळी शिवसेना भाजप महायुतीचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार डॉ. करणसिंह घुले यांनी प्रास्ताविक केले.ना. एकनाथ शिंदे यांचा संत ज्ञानेश्वर माऊलींच्या मूर्ती भेट देऊन सत्कार करण्यात आला तर लाडक्या बहिणींच्या वतीने ज्ञानेश्वरी ग्रंथ भेट देऊन सन्मान करण्यात आला. उपस्थित महायुतीच्या नगराध्यक्षपदाचे उमेदवार डॉ.करणसिंह घुले पाटील यांच्यासह उमेदवारांचा परिचय स्व:त एकनाथ शिंदे यांनी करून दिला.

यावेळी बोलतांना ना.एकनाथ शिंदे म्हणाले की शासकीय जागेवर घर बांधून राहणाऱ्यांना हक्काचे उतारे देण्यासाठी सरकार प्रयत्नशील असून नेवासा शहराचा विकासाचा अनुशेष भरून काढण्यासाठी नवीन चेहरा हवा त्यासाठी नगराध्यक्षासह महायुतीच्या नगरसेवकांना मतदान करून नगरपंचायतची सत्ता आमच्या हाती द्या असे आवाहन उपमुख्यमंत्री शिंदे यांनी केले. शिवसेना भाजप महायुतीचे नगराध्यक्षपदाचे उमेदवार डॉ.करणसिंह घुले पाटील यांनी प्रास्तविक करतांना आधीच्या सत्ताधाऱ्यांचा खरपूस समाचार घेतला.आ. विठ्ठलराव लंघे म्हणाले, शेंडा न बुडूख असणाऱ्या पक्षाच्या विरोधात आम्ही निवडणूक करीत असून नेवासा शहराचा चेहरा मोहरा बदलण्यासाठी नगरपंचायतीची सत्ता ताब्यात द्या ! असे त्यांनी सांगितले.

ना. एकनाथ शिंदे म्हणाले की ज्ञानेश्वरीच्या जन्मस्थानाचे पवित्र माती कपाळी लावण्यासाठी आणि लाडक्या बहिणीसाठी भेटण्यासाठी मी या ठिकाणी आलो आहे,सरकारच्या विविध कल्याणकारी विकास योजने पैकी मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना ही आवडती योजना असून विरोधकांनी त्यात खोडा घालण्याचा प्रयत्न केला होता मात्र ही योजना कधीच बंद होणार नसून महिलांना स्वतःच्या पायावर उभे करण्याचा प्रयत्न सरकार करणार आहे.

शहर विकासाची जाण असणारा नगराध्यक्ष पदासाठी नवीन चेहरा डॉ.करणसिंह घुले पाटील यांच्या रूपाने महायुतीने दिला असून तो मालक नव्हे तर सेवक म्हणून काम करणार आहे. त्यामुळे विकासाची गंगा आणण्यासाठी सुज्ञ मतदारांनी महायुतीला सत्ता द्यावी आणि परिवर्तन करावे असे आवाहन ना. शिंदे यांनी केले.सभेदरम्यान शिल्पकार आकाश जामदार यांनी नामदार शिंदेंचा पुतळा तयार केला तर १३ वर्षीय सर्वेश बागडे या मुलाने नामदार शिंदेंचे सुरेख चित्र साकारले. या दोघांचेही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी कौतुक केले.पत्रकार सुधीर चव्हाण यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले तर नेवासा गावचे माजी सरपंच सतीश गायके यांनी उपस्थितांचे आभार मानले. सभेला हजारोंचा जनसमुदाय उपस्थित होता.

# गोदावरी परिक्रमा निमित्ताने देवगडला भाविकांची आलोट गर्दी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** गोदावरी परिक्रमा निमित्ताने नेवासा तालुक्यातील श्री गुरूदेव दत्त पीठ असलेल्या श्री क्षेत्र देवगड येथे भारतातील शेकडो संत महंतांचे आगमन शुक्रवारी झाले. यावेळी त्यांचे मिरवणूक काढून उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले.देवगड दत्त पिठाचे प्रमुख महंत गुरुवर्य भास्करगिरी महाराज व उत्तराधिकारी स्वामी प्रकाशानंदगिरी महाराज यांच्या हस्ते उपस्थित साधूसंतांचे संतपूजन करण्यात आले.यावेळी संत दर्शनासाठी भाविकांची आलोट गर्दी झाली होती.

वृंदावन धाम येथील अग्र मलुकपिठाधीश्वर परमपूज्यनिय स्वामी राजेंद्रदास देवाचार्य महाराज व श्रीधाम वृंदावन गोरीलाल कुंज परमपूज्यनिय रसिकाचार्य किशोरदास देवजू महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली गोदावरी परिक्रमा मधील सुमारे ५५० साधू संत देवगड येथील सोहळयात सहभागी झाले होते.

संत महंतांचे आगमन देवगड येथे झाल्यानंतर भव्य मिरवणूक काढून त्यांचे मंगल वाद्याने स्वागत करण्यात आले. यावेळी स्वामी राजेंद्रदास देवाचार्य महाराज यांच्यासह गुरुवर्य भास्करगिरी महाराज व स्वामी प्रकाशानंदगिरी महाराज यांच्या हस्ते गोमातेचे पूजन करण्यात आले. गंगा घाटावर जाऊन वेदमंत्राच्या जयघोषात गंगापूजन करण्यात आले. झालेल्या धार्मिक सोहळयाचे पौरोहित्य भेंडे येथील आचार्य गणेशदेवा कुलकर्णी, प्रवरासंगम येथील शरद काटकर या ब्रम्हवृंद मंडळींनी केले.गंगापूजन सोहळयाला हजारो भाविक उपस्थित होते.



**देवगड** येथील संत पूजन सोहळ्यास उपस्थित भाविक.(छाया-सुधीर चव्हाण)

यावेळी झालेल्या संतपूजन सोहळयाच्या प्रसंगी बोलतांना वृंदावन धाम येथील श्री अग्र मलुकपिठाधीश्वर स्वामी राजेंद्रदास देवाचार्य महाराज म्हणाले, गोदावरी परिक्रमातील देवगड हे साधू संतांच्या विसाव्याचे अंतिम क्षेत्र आहे. भगवान शंकराच्या जटातील पहिली धारा गंगासागर असून गोदावरी ही त्यातील दक्षिणकाशी धारा आहे. ९६ कोटी तीर्थ गोदावरीत विलीन असल्याचे त्यांनी गोदावरी स्थान महात्म्य विषद करतांना सांगितले. पवित्र गंगेचे पावित्र्य जपविण्याचा प्रयत्न झाला पाहिजे.यावेळी झालेल्या गोदावरी परिक्रमा प्रसंगी श्रीधाम वृंदावन गोरीलाल कुंज परमपूज्यनिय रसिकाचार्य किशोरदास देवजू महाराज,वारकरी भूषण मारुती महाराज कु-हेकर,महंत श्री मकुंदकाका जाटदेवळेकर,देवगड संस्थानचे महंत भास्करगिरी महाराज, स्वामी प्रकाशानंदगिरी महाराज,ईश्वरदास महाराज, वेदांत महाराज, मुखेकर महाराज,संत ज्ञानेश्वर महाराज संस्थानचे प्रमुख देविदास महाराज म्हस्के,डॉ.जनार्धन महाराज मेटे,दादा महाराज वायसळ, भगवान महाराज जंगले शास्त्री,नंदकिशोर महाराज खरात,संतोष महाराज चौधरी,अंकुश महाराज जगताप, बाळू महाराज कानडे यांच्यासह देशभरातील परिक्रमात सहभागी झालेले सुमारे ५५० पाचशे संत महंतांसह वारकरी संप्रदायातील महाराज मंडळी यांच्यासह हजारो भाविक सोहळ्याला उपस्थित होते.बजरंग विधाते यांनी सूत्रसंचालन केले.उपस्थित भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.

## कारची दुचाकीला जोरदार धडक ३ विद्यार्थी गंभीर !

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** राहुरी-शनिशिंगणापूर (सोनई) रोडवरील ब्राह्मणी शिवारात गुरुवारी दि. १८ डिसेंबर रोजी सकाळी साडेआठ ते नऊच्या सुमारास दुचाकी व स्विफ्ट कार यांच्यात भीषण अपघात झाला. या अपघातात आयटीआयचे तीन विद्यार्थी गंभीर जखमी झाले असून परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

सदर अपघात इतका भीषण होता की यामध्ये स्विफ्ट गाडीचा पूर्ण चक्का चुर झाला होता.

राहुरीकडून सोनईच्या दिशेने जाणारी स्विफ्ट कार (क्र. एमएच १२ केटी १७२६) ब्राह्मणी बस स्थानकासमोर समोरून येणाऱ्या हिरो होंडा दुचाकीला (क्र. एमएच १४ एफव्ही ९६८३) जोरदार धडकली. धडकेचा जोर इतका प्रचंड होता की दुचाकीवरील तिन्ही विद्यार्थी रस्त्यावर फेकले गेले.

या अपघातात सुरेश तरवडे, शंभू तरवडे व दरंदले (रा. चेडगाव) हे तिघेही आयटीआयचे विद्यार्थी गंभीर जखमी झाले आहेत. स्थानिक नागरिकांनी तातडीने जखमींना उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले. अपघातानंतर काही काळ वाहतुकीत अडथळा निर्माण झाला होता.

घटना घडताच आजुबाजुला असलेल्या नागरीकांनी अपघाताची ठिकाणी धाव घेत जखमींना मदत केली. रस्त्यात वारंवार होणाऱ्या अपघातांमुळे या रस्त्यावर वेगमर्यादा व सुरक्षिततेच्या उपाययोजना करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे,

## घरकाम करणाऱ्या तरुणानेच अल्पवयीन मुलीला पळविले

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** घरकाम करणाऱ्या तरुणाने ज्या घरात काम करतो, त्याच घरातील एका १६ वर्षीय अल्पवयीन मुलीला फूस लावून पळवून नेल्याची घटना राहुरी तालुक्यातील चिंचाळे परिसरात दि. १५ डिसेंबर रोजी रात्रीच्या सुमारास घडली. या घटनेतील आरोपी योगेश माळी हा राहुरी तालुक्यातील चिंचाळे परिसरातील एका घरात घरकामाच्या निमित्ताने नेहमी ये जा करत असे. दि. १५ डिसेंबर २०२५ रोजी रात्री ९ वाजेच्या सुमारास पिडीत मुलीचे आई वडील शेतात पाणी भरण्यासाठी गेले होते. त्यावेळी त्यांच्या दोन्ही मुली आजी आजोबा सोबत घरात झोपी गेले होते. पिडीत मुलीचे आई वडील रात्री १२ वाजता शेतातून घरी गेले. तेव्हा त्यांची १६ वर्षीय मुलगी घरात नव्हती. पिडीत मुलीचा आजुबाजुला तसेच परिसरात शोध घेतला, परंतु ती मिळुन आली नाही. त्यावेळी मुलीचा शोध घेत असताना त्यांना समजले की, योगेश शिवाजी माळी हा देखील त्याचे राहते घरी नाही. त्यावेळी पिडीत मुलीच्या नातेवाईकांची खात्री झाली की, योगेश शिवाजी माळी यानेच त्यांच्या मुलीला कशाचे तरी आमिष दाखवुन तीला फुस लावुन पळवुन नेले. पिडीत मुलीच्या वडिलांनी राहुरी पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून आरोपी योगेश शिवाजी माळी, रा. चिंचाळे, ता. राहुरी, याच्यावर अपहरणचा गुन्हा दाखल करण्यात आला. पुढिल तपास पोलिस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरु आहे.

# ५.७० लाखांचा चंदन तस्करीचा भंडाफोड!

## एलसीबीची धडक कारवाई; एक जेरबंद, एक फरार

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** अहिल्यानगर जिल्ह्यात चंदन तस्करीविरोधात स्थानिक गुन्हे शाखेने मोठी कारवाई करत ५ लाख ७० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून एक आरोपीस अटक, तर एक आरोपी फरार असल्याची माहिती समोर आली आहे. पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या आदेशानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी यांच्या नेतृत्वाखाली ही कारवाई करण्यात आली. दि. १८ डिसेंबर २०२५ रोजी लोणी पोलीस ठाणे हद्दीत अवैध चंदन वाहतूक व विक्री करणाऱ्या इसमाबाबत खात्रीशीर माहिती मिळाल्यानंतर, स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने तळेगाव-लोणी रोडवर डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम सेंटरजवळ सापळा रचला.

नाशिकहून श्रीरामपूरच्या दिशेने येणाऱ्या पांढऱ्या रंगाच्या मारुती सुझुकी स्विफ्ट कारला थांबवून तपासणी केली असता मोठा खुलासा झाला. वाहन चालकाने आपले नाव हनुमंता भिमा मोरे (वय ४५, रा. उंबरगाव, ता. श्रीरामपूर, जि. अहिल्यानगर) असे सांगितले. पंचासमक्ष झडतीदरम्यान त्याच्याकडून ३० किलो चंदनाची लाकडे (किंमत ६०,०००), मारुती सुझुकी स्विफ्ट कार (किंमत ५,००,०००), मोबाईल फोन (किंमत १०,०००), असा एकूण ५,७०,००० किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. चौकशीत आरोपीने चंदनाची लाकडे उत्तम नारायण पवार (रा. पळसे, ता. सिन्नर, जि. नाशिक - सध्या फरार) याच्याकडून विक्रीसाठी आणल्याची कबुली दिली आहे. या प्रकरणी लोणी पोलीस ठाण्यात गुन्हा क्र. ६५९/२०२५ नोंद करण्यात आली असून, बीएनएस २०२३ कलम ३०३(२), ३(५), भारतीय वन कायदा १९२७ कलम ४२ तसेच महाराष्ट्र वन अधिनियम कलम ३ व ४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास लोणी पोलीस ठाण्याचे अधिकारी करीत आहेत.

ही यशस्वी कारवाई पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस अधिकारी व अंमलदार - राहुल द्वारके, भिमराज खर्से, राहुल डोके, प्रमोद जाधव, सतीश भवर, सुनील मालणकर व चालक महादेव भांड यांनी केली आहे. चंदन तस्करीविरोधातील ही कारवाई जिल्ह्यात मोठी खळबळ उडवणारी ठरली असून, फरार आरोपीचा शोध घेण्यासाठी पोलीस पथके सक्रिय झाली आहेत.

# श्रीरामपूर तहसीलदारांची वाळू माफियांवर ‘सर्जिल स्ट्राईक’

## पाच दिवसांत लाखोंचे साहित्य खाक; जप्त वाळू वापरणार गरिबांच्या घरकुलासाठी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** तालुक्यातील गोदावरी नदीपात्रातून होणाऱ्या अवैध वाळू उत्खननाविरोधात महसूल प्रशासनाने आक्रमक पवित्रा घेतला असून, तहसीलदार मिलिंदकुमार वाघ यांच्या नेतृत्वाखालील पथकाने गेल्या पाच दिवसांपासून वाळू माफियांवर ’सर्जिकल स्ट्राईक’ सुरू केला आहे. या धडक मोहिमेत केवळ साहित्याची जाळपोळच केली नाही, तर जप्त केलेली वाळू थेट घरकुल लाभार्थ्यांना देऊन प्रशासनाने आपली प्रतिमा उंचावली आहे.



### नदीपात्रात शोधमोहीम: चप्पू आणि यंत्रसामग्री उद्ध्वस्त

श्रीरामपूर तहसील कार्यालयाच्या गौण खनिज पथकाने १५ ते १९ डिसेंबर दरम्यान ही मोठी कारवाई केली. विशेष म्हणजे, गोवर्धनपूर येथे नदीपात्रातील चप्पू शोधण्यासाठी चक्क नगरपालिकेच्या डिझेल बोटीची मदत घेण्यात आली. १८ आणि १९ डिसेंबर रोजी करण्यात आलेल्या कारवाईत तब्बल १० चप्पू तोडून जाळण्यात आले असून, सुमारे अडीच लाख रुपयांची मालमत्ता खाक करण्यात आली आहे.

### नायगावमध्ये गुन्हा दाखल, यंत्रसामग्री जप्त

१६ डिसेंबर रोजी नायगाव येथे मोठी कारवाई करत ९० ते ९५ ब्रास वाळूचा साठा जप्त करण्यात आला. या ठिकाणी वाळू उपशासाठी वापरली जाणारी १.५ टन वजनाची यारी मशीन, जनरेटर आणि दोन फरांडी जप्त करण्यात आली आहेत. याप्रकरणी तालुका पोलीस ठाण्यात १७ डिसेंबर रोजी रितसर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### कर्तव्यदक्ष टीमची कामगिरी

तहसीलदार मिलिंदकुमार वाघ यांच्या मार्गदर्शनाखाली मंडळाधिकारी प्रशांत ओहोळ, ग्राम महसूल अधिकारी अशोक चितळकर, राजेश घोरपडे, राहुल साठे, अजय साळवे, दीपक साळवे, अक्षय जोशी, सुरेंद्र पवार, ऋषिकेश कदम, तुषार आगळे, सृजन कदम, बाळासाहेब कर्जुले, गोविंद खैरनार, गणेश शिंदे, प्रदीप चव्हाण, आकाश गावडे, सायली अमोलिक, महसूल सेवक तुळशीराम शिंदे, संदीप नवसारे तसेच नगरपरिषदचे कर्मचारी अनुप झरेकर, विशाल सोनावणे, मेहबूब शेख,आकाश शिंदे यांसह महसूल आणि नगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांच्या मोठ्या फौजफाट्याने ही मोहीम फत्ते केली.

### वाळू मिळाली गरिबांच्या घराला!

केवळ कारवाई न करता जप्त केलेली वाळू खऱ्या गरजवंतांपर्यंत पोहोचवण्याचा स्तुत्य उपक्रम प्रशासनाने राबवला आहे. ✻ खिर्डी येथील १५ ब्रास वाळू ३ घरकुल लाभार्थ्यांना वाटण्यात आली. ✻ वांगी बुद्रुक येथील ६ ब्रास वाळू २ लाभार्थ्यांना प्रत्येकी ३ ब्रास प्रमाणे देण्यात आली. ✻ नायगाव येथील जप्त वाळू देखील लाभार्थ्यांना देण्यासाठी गटविकास अधिकाऱ्यांकडे सुपूर्द करण्यात आली आहे.

### कडक कारवाईचा इशारा

तालुक्यात अवैध गौण खनिज प्रतिबंधात्मक पथकांची नियुक्ती करण्यात आली आहे. यापुढेही अवैध उत्खनन किंवा वाहतूक आढळल्यास महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ च्या कलम ४८ (७) नुसार कडक दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

**-मिलिंदकुमार वाघ, तहसीलदार, श्रीरामपूर**

